किरकोळ अंकास ........................८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस ........०।

Single copy.............................. 4as

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over10... 4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 7 MAY 1894 NO 18

वर्ष २८ आकोला सोमवार तारिख ७ माहे मे सन १८९४ इ० अंक १८

### चार तास होऊन गेले आतां आशा सोडा.

अरे देवा ! मी तीन चार तास व्यर्थ घालविले ते जर परत आणतां आले असते तर किती मजा झाली असती. पहा ! एका क्षणांत मनुष्यावर किती संकटें येऊन पडतात. ! !

मिस्तर जेम्स कार्टीस आणि मिस्तर सी. एस बेनेट हे दोघजण पुष्कळ वर्षें अगदीं जिवलग मित्र होते. ते सॅन फ्रान्सिसको शहरांत रहात असत. गेल्या उन्हाळ्यांत पहिल्याच वेळेस एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून बरेच भांडले. सुविचार मनांत आले व पुन्हा त्यांची गट्टी जमली परंतु एकदां घडी बिघडली ती बिघडली. विचार देवीनें आपल्या स्मरण वहींत टिपून ठेवलें होतें. ते एकमेकां पासून अलग राहण्या बद्दल खबरदारी घेत होते. ह्या दृयांची गाठ एका रस्त्यांत पडली. पुनः भांडण सुरू झालें. कर्टीसच्या मुखांतून फारच कठोर व काळजाला झोंबण्या सारखे शद्ब निघाले आणि त्यांनीं रागाच्या सपाट्यांत पिस्तुल काढली व बेनेटवर झाडून त्यास लागलीच राम ह्मणायास लावलें पुढेंही तो स्वनिंदेनें व दुःखानें नाहला गेल्यामुळें वरच्या सारख्याच लाखोल्या वाहत असे.

हें पहा असें वागणें किती निरर्थक, कुच कामाचें व दांभिक आहे बरें !

परंतु करटीस ह्मणत असे कीं एका क्षणांत मनुष्यावर कोणतीं संकटें येतील ह्याचा नेम नाहीं. असें आपणास क्षणभर बरें वाटतें परंतु ह्या पेक्षां दुसरा अगदीं खोल विचार आहे तो कोणाच्या ध्यानांत येतो? ह्या संकटाचें खरें स्वरूप समजलें नाहीं तर कांहीं चिंता नाहीं. तर ह्याच मुद्यावर दुसऱ्या एका गोष्टीचा विचार करूं.

एक सुज्ञ बाई ह्मणते कीं सन १८६० सालीं अक्टंबर महिन्यांत मला असा ज्वर जडला होता कीं त्यातुन मी वाचेन असें मला वाटत नव्हतें. माझ्या शरिरांत सर्व ठिकाणीं वेदना होऊ लागल्या व खोकल्यानें मला इतकें जर्जर करून टाकलें कीं माझ्या शरिराचा चेंदा मेंदा होतो कीं काय असें मला वाटलें. मी बिछान्यांत पडून राही परंतु रात्रंदिवस झोंप ह्मणजे तर देवाचें नांव. माझ्यानें उठून बसवत नसल्यामुळें मला चमच्यानें अन्नास माझ्या तोंडांत घालीत असत. माझी छाती इतकी धडकत असे कीं ती उशीवर तुह्मास साफ पाहिलें असतां दिसून येईल.

आणि वेदना इतक्या जालीम होत होत्या कीं जसें कोणी मला भोसकत आहे. मी अशी पंगु होऊन अंथरुणाशी खिळून राहिले व मला दम बरोबर घेतां येईना. वैद्य बोवा आह्मास सतत एक महिनाभर औषधोपचार करीत होते. परंतु दिवसानुदिवस क्षीण होत चाललें. कधीं कधीं रात्रीं माझी अशी गाळण होऊन जाई कीं सकाळ पर्यंत मी जगेन किंवा नाहीं ह्याची मला शंका वाटत असे. त्यांनीं आपल्या दुसऱ्या वैद्याची सल्ला मसलत घेऊन असें ठरविलें कीं हा रोग बरा होणें कठीण आहे. मला तकवा आणण्यास थोडीशी दारू पाजीत असत. माझे यजमान व मुलगी नेहमी माझ्या जवळ असत. कोणत्याही औषधा पासून मला कांहीं इतका गुण ह्मणून आला नाहीं मी आतां यमसदनीं जाणार असें मला वाटूं लागलें.

अशा वेळीं ग्रिफथ जवळच्या मोठली गांवांतील मिसीस किलींग माझी मैत्रीण होती ती धांवून आली व मला मदर सिजेलचे क्युरेटिव सिरप ( ह्मणजे माता सिजेलचा रोग हारक पाक ) घेण्यास गळ घातली. मी लागलींच एक बाटली पैदा करवून औषध घेण्यास सुरू केलें. थोड्याच दिवसांनीं मला अन्न घेता येऊन पचविण्याची शक्ती आली आणि वाईट लक्षणें कमी होत चाललीं. ह्यावरून असें दिसून येतें कीं ज्या उपाधीनें हिच्या शरिरात आपला पूर्ण अम्मल बसवून इतक्या शिखरास पोचविला होता कीं तिच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आपल्याला उपाधि समजो वा न समजो परिणाम असाच व्हावयाचा. कार्टीसनें जो अपराध केला होता त्याचें मुख्य कारण त्याचें एकदम रागावणें व त्या भरांत धिःकार व सुड घेण्याच्या विचारास उत्तेजन देणें व मन असल्या दुष्ट हेतूस स्वाधीन होऊन अशा प्रकारचे खून करण्यास तयार होणें हें होय. ह्याचप्रमाणें ह्या बाईच्या रोगाची उपाधि हाटली असतां अग्निमांद्य व अजीर्ण होय. कीं जी अखेरीस बेकाम होऊन जिवास धक्का बसविण्यास कारणीभूत झालीं ह्याचें सार ह्मणाल तर एकच. अरिष्टाची टेहळणी प्रारंभींच करावी व पुढें वाढूं देऊ नये ह्मणजे तें अरिष्ट आपल्या आटोक्यांत सहज ठेवतां यतें.

ह्या औषधीच्या सहा बाटल्याचा फन्ना केल्यावर माझी तब्येत पूर्ण ताळ्यावर आली आणि तीस वर्षांपूर्वीं पेक्षां मला आतां हजार हिश्शानें बरें वाटत आहे. माझ्या दोन मुली पण अजीर्णापासून त्रासल्या होत्या त्या ह्या औषधानेंच बऱ्या झाल्या. मला कोणी विचारतील त्यास मी मोठ्या आनंदानें सांगेन.

( सही ) मिसीस लुई ज्याकसन
बिव्हर्स आर्मस हॉटेल
ब्रिजरोड, ह्यामरस्मिथ, लंडन
तारीख १४ माहे जानेवारी सन १७६२.

वर लिहिलेल्या ओळी ज्या पत्राचें सार आहे त्यांत मिसीस जानसन बाई असें प्रदर्शित करिते कीं सन १८६० च्या अक्टोबरांत जें दुखणें लागलें होतें त्याच्या वीस वर्षांपूर्वी तिचे पित्ताशय व पक्वाशय बिघडले होते आणि थोडें जरी खालें तथापि तिच्या पोटांत कळा मारीत. तिला थकल्यासारखें व गळून गेल्या सारखें आणि उदास झाल्यासारखें वाटे आणि पोट अगदीं खोल गेल्यासारखें वाटल्यामुळें तिला फारच वाईट वाटे. तिच्या छातींत बरगड्यांत तीव्र वेदना होत, छातींत धडधड होई. घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घरीं कोणी तरी उचलून आणीत. F. L.

### विजयादशमीचें सोनें

( मागील अंकावरून पुढें चालू )

Thou on whose stream, 'mid the steep sky's commotion,
Loose clouds like earth's decaying leaves are shed
Shook from the tangled boughs of Heaven and Ocean,
Angles of rain and lightning, there are spread
On the blue surface of thine airy surge,
Like the bright hair uplifted from the head
Of some fierce Maenad, ev'n from the dim verge
Of the horizon to the zenith's height—
The looks of the approaching storm.
Of the dying year, to which this closing night
Will be the dome of a vast sepulchre,
Vaulted with all thy congregated might
Of vapours, from whose solid atmosphere
Black rain, and fire, and hail, will burst : O hear /

कुपित गगनीं वीर्घ स्रोतावरी तव मारुता !
गण पसरती जीमूतांचे असंख्य तडिद्युता ॥
दिव-जलधिचा करावास त्यजोनि महत् श्रमें ॥
फिरति- दलेस शुष्क-व्योमीं पहा बहु संभ्रमें ॥ ९ ॥
उसळति तुझ्या वाता ! लाटा प्रचंड दिशांतरीं ॥
जलधरघटा - भावो वात्या कल्पतयावरी ॥
विखुरित शिरीं रागें केशा गमे जलदेवता ॥
क्षितिज न दिसे; कोपे आतां खमध्यहि तत्वतां ॥ १० ॥
घुमट रजनी होईं वाटे महत् शवमंदिरा ॥
खुलवित तथा बाष्पांचा हा महा चय बांवरा ॥
करुणपर हो या त्वद्गीत प्रभंजन वत्सरा ॥
( ननु अवसित प्रायाब्दाचा दुजा स्तव ना वरा ) ॥ ११ ॥
गगन घनसें जीमूतांनीं पहा दिसतें मला ॥
तडिद्वनिल हें वर्षो धारा तशा करक शिला ॥
सकल दि दिशा अंधःकारीं निमग्न; भयंकरा ॥
करसि निनदा वायो ! ऐके मदीय वचा जरा ॥ १२ ॥

### "जागे व्हा"

महता पुण्यपण्येन क्रीतेयं काय नौस्त्वया ।
पारं दुःखोदधे र्गन्तुं तर यावन्न भिद्यते॥

असे कांहीं नियमित विषय आहेत व अशा कांहीं विलक्षिन गोष्टी आहेत कीं त्या कधीं सत्ता सरावयाच्या नाहींत. हें आमच्या वाचकांपैकीं प्रत्येकाच्या पाहण्यांत आलेंच असेल. एखादी सुंदर मूर्ति पहून मन कसें मोहून जातें ! एखाद्या गोष्टींविषयीं मनानें एकदां कां हाव घेतली म्हणजे तें अगदीं वेडें बनतें ! ती मूर्ति जरी हजारदां बघितली तरी प्रथम दर्शनीं त्याला जो आनंद झाला असेल तितकाच आनंद प्रत्येक वेळेला होतो. आणि आपले प्रियपात्र पाहतांच जसा एखादा रंगेल गडी अगदीं मोहपाशांत गुंतून जातो तद्वतच त्या गोष्टीची त्याला आठवण झाली म्हणजे त्याची स्थिति होते. मग ती आठवण एकदां झाली काय आणि शंभरदां झाली काय सारखीच . बरें . ज्या वस्तूवर एखाद्याचें मन विलक्षण प्रकारानें बसलें आहे त्याची प्राप्ती जर त्याला झाली नाहीं तर त्याला अतिशय दुःख होतें !

अशा पुष्कळ गोष्टी घडलेल्या आहेत. व त्यांचीं वर्णनेंहीं मोठ मोठ्या कवींनीं उत्तम प्रकारें केलीं आहेत. आणि काल संपे पर्यंत हीं वर्णनें पुढें उत्पन्न होणारे कवी अशींच चालवितील असें वाटतें. मनुष्याचा स्वभाव जावत्काळ आहे असाच राहील तावत्काळ हें असेंच चालणार "अहाहा ! किती मंद व शीतल वारा सुटला आहे. नूतन पल्लवीनें हीं आम्रराजी किती सुकलेली दिसत आहे! कोकिळांचे कर्णमधुर कूजित कानीं पडूं लागले आहेत. नदीच्या काठच्या हिरव्यागार हरळीवर गाईंची लहान लहान वासरें स्वच्छंदानें इकडून तिकडे उड्या मारीत आहेत." अशा प्रकारें वसंत ऋतूचें वर्णन कवि करीत असतात. पण सृष्टिसौंदर्य पाहून एखाद्याला भीज वाटली नाहीं, जगामधील हरयही होणारे नवे नवे सृष्टि चमत्कार बघून एखाद्याला कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं अथवा वसंताची बहारी प्रत्यक्ष पाहून अथवा तिचें वर्णन वाचून एखाद्याचें हृदय आनंद लहरींनीं उचंबळू लागलें नाही असला मूढ व नष्टेंद्रिय कोण असेल तो असो? साऱ्या दिवसाची गडबड संपून रात्रीनें भूमंडळावर आपला पूर्ण अंमल बसविला ह्मणजे जिकडे तिकडे अगदी सामसूम व शांत होतें. वनराजी मधील तानसेन जे पक्षी ते आपले सुस्वर गायनालाप आटपते घेतात व वृक्षांच्या खांद्यावरच निद्रासुखाचा आस्वाद घेतात. चंद्राची स्वारी तारा गणासह विस्तीर्ण गगन मंडळा मध्यें मार्ग क्रमण करीत असते. दिवसाचे श्रम व दिवसाची दगदग यांचा मनुष्याला विसर पडतो. आणि सर्व उद्योग व कामधंदा हेही बंद पडतात; ह्या गोष्टी सर्वांनां केव्हां

च ठाऊक झालेल्या असतात. तरी त्याच गोष्टींच्या भाकडकथा लाखोवेळा जों येई पर्यंत सर्व ऐकतातच कारण साधारणपणें मनुष्याच्या आयुष्याची घाटणीच अशी आहे कीं, आपली स्थिती काय आहे या विषयीं ज्या वेळेस तो कांहींच विचार करीत नाहीं त्या वेळेस त्याचें चित्त इतर गोष्टी कडे वेधतें!

एखाद्या कवीचें काव्य हातांत घेऊन त्या मधील एखाद्या वनांतील लतामंडपाचें वर्णन वाचण्या पूर्वींच यांत काय असेल याची कल्पना वाचणाराला होतेच. "निर्मळ जलयुत असा झुळझुळ वाहणारा झरा! त्याच्या सभोंवार चित्रविचित्र रंगाच्या फुलांची झालेली बिछायत! लतांच्या व वृक्षांच्या पर्णांनीं झालेल्या हिरव्यागार व छायायुत अशा तोरणाकार कमानी! सूर्यबिंबाचें सुद्धां दर्शन घडत नाहीं!" इत्यादि गोष्टी पेक्षां जास्त त्या वर्णनांत काय बरें आढळणार! पण असल्या रमणीय, शीतल व एकांत वासाच्या ठिकाणीं बसून आपल्या श्रमाचा कोण परिहार करून घेणार नाहीं, व असलेच मनोहर देखावे वारंवार पाहून नेत्रांचें पारणें फेडून घेतल्यावांचून कोण राहणार आहे!

त्याच प्रमाणें या जगामध्यें अनेक प्रकारचे सात्विक भाव आहेत. ते आमच्या मनुष्याच्या स्थितीला फारच अनुरूप आहेत. ते इतके कीं आमच्या स्थितीशीं त्यांचें चांगलें जुळलें ह्मणजे आह्मी आपल्याला धन्य समजतों. व तसेंच याच्या उलट घडून येणाऱ्या गोष्टी ज्या वेळेस आह्मी पहातों व वाचतों त्या वेळेस आमच्या हृदयाला द्रव फुटल्या वांचून रहावयाचा नाहीं! खरोखर आयुष्य हें फुला प्रमाणें आहे. अनादि काला पासून तों आज मिती पर्यंत प्रत्येक राष्ट्रांतील लोक हेंच ह्मणत आले आहेत. ही जी आयुष्याची फुलाशीं तुलना केली आहे ती यथार्थ आहे. कारण प्रत्येकाला हें योग्यच आहे असें वाटतें व त्याच्या खरे पणा विषयीं खात्रीही पदोपदीं पटत असते. त्याच प्रमाणें एक मोठें सिद्धवाक्य सगळ्यानां अवगत असेलच! ते कोणते तर चालला आहे हा काल चांगल्या कामीं लावा, येणाऱ्या काळावर मुळींच भरंवसा ठेवू नका! कारण उद्याचा दिवस आपल्याला उजाडतो कीं नाहीं याचा कोणी नेम सांगावा? प्रत्येक नीतिवाद्याचें हेंच म्हणणें आहे व तदनुरूप तो प्रत्येकास उपदेशही करीत असतो परंतु मजा काय आहे कीं हें सिद्धवाक्य ज्या घटकेला जो कोणी ऐकतो तोच तें दुसऱ्या घटकेला पार विसरून जातो. मग पदोपदीं या वचनाचें पूर्ण दृढीकरण होत असतें. मग त्याला नीतिशास्त्रज्ञच कशाला पाहिजेत! तरी पण मनुष्य कसा वेडा बनतो कोण जाणे! पहा! कित्येक तर आतां थोड्या दिवसांतच आपल्याला सुखप्राप्ति होईल म्हणून मनोराज्यांत अगदी गर्क होऊन जातात! थोड्याच अवकाशात आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील, आपली हौस पुरेल म्हणून आनंद सागरांत मार पोहत असतात! पण ईश्वराच्या घरचा नेमानेम कांहीं निराळाच असतो! शिवशिव! तो सुखप्राप्तीचा काळ अगदीं समीप येऊन ठेपतो न ठेपतो, तो मनोरथ पूर्ण होण्याचा वखत आज उद्यां इतक्यांत येतो न येतो तोच तें विचारे मृत्यूच्या दरबारचा रस्ता धरतात आणि म्हणून ते सर्वस्वाला आंचवतात. कित्येक तर निराशेनें होरपळून जातात! या उभ्या आयुष्यांत देवानें आम्हाला सुखाचे दिवस दाखविले नाहींत म्हणून कित्येकांची रडकथा कितीएकदां कानीं पडते! कांहींच सुधारणा न होतां आमचे हे दिवस गेले म्हणून कित्येक ओरड करतात ती ही पुष्कळांनीं ऐकलीच असेल! व आयुष्यांतील मुख्य कर्तव्य कर्मे वेळेवर उरकून न घेतां केवळ दिरंगाईनें तीं तशींच या जगाच्या शेवटची भेट घेण्याची वेळ येई पर्यंत लोंबत राहिलीं म्हणून पुष्कळांनीं आक्रोश केला तोही वाचकांच्या कानांवर येऊन चुकलाच असेल!

(पुढें चालेल.)

## वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध २ शके १८१६

नेटीव वैद्यशास्त्र अलिकडे लोपत चालले आहे तथापि दुःखांत सुख इतकेंच कीं कलकत्ता, मद्रास वगैरे कडील कांहीं संस्थानांतून नेटीव वैद्यशास्त्राचें पुनरुज्जीवन करण्याचा कांहीं प्रयत्न चालू आहे. हा प्रयत्न कितपत सफल होईल हें कांहीं सांगवत नाहीं पण जी दिशा नेटीव वैद्यकी संबंधानें कित्येकांनीं घेतली आहे तिजवरून सर्व राष्ट्राचें यथाकाल बळ या नवीन प्रयत्नाला मिळालें तर एक अत्युत्तम शास्त्र उपयोगांत येऊन नेटीव वैद्यकीच्या पूर्णत्वाची कल्पना इतर देशांस थोडी बहुत होईल. या देशावर परचक्र येण्या पूर्वीं सर्व सुधारणा व सर्व विद्या इकडे प्रचलित असून त्यां मध्यें या देशाचें पाऊल फार पुढें होतें. नेटीव वैद्यशास्त्रांतील चिकित्सा, व औषधी यांचा पूर्वीं पासून फार नांवलौकिक आहे. हें शास्त्र पूर्णदशेस त्या वेळच्या ज्ञानाच्या मानानें पोहचलें होतें. पुढें मुसलमानी वैद्यकाला मोंगलाईच्या वेळीं कांहीं राजाश्रय मिळाला परंतु इंग्रजी राज्य आलें तेव्हां पासून हिंदु व मुसल्मान यांच्या वैद्यकीला राजाश्रय नाहींसा झाला व लोकाश्रयही कमी कमी होत चालला. म्हैसूर, बंगळोर वगैरे नेटीव संस्थानांतील दवाखान्यावर नेटीव वैद्य नेमले आहेत आणि या प्रयत्नाना चांगलें यश येत आहे. संस्कृत वैद्यक ग्रंथांचीं इंग्रजींतून व देशी भाषांतून भाषान्तरें सुरू आहेत हा दुसऱ्या बाजूनें उपाय चालू आहे. आमच्या मतें इतक्या गोष्टींनीं कार्यभाग साधत नाहीं इंग्रजी वैद्यशास्त्र शिकण्याच्या पाठशाळा आहेत त्या प्रमाणें पाठशाळा निघाल्या पाहिजेत. हल्लीं खरे नेटीव वैद्य फार थोडे आहेत पोटा साठीं गडबड बडबड करणारे फटवे वैद्य अधीक झाले आहेत. अशा लोकांना अध्ययन व अनुभव या विषयीं कांहीं माहिती नसते. शिवाय नेटीव वैद्यलोकांत एक वाईट खोड आहे. औषधें गुप्त ठेविलीं पाहिजेत हा त्याच्या मनाचा पक्का ग्रह झालेला असतो. इंग्रजी वैद्य रोगाचें नांव ठेऊन औषधाची योजना लिहून ठेवतात व रोग्याच्या प्रकृतींत फेरबदल दिसला त्या प्रमाणें त्या योजनेंत फेरबदल करितात. अशीं टिप्पणें आमच्या नेटीव वैद्यांनीं ठेवावींत असा कांहीं धरबंध पाहिजे. शिवाय इंग्रजी वैद्यकांतले कांहीं विषय नेटीव वैद्यशास्त्रा बरोबर शिकण्या सारखे आहेत. इंग्रजी शस्त्रक्रिया जशी आहे तशीच आपल्या नेटीव वैद्यांस शिकविली पाहिजे आणि सर्वांत मुख्य गोष्ट ही कीं हें वैद्यशास्त्र संस्कृतांत अगर इंग्रजींत उपयोगीं नाहीं तर देशी भाषांतून शिकविलें पाहिजे नेटीव वैद्यशास्त्रें इंग्रजी वैद्यशास्त्राशीं संमेलन होईल तितकें चांगलें. जी गोष्ट चांगली आहे ती वाटेल त्या देशाच्या शास्त्रांतून घ्यावी परंतु हल्लीं जी स्वकीय वैद्यशास्त्राची हेळसांड होत आहे ती आपल्या लोकांचा सुस्तपणा व अनास्था दाखविते सहस्रावधि लोकांचें औषधपाणी नेटीव वैद्यकाच्या आधारें असतें. परंतु अलिकडे इंग्रजी वैद्यकाला राजाश्रय आहे इतकेंच नाहीं तर श्रीमान व शिकलेल्या लोकांची धांव बहुधा इंग्रजी डाक्टराकडे असते. अशी शोचनीय स्थिती होण्यास राज्यकर्त्यांची अनास्था व नेटीव वैद्यकांत खरे पारंगत असलेले लोकांची दुर्मिळता हीं कारणें आहेत नेटीव वैद्यशास्त्राचें पुनरुज्जीवन होणें फार चांगलें. त्याला सर्व राष्ट्राचा एक कट पाहिजे. स्वकीयपणाचा अभिमान आपल्याला अवश्य पाहिजे नेटीव वैद्यांचे दवाखाने सर्वत्र पसरले पाहिजेत आणि या संस्था राजाश्रयाच्या अभावीं लोकमताच्या पूर्ण बळकटीवर काय त्या चालणार आहेत. आणि हा प्रस्तुत काल नेटीव वैद्यका संबंधानें असा आला आहे कीं ही वेळ चुकली तर पुन्हा नेटीव वैद्यक उदयास व भरभराटीस येणार नाहीं. तेव्हां आमच्या देशबांधवास मिल्टन कवीच्या उक्तीची आठवण आम्ही करून देतो ही उक्ति अशी कीं "जागे व्हा, उठा, अथवा असेच लोळत पडा।"

---

ब्रह्मदेश म्हणजे सुवर्णदेश आहे अशा कल्पना गुदस्ता फार निघाल्या होत्या त्या सर्व खऱ्या नव्हत्या हें शहाणपण कित्येकजणांनीं अल्पबहु मोलानें विकत घेतलें आणि तेव्हां पासून ब्रह्मदेशांत वसाहत करण्यास जाण्या विषयीच्या गोष्टी अलिकडे अगदीं नाहींशा झाल्या आहेत. ब्रह्मदेश आमच्या सरकारनें जिंकिला व इंडियाचें राज्य फैलाविलें ही गोष्ट राज्यकर्त्यांच्या फायद्याची झाली. परंतु या देशावर ब्रह्मदेशाच्या पादाक्रांतीमुळें अनेक संकटें आलीं त्यांचा मोबदला मात्र प्रजासमूहास कांहींच मिळाला नाहीं. लक्षावधि रुपये या स्वारी निमित्त खर्च झाले आणि हा खर्च दरिद्री प्रजेवर करांच्या रूपानें जबरी करून बसविला हें विसरतां कामा नये आमचे हजारो लोक ब्रह्मदेशात रणांगणीं पडले परंतु त्यांच्या प्राणदानीं बद्दल आमच्या लोकांस म्हणण्या सारखा कांहींच फायदा झाला नाहीं. इंग्रज सरकार आपखुषीनें आपल्या लोकांचें ठाणें अथवा वसाहत ब्रह्मदेशांत होऊं देणार नाहीं किंवा तशी गोष्ट घडूं देण्या विषयीं कांहीं तजवीज करणार नाहीं हें आम्ही जाणून आहों. परंतु आपल्या आपणच शहाणे होऊन ही संधी लोकांनीं दवडूं नये. परदेशगमन सोपें काम नाहीं व ब्रह्मदेशांत म्हणजे कांहीं पैशाच्यां खाणी नाहींत तथापि इंडियांतील संसार सौख्याच्या मानानें कांहीं लोक एका जुटीनें तिकडे राहण्यास गेले तर त्यांस अधीक सौख्य होईल अशी मात्र आमची समजूत आहे. श्रम हे केलेच पाहिजेत परंतु कालदेशमाना प्रमाणें त्याच श्रमाचें चीज ब्रह्मदेशांत अधीक चांगलें होईल. आपल्या देशांत लोकवस्ती फार वाढली आणि त्या मानानें अन्नाचा पुरवठा वाढला नाहीं. आणि म्हणूनच सध्याच्या स्थितींत परद्वीप गमन हा एक चांगला उपाय आहे. असा उपाय फार अवघड आहे हें खरें. परंतु काळ येईल तशी पाठ देण्यास शिकलें पाहिजे. किंबहुना वेळ पडली म्हणजे मनुष्य सर्व कांहीं करितो. मद्रासचे कित्येक लोक पोटापाण्याच्या टंचाई मुळें ब्रह्मदेशांत गेले आणि तेथें ते हल्लीं मुलाबाळा सकट सुखानें नांदत आहेत. मद्रासवाल्यांचा हा कित्ता किती लोक उचलतात पहावें! या लोकांनीं तिकडे घरें दारें केलीं आणि ते आपल्या धर्मा प्रमाणें तेथें रहात असतात.

---

वर्षभरा पूर्वीं 'केसरी' वर्तमानपत्रांतून कांहीं संस्कृत कवींच्या काला विषयीं निर्णय केला होता तो बहुतेक वाचकांस स्मरत असेल. आमच्या जुन्या कवी विषयीं ऐतिहासिक माहिती तारीखवार अशी क्वचित् मिळते. पूर्वीं हल्लीं प्रमाणें दळणवळण नव्हतें व इतिहास लिहिण्याची लोकांस फारशी गोडी नव्हती. निरनिराळ्या कवींच्या कालाचा निर्णय करणें ह्मणजे मोठें कठीण काम आहे. जुने शिलालेख आख्यायिका, निरनिराळ्या ग्रंथांत परस्पर कवी विषयीं उल्लेख, इंडियांतील चिनी प्रवाशांचें प्रवासवर्णन इत्यादि उपलब्ध साधना वरून कालनिर्णय करण्याचा अलीकडे पाठशाळांतून प्रचात आहे. आणि हें शोधन इतकें विचारपूर्वक संबद्ध व विश्वसनीय झालें आहे कीं निदान मोठमोठ्या संस्कृत कवींचे काल पाव अर्ध्या शतकाच्या फरकानें ठाम झाले आहेत. 'बांबे एशयाटिक सोसायटी'च्या सभेंत रा. रा. के. बी. पाठक यांनीं कालिदासाचा कालनिर्णय एका निबंधांत स्पष्ट करून दाखविला आहे. हा निबंध संस्कृतज्ञास फार उपयोगी पडेल. शंकराचार्यांचा काल 'केसरी' पत्रांतून मागेंच निर्णीत झाला आहे. राजश्री पाठकाच्या ह्मणण्या प्रमाणें कालिदासाचा काल ९३२-३३ हा ईसवी सन असावा. हे गृहस्थ मेघदूतकाव्य प्रकाशित करणार असून त्या ग्रंथांत हा काल निर्णय ते छापणार आहेत.

---

नामदार सुरेंद्रनाथ बानरजी हे एक अलौकिक गृहस्थ आहेत. यांनीं जे विषय हातीं घेतले त्यांची शहानिशा पूर्णपणें झाल्या शिवाय हे स्वस्थ बसणारे नाहींत. विद्यादानाचा खर्च सरकार कमी करितें अशा विषयींचा प्रश्न त्यांनीं बंगाल कायदेकौन्सिलांत काढला आहे. हा प्रश्न नवा नाहीं खरा. परंतु इष्ट हेतु साध्य होई पर्यंत त्याचा पाठलाग सोडतां कामा नये. दुसऱ्या देशांमधील विद्यादानाकडे कसकसा खर्च होतो याचे आंकडे त्यांनीं दिले आहेत ते असेः—

| देशाचें नांव | प्रत्येक माणशीं खर्च |
|---|---|
| सिलोन | २ आणे |
| मारिशिअस | १० आणे |
| अमेरिकेन स्वतंत्र संस्थानें | १० शिलींग ह्मणजे ६॥- रुपयावर |
| इंग्लंड | ४ शिलींग ह्मणजे २।- रुपयावर |
| रशिया | ३ ½ पेन्स ह्मणजे सरासरी तीन आणे |
| इंडिया | ७ पै० |

वरील आंकड्यांशीं इंडियांतील विद्यादानाच्या खर्चाची तुलना केली ह्मणजे सहजीं कळेल कीं, सरकार आपलें कर्तव्य बरोबर स्मरत नाहीं. नेटीव प्रजेला विद्यामृत पाजलें ह्मणून आमचे राज्यकर्ते नेहमीं स्वतांचे पोवाडे गात असतात ते अगदीं अयथार्थ आहेत. राज्यकर्त्यांचा चांगुलपणा एवढाच कीं ज्यांनीं हा देश जिंकला तेव्हां उदार बुद्धीनें विद्याखातें स्थापित केलें. परंतु जसजशी लोकसंख्या वाढत चालली, पाश्चिमात्य विद्यांचा फैलाव होत चालला, आणि जगांतील सुधारलेल्या राष्ट्रांशीं या देशाचा संबंध पडूं लागला त्या मानानें विद्यादानाकडे सरकारानें उदारहस्त पसरला नाहीं ह्मणूनच हा देश फार मागें पडला आणि इतर राष्ट्रांशीं टक्कर मारण्यास असमर्थ झाला. या देशांत पाऊल इंग्रजी पूर्वी त्या वेळच्या कालमाना प्रमाणें अगदीं पुढें होतें परंतु इंग्रजी राज्यकर्ते येथील प्रजाजनास मातृवत्सल्पानें न वागवितां कजाग सासू प्रमाणें वागवूं लागले ह्मणून आमचा देश फार खालावला आहे. कांम्पेन सेशन अलावन्स देण्यासाठीं दुष्काळ निवारण फंड बंद करण्यास ज्या सरकारास कांहीं भिती नाहीं त्या आपमतलबी स्वार्थसाधु, मत्सरी राज्यकर्त्यांस या देशांतील लोकांच्या शिक्षणाकडे पैसा अधिक खर्चण्याची इच्छा व्हावयाची नाहीं. तरी नामदार सुरेंद्रनाथ बानरजी यांच्या प्रतिज्ञे प्रमाणें आपण सरकारशीं निकरानें पण राजनिष्टेनें लढून आपली दैना दूर करून घेतली पाहिजे. वऱ्हाड प्रांत अमानीं मुलुख असून अगदीं मागसलेला भाग आहे तेथें देखील विद्यादानाकडे सरकारची अनास्था अतिशय दिसते. 'वऱ्हाड मांजी विद्यार्थी समाजा' च्या गेल्या मलकापूर येथील बैठकीस या प्रश्नाचा थोडा खल झाला आहे आणि या बद्दलची मागणी सरकारकडे डायरेक्टर मार्फत लवकरच होणार आहे. माजी डायरेक्टर राव बहादूर जठार व विद्यमान डायरेक्टर रावसाहेब पटवर्धन हे उभयतां या मागणीला फार अनुकूल आहेत व ही मागणी त्यांस अगदीं अवश्यक वाटते. तेव्हां मलकापुरास नेमलेली कमिटी विलंब न लावितां या विषयानें पूर्ण स्वरूप अर्जरूपानें सरकारच्या नजरेस लवकर आणील तितकें फार बरें!

# The Berar Samachar

MONDAY MAY, 7 1894

## THE EDUCATED NATIVE HIS POSITION AND HIS RESPONSIBILITY

(Communicated)

The position, which the educated native of India occupies at the present day, is indeed peculiarly of great consideration, and embraces duties and responsibilities of a stupendous nature. He is no longer, an ordinary man. Therefore, the ordinary duties of man become tenfold weightier, and several-fold binding, in his case, in proportion to the power and privileges, which his present status has bestowed upon him. He can not live and die unto himself, like a day-labourer, His thoughts and actions greatly affect the interests of the whole nation. Educated natives form the connecting links between the past and future of India. It is they, who are to restore the Aryan land to its vigorous national life. It is they, who are to mould and shape the national charactor of their own country. It is they, who are to rouse their country men from social lithargy and moral stupor. It is they who are to remove the dismal film of ignorance.

They stand on the vantage ground of intellectual eminence and emit therefrom the congenial light of their personal influence on the masses of the people and even on generations yet to be born. Knowledge is power. "For," says Bacon, the great English philosopher, "there is no power on earth which setteth up a throne or chair of estate in the spirits and souls of men, in their cogitations, imaginations, opinions and beliefs, but knowledge and learning." Knowledge has proved itself to be an enormous power in the case of the educated natives of India; and they may use it for good or evil. They may employ their potent authority and their vast intellectual resources, in executing the abject dictates of the baser passions of their heart, in gratifying their selfish motives, in securing ephemeral reputation, and in accomplishing lucre and means of livelihood; or they may render their erudition subservient to the just call of duty, they may turn their learning to the benefit and use of their countrymen and they may thus exert a deleterious or wholesome influence on the nation. In fact, India's future destiny lies in their hands Their numerical efficacy may be small at present; they may appear quite insignificant, they may be poor; yet, who denies, that they are a power. None—not a single individual —dare question; and resist their authority. These are not matters of opinion or conjecture, but actual facts which require to be seen, in order to be believed. Wherever an educated native moves, he exercises a mighty influence on all around even on those who are not friendly towards him. He speaks and acts as one having authority, as a mighty intellectual giant.

Such is the present position of the educated natives. But have they discharged their duties conscientiously and faithfully? Have they proved true to the trust reposed in them? As matters stand now, we do not see that the educated natives generally make a good use of the enlightenment they have received. There may, however, be some noble exceptions; but they are like atoms in a body. Education is like property. It has its rights and privileges on the one hand, its responsibilities on the other. But pity it is! that most of our educated men, while enjoying the fullest advantages of education, have failed to act up to their responsibilities. They feel proud of the freedom of their position and have shown themselves too apt to abuse it. They are no longer enchained by superstition or entangled in the ties of caste. One day, they were confined in the filthy cells of orthodoxy; to day they walk in the healthy air of liberty of thought and action, and thus naturally defy all manner of restraint Every where, systems of old are being eradicated. Wherever, a school or college is planted, there we see the native society convulsed. Wherever, we behold education, there we see, as a necessary consequence, disorganization of society. There is a fork of party—feeling between the orthodox people and the reformers. Its legs are being dragged quite in cross ways, and consequently it moves violently and produces huge wanes of discordance in the social atmosphere, whereby every thing becomes inaudible. Disorganization, under the present circumstances, is a necessary and an inevitable evil But it must be followed by reorganization Society must be reconstructed, rebuilt, reformed and remodelled, on the ruins of its ancient institutions.

(To be continued)

---

The fowowing paras are quoted from the Administration Report to show the civic condition of the general masses and the status of education they have reached:—

" Fifty- six per cent. of the males and 58 per cent. of the females are married, and 6 per cent. of the males and 16 per cent. of the females are widowed. Among the chief religions, the highest proportion of married is shown by the Hindus and the lowest by the Muhammadans. Hindus and Jains marry very young, but among Muhammadans and the Animistic the large majortiy of marriages take place after the sixteenh year. Of the population generally there is an extraordinary paucity of spinsters in comparison with bachelors above the age of nine years. The proportion of widows is highest among the higher castes; out of 1,000 Brahmin females 255 are widows.

" The statistics of education show that there has been some improvement since 1881. Of 1,000 males there are now 916 againet 93 at the preceding census who were entirely illiterate. The Jains are well educated, and Muhammadans are more advanced than Hindus, but the Animistic are supremely illiterate. In the taluks of Amraoti and Ellichpur 1 male in 8 can read and write or is under instruction; in the Melghat 1 in 48. Of those who have a knowledge of English there were in the province 2,493 males and 225 females. Among the castes the Parbhus are the most conspicuous for some education; 76 per cent. of their number are literate or learning, and of the literate 32 per cent. know English."

---

The Raja of Bhinga is one of those who must be a mad man if he does not play a tool in the hands of the autocrotic Anglo-Indians-The hono'rable gentleman has wasted his brain in sending a nasty article to the last number of the 19th Century- It is of no avail to contradict him because the succeeding viceroys have acknowledged the liberal and enlightened public opinion as expressed in the deliberations of the National Congress. The people have built a public opinion and it will soon be the ruling opinion in all polities. Let us however present a sermon from the pen of Raja in question:—

"A man desirous of entering the Council," he writes, "has now but to make a few speeches before a debating club of school-boys, denouncing the foreign rule as a curse, painting every official European as a scoundrel and every supporter of the British rule as a vagabond. Thus he paves his way to election to Municipal or Local Boards, as a member of which he decries every measure originating with Government as inhuman and unjust. He is honoured with the appellation of the champion of liberty, and has not to wait long for a seat in the Legislative Councils, local or supreme. When he reaches his goal, he has only to ask a few impertinent questions in order to remain in touch with his comrades; but what mischief will come out of this system, time alone will show."

## वऱ्हाड.

हवामान— उन्हाळा फार वढला आहे. परतु वारा चांगला सुटतो म्हणून थोडें बरें वाटतें. उन्हाच्या अति तापामुळें कांहीं दुखणीं उद्भवलीं आहेत तथापि भिण्या सारखी रोगराई कांहीं नाहीं.

आकोल्याचे सिव्हील सर्जन रेशी साहेब हे सर्जनक्याप्टन होते त्यांस सर्जन मेजर हा किताब मिळाला आहे.

रा. रा विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. एजुक्याशनल इनस्पेक्टर यांस आज तारखे पासून एक महिन्याची हक्काची रजा मिळाली.

मि. शेख महमद इस्मायल अफि० एक्स्टा असि कमिशनर, दर्यापूर यांस चालू महिन्या पासून १ महिना १७ दिवसांची हक्काची रजा मिळाली

यंदा वऱ्हाडच्या वकिलीची परीक्षा तारीख ४ सप्टेंबर रोजीं उमरावतीस सुरू होईल. उमेदवारांचे अर्ज १ ली जुलैच्या दिवशीं अगर अगोदर कमिशनर कडे पोंचले पाहिजेत.

आम्हास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर एक्स्ट्रा असि. कमिशनर यांस गेल्या २७ वे तारखेस देवाज्ञा झाली. सरकारी कामा निमित्त हैदराबादच्या आसपास दऱ्यावर फिरत होते तेथें वाटेंतच ताप येऊन तो अनिवार झाला आणि त्यांत त्यांचा अंत झाला. राजश्री वासुदेवराव वीस रुपयाच्या कारकुनी पासून हल्लीच्या मोठ्या हुद्याला चढले होते. विलक्षण मेहनती, कामचामात तरबेज व चोख, व स्वभावानें सरळ व मन मिळाऊ असे होते. त्यांच्या मरणानें मुलें बाळें उघडीं पडलीं व येथील एका प्रतिष्ठित घराण्याचा अगदीं गळाठा झाला. ईश्वरी इच्छे पुढें मनुष्याचा इलाज काय!

येथील डेपुटी कमिशनर कचेरींतील क्लार्क रा. रा. घोंडू हरी लळिंगकर यांस उमरावतीस कमिशनरचे कचेरींत ६० रुपयांची जागा मिळाली. आणि त्यांची ४० रुपयांची जागा योग्य हक्कदार रा० रा० वासुदेव पांडुरंग जोशी यांस मिळाली. या नेमणुकींत मि. हेअर साहेबांनीं आपली न्यायदृष्टी स्पष्ट पणें दर्शित केली.

कैद्यांचा फोटो काढण्याची नवीन कला शिकण्यासाठीं वऱ्हाडांतून तीन पोलीस आफिसर कलकत्त्यास गेले आहेत. वऱ्हाडा करितां अशा फोटो काढणाऱ्यांच्या तीनें जागा नवीन केल्या आहेत.

येथील पार्शी चीफ कानस्टेबल मि. धनजीशा हे कलकत्त्यास फोटोची कला शिकण्यासाठीं गेल्या मुळें त्यांची ६० रु० ची जागा रा. रा. श्रावणजी सटवाजी चौ. का. यांस, त्यांची ४० ची जागा रा. रा. केशव बापूजी यांस व अखेरची ३० ची जागा रा. रा. शामराव रामचंद्र यांस मिळाली.

क्लार्क आफ कोर्टांच्या नवीन बदल्या झाल्या आहेत त्या येणें प्रमाणें:—

| गृहस्थ | पगार | बदलीचा गांव |
|---|---|---|
| दामोदर नानाजी | १६० | आकोला. |
| सैफुदीन खान | १२५ | यवतमाळ |
| हरिहर काशिनाथ | १६० | उमरावती |
| मारुती हरी | १०० | बडनेरा |
| पांडुरंग सखाराम | १०० | खामगांव |

## वर्तमानसार.

सोलापूरः— उन्हाळा बराच प्रखर भासूं लागला. येथील सरकारी वेधशाळेंत पारा १०८ अंशावर गेला आहे. सिंगणापूर, पंढरपूर वगैरे कडून महामारीचें ही बीज आलें असून तें हल्लीं येथें बरेंच रुजत चालल्यासारखें दिसतें. जिल्ह्यांतही बहुतेक तालुक्यांतून कालरा सुरू आहे.

हैद्राबादचे प्रसिद्ध गंगाधरशास्त्री, ज्यांनीं गुदस्ता डा. रानडे यांचे येथें अनेक चमत्कार करून दाखविले होते ते, हल्लीं सोलापुरास आले असून त्यांनीं कांहीं मंडळीच्या आग्रहावरून मि. अबदुलपूरकर यांचे येथें थोडक्यांत आपला चमत्कृतिप्रयोग दाखविला. त्यांनीं प्रथम आपले कपडे व अंग दाखवून नंतर अंगावर एक वस्त्र घेतलें व मंडळीस खारीक खोबरें, बदाम, इत्यादिकांपैकीं आपल्यांस काय पाहिजे तें मागा ह्मणाले. मंडळींनीं आपसांत विचार करून मसालेदार उन्हून खिचडी मागितली व शास्त्रीबुवांनीं ती एक ताटभर काढून दिली नंतर पांच पन्नास फुलांचे हार व पाण्यानें थबथबलेलीं ६००।७०० विड्यांचीं पानें काढलीं. हें पाहून मंडळी अगदीं थक्क होऊन गेली.

✓ निजाम सरकारानें आपल्या हायकोर्टांत एका जज्जाची नेमणूक केली पण ती रेसिडेंटानीं नापसंत केली! पुनः निजाम सरकारच्या नेमणुकांत आह्मी हात घालीत नाहीं असें म्हणण्यास तयारच!

बेळगांव वगैरे ठिकाणचे लोकांना मुंबईस जावयाचें झालें किंवा माल पाठविणें झालें तर पुण्याचे लायनीनें फेरा पडतो व खर्च ही जास्त येतो. ह्मणून कऱ्हाडावरून एक रेलवेचा फाटा काढून तो बंदरानें मुंबईला येण्याची स. म. रे. कंपनी तजवीज करणार आहे असें समजतें. हा फांटा निपाणी वरून जाणार व वाटेला चिपळून, पेण, पनवेल वगैरे बंदरें लागणार आहेत, असें धा. वृ. मध्यें लिहिलें आहे.

तरस मारण्यास आजपावेतों ५ रुपये इनाम सरकारांतून मिळत असे. तें बंद करून बिबट्या वाघ मारण्यास जो पंधरा रुपये इनाम होता तो २० रुपये केला.

जोधपूर येथील कविराज मुरारी दानजी यानीं जोधपूरच्या महाराजांस "जसवंतयशोभूषण" नामक एक अलंकाराचा ग्रंथ तयार करून नजर केला. हा ग्रंथ तयार करण्यास मुरारी दानजी कविराज यांस पंधरा वर्षे श्रम करावे लागले. हा ग्रंथ वाचून महाराज साहेब इतके संतोषित झाले कीं, त्यांनीं मुरारी दानजी यांस "कविराज" हा किताब दिला व त्यांस एक लाख रुपये रोख, भूषणांनीं शृंगारलेला एक हत्ती व एक घोडा, शिवाय सोन्याचीं कडीं, मोत्यांची ची कंठी, शिरपेंच, जामा दुपट्टा, पागोटें दुमाला किनखापाचा आंगरखा, रत्नजडित एक तलवार व कट्यार इतक्या वस्तु व एक गांव वंशपरंपरेनें बक्षीस दिला.

सातारा हेडक्वार्टरमधील कित्येक पोलिस लोक हजरीस नव्हते, म्हणून कित्येक बडतर्फ केले, व कित्येकांचा वर्ग कमी केला व या पुढें हेडक्वाटरचीं दारें सर्व रात्रभर कुलपें घालून बंद करवीत व रात्रीं २।३ वेळां पोलिसांची हजिरी घ्यावी, असा पोलिस अधिकाऱ्यांनीं हुकूम दिल्याचें समजतें.

इटलीचा राजा हंबर्ट याणें गरीब लोकांकरितां या वर्षी ५०,००० मार्कस दिले आहेत. तसेंच त्यांची राणी मार्गारेट इणेंही या सालीं जवाहीर, तसबिरा वगैरे दुसर चैनीचे जिन्नस विकत घ्यावयाची रकम तिकडे खर्च न करितां ती सगळी गरीब लोकांना धर्म करण्याकडे दिली आहे. या सालीं जवाहिराची वगैरे खरेदी व्हावयाची नाहीं! असा कनवाळूपणा राजाच्या अंगीं असल्यावर प्रजेची दैन्यावस्था नाहींशी होण्यास काय उशीर!

तपकीर लंडन शहरीं तरुण पुरुषांमध्यें लोकप्रिय होत चालली आहे असें समजतं आमच्या इकडे 'बिडी' हंत चालली आहे.

थंडी होऊन पडसें आलें असतां रात्रंदिवस थंड वाऱ्याच्या झोतावर बसावें असें एक जर्मन वैद्य सूचवीत आहे.

लंडन शहरीं बंडखोरांबद्दल अशी भीती उत्पन्न झाली आहे कीं, बोलतां सोय नाहीं. शहरच्या पोलिस व लष्करी लोकांमध्यें जी तयारी दिसत आहे तशी तयारी कित्येक वर्षांत दिसून आली नाहीं. बकिंगहाम राजवाड्याच्या भोंवतीं सक्त पहारा बसला आहे एकंदर ३४६ लोक त्या एकट्या राजवाड्याभोंवतीं पहाऱ्यावर आहेत. प्रत्येक कोंपरा, आडोशाची जागा सर्व ठिकाणीं पोलिस आहेच. त्याशिवाय गुप्त पोलिस जागोजाग अहेच. आणि राणीसरकार जेव्हां वाड्यांत असतात तेव्हां वाड्यात जिकडे तिकडे पहार असतो. तसेंच प्रिन्स आफ वेल्स शहरांत रहावयास आल्या पासून मार्लबरो राजवाड व सेंट जेम्स राजवाडा यांजवरील पाहारेकरी ही द्विगुणित केले आहेत. क० त०

मद्रास इलाख्याचा जंगलाचा कायदा जें गोदावरी जिल्ह्यांतील गोवळ कोंडा डोंगरांस लागू करण्याचा विचार चालू आहे.

मद्रास बेझवाडा रेलवेचा दक्षणेकडील फाटा मद्रास एनोर हा करण्याचें ठरलें असून त्या करतां १२,००,००० रुपये लागतील असा अनुमास आहे.

हिंदुस्थानांतल्या टांकसाळा पुन्हा सुरू करण्याचा विचार चालू झाला आहे.

गोन्हा येथें नुकताच मोठा डोंगर ढासळून तो एक मोठा तलाव आपोआप बनला तेथून हरिद्वार पर्यंत सरकारानें आतां तारायंत्र केलें असून त्यास सुमारें ५० हजार रुपये खर्च झाले असून सरकारानें ही एवढी मोठी रकम विनाकारण खर्च केली असें लोकांचें म्हणणें आहे.

अमेरिकेंत निरुद्योगी लोकांचा भरणा फार झाला असून त्यांची फार वाईट स्थिति आहे असें सांगतात.

इंग्रजसरकारानें झांजीबार खालसा करून उगंडांत सामील करावें असें इंग्रजांचें ह्मणणें आहे.

---

### नोटीस

रा. रा. भावसींग वा। मानसींग गावंडे राहणार दापूरें तर्फ झेसांग तालुके अकोलें यांस खालीं सही करणार इजकडून नोटिशीनें असें कळविले जातें कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे असून आज सुमारें पांच वर्षे जाहाली माझे मामाच्या घरीं तुह्मी मजला मी आंधळी जाहले ह्मणून आणून घातली. तुह्मा पासुन मजला दोन मुली झाल्या होत्या त्या मरण पावल्या. मी तुमचे पाशी असतांना तुह्मास महारोगाची व्याधी झाली व ती हल्लीं इतकी वाढली आहेकीं कोणच्याही प्रकारानें तुह्मी चार माणसांत वापरण्यासारखे नाहींसें जाहला. मी अंधळी जाहाले त्यावेळीं मजला अशी धमकी व धाक तुह्मी घातला कीं जर तु मजपाशी परत येशील तर तुजला कांहीं तरी इजा अशी करीन कीं, तू माणसा मधून नाहींशी व्हावीस वगैरे फार भय घातलें. मी माझे अंधपणास दवा वगैरे करून नीट जाहले. आज पावेतो मोल मजुरी केली व शिवाय लोकांचें कर्ज रुपये दवा पाण्यासुद्धा [ ३०० तिनशे ] काढून कसा तरी निरवाह केला तुह्मी तर अन्नवस्त्राची सोय कांहींच केली नाहीं. आता माझे कांहींच चालत नाहीं याज करितां तुह्मास ही नोटीस देऊन असें कळवितें कीं नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत मजला घेऊन जावें. घेऊन जाण्याच्या आगोदर चार जात भाई पंचाची अशी खात्री करून द्यावी कीं, माझ्या जिवास कांहीं एक काडी इतकी इजा होणार नाहीं. शिवाय तुह्मी माझे पोटापाण्याची व वस्त्राची व राहण्यास जागा याची सोय निराळी करून द्यावी. कारण तुह्मास महा रोगानें व्यापलें आहे तुह्मी मी सदरील लिहिले प्रमाणें ( ८ ) दिवसांत तजवीज केली नाहीं तर मी तुमची हीच सोडचिट्ठी समजून दुसरा घरठाव करीन आणि खावटीचे रुपये बद्दल सरकारांत काम चालवून सर्व रुपये घेईन. मग तुमचा नवरेपणाचा हक्क कोणचे ही प्रकारचा मजवर नाहीं तुह्मास आगोदर सर्व कळविलें आहे. काय तो निकाल नोटीस पावल्या पासून ८ दिवसांत करावा. असें जाहालें नाहींतर नोटीशीत लिहिल्या प्रमाणें माझी मी तजवीज एकदम करणार हे तुह्मास कळावें. तारीख २ माहे मे सन १८९४

( सही ) सहीची निशानीं बांगडी

अजो मर्द भावसींग गांवडे राहणार ऊगवे इच्या हात चे

असें.

---

### नोटीस.

रा. रा. काशिनाथ शंकरअप्पा वाणी यांच्या दुकानचे वहिवाटदार रा. रा. तुकाराम नारायण गुमास्ते दुकान कसबें अडगांव तालुके अकोट—यांसी

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचे दुकानीं तारीख ११-२-९४ रोजीं आह्मी सोनें १९ तोळे १० मासे व चांदी ११० तोळे असें अमानत ठेविलें त्या बद्दलची मागणी आह्मी केली असतां तुमचा देण्याचा हेतु दिसला नाहीं करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पोंचल्या तारखे पासून तीन दिवसांत वर लिहिलेली अमानत आह्मास परत देऊन आमची पावती घ्यावी. त्या प्रमाणें न केल्यास आह्मास दिवाणी कोर्टांत दावा करणें भाग होईल आणि तसा प्रसंग आल्यास सर्व निकाल होई पर्यंत नोटिशीचे तारखे पासून अमानत ठेवीच्या रकमेवर दर शेंकडा दरमहा २ रुपये व्याज, नोटिशीचा खर्च वकीलनाद टलचें तुम्हास द्यावा लागेल कळावें तारीख २९ एप्रिल १८९४ इ.

सही.

मिठाराम वा। किपन अज्ञान पालन करणार आजी मेनाबाई मर्द सोजानी तर्फे कुलमुखत्यार मारुती परशराम गुमास्ते दुकान अडगांव दस्तुर खद.

---


## घड्याळ.

किं. ६ रुपयें हमी—३ वर्षाची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेळवे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, जिवलचे ( ह्मणजे चक्राचें खालीं हिरा बसविला आहे ) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनीचे काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचे नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदा घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक

---

NEARLY READY

## CRIMINAL COURT MANUAL.

*for the*

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws ), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.


---

☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अंकास ......................८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०१
दुसरे खेपेस ......०।

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs per line over10... 4 as
Repetition per line 3 as

THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 14 MAY 1894 NO 19

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १४ माहे मे सन १८९४ इ० अंक १९

## चार तास हाऊन गेले आतां आशा सोडा.

अरे देवा! मी तीन चार तास व्यर्थ घालविले ते जर परत आणतां आले असते तर किती मजा झाली असती. पहा! एका क्षणांत मनुष्यावर किती संकटें येऊन पडतात.!!

मिस्तर जेम्स कार्टीस आणि मिस्तर सी. एस बेनेट हे दोघेजण पुष्कळ वर्षें अगदीं जिवलग मित्र होते. ते सॅन फ्रान्सिसको शहरांत रहात असत. गेल्या उन्हाळ्यांत पहिल्याच वेळेस एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून बरेच भांडले. सुविचार मनांत आले व पुन्हा त्यांची गट्टी जमली परंतु एकदां घडी बिघडली ती बिघडली. विचार देवीनें आपल्या स्मरण वहींत टिपून ठेवलें होतें. ते एकमेकां पासून अलग राहण्या बद्दल खबरदारी घेत होते. ह्या दृषांची गाठ एका रस्त्यांत पडली. पुनः भांडण सुरू झालें. कार्टीसच्या मुखातून फारच कठोर व काळजाला झोंबण्या सारखे शद्ब निघाले आणि त्यांनीं रागाच्या सपाट्यात पिस्तुल काढली व बेनेटवर झाडून त्यास लागलीच राम ह्मणावयास लावलें. पुढेंही तो स्वनिंदेनें व दुःखानें गांडला गेल्यामुळें बरच्या सारख्याच कालों कण्या वाहत असे.

हें पहा असें वागणें किती निरर्थक, क्षुद्र कामाचें व दांभिक आहे बरें!

परंतु करटीस ह्मणत असे कीं एका क्षणांत मनुष्यावर कोणतीं संकटें येतील ह्याचा नेम नाहीं. असें आरणास क्षणभर बरें वाटतें परंतु ह्या पेक्षां दुसरा अगदीं खोल विचार आहे तो कोणाच्या ध्यानांत येतो? ह्या संकटाचें खरें स्वरूप समजलें नाहीं तर कांहीं चिंता नाहीं. तर ह्याच मुद्यावर दुसऱ्या एका गोष्टीचा विचार करूं.

एक सुज्ञ बाई ह्मणते कीं सन १८६० सालीं अक्टोबर महिन्यांत मला असा ज्वर जडला होता कीं त्यातून मी वाचेन असें मला वाटत नव्हतें. माझ्या शरिरांत सर्व ठिकाणी वेदना होऊं लागल्या व खोकल्यानें मला इतकें जर्जर करून टाकलें कीं माझ्या शरिराचा चुरा होत होता कीं काय असें मला वाटलें. मी बिछान्यात पडून राही परंतु रात्रंदिवस झोप ह्मणाल तर दवाचें नांव. माझ्यानें उठून बसवत नसल्यामुळें मला चमच्यानें अन्नास माझ्या तोंडात घालीत असत. माझी छाती इतकी धडकत असे कीं ती उशीवर तुह्मास साफ पाहिलें असतां दिसून येईल.

आणि वेदना इतक्या जालीम होत होत्या कीं जसें कोणी मला भोसकत आहे. मी अशी पंगु होऊन अंथरुणाशी खिळून राहिले व मला दम बरोबर घेतां येईना. वैद्य लोक आह्मास सतत एक महिनाभर औषधोपचार करीत होते. परंतु दिवसानुदिवस क्षीण होत चालले. कधीं कधीं रात्रीं माझी अशी गाळण होऊन जाई कीं सकाळ पर्यंत मी जगेन किंवा नाहीं ह्याची मला शंका वाटत असे. ह्यांनीं आपल्या दुसऱ्या वैद्याची सल्ला मसलत घेऊन असें ठरविलें कीं हा रोग बरा होणें कठीण आहे. मला तकवा आणण्यास थोडीशीं दारू पाजीत असत. माझे यजमान व मुलगी नेहमी माझ्या जवळ असत. कोणत्याही औषधा पासून मला काही इतका गुण ह्मणून आला नाहीं मी आतां यमसदनीं जाणार असें मला वाटूं लागलें.

अशा वेळीं स्निग्ध जवळच्या मोठ्या गांवांतील मिसेस किलींग माझी मत्रीण होती ती धावून आली व मला मदर सिगेलचे क्युरेटिव सिरप (ह्मणजे माता सिगेलचा रोग हारक पाक) घेण्यास गळ घातली. मी लागलीच एक बाटली पैदा करवून औषध घेण्यास सुरू केलें. थोड्याच दिवसांनीं मला अन्न घेत. येऊन पचविण्याची शक्ती आली आणि वाईट लक्षणें कमी होत चाललीं. ह्यावरून असें दिसून येतें कीं ज्या उपाधीनें ह्रिच्या शरिरात आपला पूर्ण अम्मल बसवून इतक्या शिखरास पोचविला होता कीं तिच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आपल्याला उपाधि समजो वा न समजो परिणाम असाच व्हावयाचा. कार्टीसनें जो अपराध केला होता त्याचें मुख्य कारण त्याचें एकदम रागावणें व त्या भरांत धिःकार व सूड घेण्याच्या विचारास उत्तेजन देणें व मन असल्या दुष्ट हेतूस स्वाधीन होऊन अशा प्रकारचे खून करण्यास तयार होणें हें होय. ह्याचप्रमाणें ह्या बाईच्या रोगाची उपाधि ह्मटली असतां अग्निमांद्य व अजीर्ण होय. कीं जी अखेरीस बेकाम होऊन जिवास धक्का बसविण्यास कारणीभूत झाली ह्याचें सार ह्मणाल तर एकच. अरिष्टाची टेहळणी प्रारंभींच करावी व पुढें वाढूं देऊं नये ह्मणजे तें अरिष्ट आपल्या आटोक्यांत सहज ठेवतां येतें.

ह्या औषधीच्या सहा बाटल्याचा फन्ना केल्यावर माझी तब्येत पूर्ण ताळ्यावर आली आणि तीस वर्षांपूर्वीं पेक्षां मला आतां हजार हिशानें बरें वाटत आहे. माझ्या दोन मुली पण अजीर्णापासून त्रासल्या होत्या त्या ह्या औषधानेंच बऱ्या झाल्या. मला कोणी विचारतील त्यास मी मोठ्या आनंदानें सांगेन.

(सही) मिसीस लुई ज्याकसन
बिल्डर्स आर्मस हॉटेल
ब्रिजगेट, ह्यामरस्मिथ, लंडन
तारीख १४ माहे जानेवारी सन १७९२.

वर लिहिलेल्या ओळी ज्या पत्राचें सार आहे त्यांत मिसीस जानसन बाइ असें प्रदर्शित करिते कीं सन १८६० च्या अक्टोबरांत जें दुखणें लागलें होतें त्याच्या वीस वर्षांपूर्वीं तिचे पित्ताशय व पक्काशय बिघडले होते आणि थोडें जरी खाल्लें तथापि तिच्या पोटांत कळा मारीत. तिला थकल्यासारखें व गळून गेल्यासारखें आणि उदास झाल्यासारखें वाटे आणि पोट अगदीं खोल गेल्यासारखें वाटल्यामुळें तिला फारच वाईट वाटे. तिच्या छातींत बरगड्यांत तीव्र वेदना होत, छातींत धडधड होई. घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घरीं कोणी तरी उचलून आणीत. F. L.

## विजयादशमीचें सोनें

(मागील अंकावरून पुढें चालू)

Thou who didst waken from his summer-dreams
The blue Mediterranean, where he lay
Lull'd by the coil of his crystalline streams
Beside a pumice isle in Baiae's bay,
And saw in sleep old palaces and towers
Quivering within the wave's intenser day,
All overgrown with azure moss and flowers
So sweet, the sense faints picturing them! Thou
For whose path the Atlantic's level powers
Cleave themselves into chasms, while far below
The sea-blooms and the oozy woods which wear
The sapless foliage of the ocean, know
Thy voice, and suddenly grow gray with fear
And tremble and despoil themselves: O hear!

वायीच्या उपसागरीं लहानगीं बेटें तया भोंवती ॥
मंजुध्वान अहा! असंख्य उठती स्वच्छाप्रपातांचे किती ॥
भूमध्यस्थित सागर श्रवण ते होताचि निद्रा वरी ॥
त्याला हालवुनी प्रभंजन! वदे बा कोण जागे करी ॥ १३ ॥
शेवालें भरलें फुलें विनटले प्रासाद उल्हेखवा ॥
हाले तत्प्रतिमूर्ति दिव्यलहरी मध्यें अहा! नेघवा ॥
ती शोभा — (मति ना कळीच कथना) पाहोनि निद्रा वरी ॥
त्याला हालवुनी प्रभंजन! वदे बा कोण जागे करी ॥ १४ ॥
द्याया वाट तुला पहा! सरळसी लाटा महासागरीं ॥
गर्ती भूतहि हिंडती — वरी जसो खालीं स्थिती ना बरी ॥
ऐकोनी तव घोष नीरसदला वल्ली लता अर्णवच्या ॥
भीतिनें सहसा मरोनि पडती ऐकें गड्या! महद्या ॥ १५ ॥

## इंदूर संस्थान

इंदूर संस्थानचा सन १८९२—९३ सालचा जो वार्षिक रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्या वरून पहातां श्रीमंत महाराज होळकर सरकार यांनीं संस्थानांतील प्रत्येक खात्यांतून नवीन नवीन पुष्कळ सुधारणा अमलांत आणल्या आहेत असें दिसतें. महाराज संस्थानांतून दवरा करावयास निघाले ह्मणजे खेडोपाडीं जातात, तेथील गरीब रयतेचीं गाऱ्हाणीं स्वतः अथवा आपल्या एखाद्या विश्वासुक कामगारा कडून ऐकून घेऊन त्याचा तपास करतात. महाराजांनीं आपले संस्थानांतील गरीब लोकांवर एका बाबींत मोठा उपकार केला आहे. ती बाब ही कीं, जंगलांतून लहान लहान मोळ्या किंवा कवाडे आणून व तीं विकून त्यावर उपजीविका करणाऱ्या लोकां कडून पूर्वीं कर घेण्यांत येत असे तो महाराजांनीं अजिबात बंद करून टाकला. ही गोष्ट जरी प्रथम दर्शनीं क्षुल्लक वाटते तथापि गरीब लोकांस तिचें महत्व केवढें आहे हें कोणाही विचारी मनुष्यास समजणारें आहे. दुसरें कित्येक अमीन अथवा महालकरी कामदार लोक एकाच जागीं पुष्कळ वर्षें काम करित असत व कित्येक तर पिढीजात तींच कामें करित आहेत. आपल्यास काम होईनासें झालें ह्मणजे आपल्या आप्त वर्गांपैकीं कोणास त्याच कामावर लावून घेऊन नोकरी पिढीजात करावयाची अशी वहिवाट असे ती महाराजांनीं बंद करून अशा सर्व कामगारांच्या बदल्या केल्या व एकाच जागीं कोणी ही कामगार तीन वर्षां पेक्षां जास्त दिवस होईल तों पावेतों ठेवला जाऊं नये असा हुकूम केला. तिसरें कोणत्याही कामगारानें आपलें नातलगास वगैरे कोणतेही गांव इजाऱ्यानें देतां कामा नये असा हुकूम केला आहे. खुद्द महाराज सरकार यांनीं हा नियम आपलेही आप्त वर्गास लागू केला आहे. या वरून महाराज निःपक्षपाती आहेत असें लोकांस सहज समजणारें आहे. चवथे जमिनीचा सारा किंवा कर हे पूर्वीं कांहीं धान्याचे रूपानें वगैरे घेण्यांत येऊन त्यांत महालकरी वगैरे लोकांना संस्थानचे नांवावर बराच हत मारण्यास सांपडत असे. व तेणेंकरून रयतेचे व्यापारासही अडथळा होत असे, करितां महाराजांनीं ही पद्धत अजिबात बंद करून टाकली. या जातीच्या लहान सहान सुधारणा पुष्कळच केल्या आहेत. सन १८९१-९२ सालीं संस्थानचें उत्पन्न ७२१३१३१ झालें. त्या पूर्वीच्या सालचें उत्पन्न ६८६२९७० होतें. खर्च सुमारें ६१७१३२८ झाला. वरील उत्पन्ना पैकीं ऐन जमा ६१६८३३५ झाली यांत खानगी खर्च नाहीं. खानगी खर्चांतही पुष्कळ काटकसर केली आहे. खुद्द इंदूर येथील व्यापार एकंदर १०६९१७३१ रुपयांचा झाला. हा गत साला पेक्षां म्हणजे १८९० पेक्षां कमी आहे असें लिहिलें आहे. कारण आफूचें उत्पन्न कमी झालें. संस्थानांतील

गिरणींचीं कामें समाधान कारक आहेत. पोलीस लोक आपलीं कामें बरोबर बजावीत नाहींत. रयतेवर पाहिजे तसा जुलूम करून वाटेल त्याची अब्रू घेण्यास ते यत्किंचित मागें पुढें पाहात नाहींत म्हणून हल्लीं जी ब्रिटिश राज्यांत चोहोंकडे ओरड चालू आहे त्या संबंधाची महाराजांनीं आपले संस्थानांत जी व्यवस्था केली आहे ती पाहिली म्हणजे महाराजांची करावी तेवढी प्रशंसा थोडीच होणार आहे. कोणताही कैदी पोलिसाचे ताब्यांत २४ तासा पेक्षां जास्त वेळ असूं नये व जास्त वेळ ठेवणें इष्ट वाटत असेल तर त्यांनीं माजिस्ट्रेट यांची आधीं मंजुरात आणली पाहिजे असा महाराजांचा सक्त हुकूम आहे. माजिस्ट्रेट यांनीं अशी मंजुरात देण्यास कांहीं सबळ कारण आहे कीं कसें याबद्दल स्वतः कैद्यास बोलावून आणून विचारपूस करावी व नंतर काय हुकूम करणें तो करावा. २४ तासांपेक्षां जास्त वेळ कैदी पोलिसाचे ताब्यांत हुकुमा शिवाय राहून त्यास कांहीं तखलीफ झाल्यास पोलीस यांस जबाबदार धरला जाईल असा कडक कायदा केला आहे. शिक्षणाकडे महाराजांचें फार लक्ष आहे. जातिभेद वगैरे ते मुळींच लक्षांत आणीत नाहींत. स्थानिक स्वराज्याची मात्र संस्थानांत थोडी कमतरता आहे याचें कारण लोकांस अद्याप त्याचें समजावें असें महत्व समजलें नाहीं. त्या कारणानें लोककल्याणाकरितां फुकट कामें करण्या इतकी त्यांचीं मनें प्रगल्भतेस आलीं नाहींत म्हणून रिपोर्टांत उल्लेख आहे. असें एकंदरीनें पाहता श्रीमंत महाराज होळकर सरकार व त्यांचे दिवाण रावबहादूर बेदरकर हे उभयता अत्यंत स्तुतीस पात्र आहेत यांत संशय नाहीं. R

# वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ९ शके १८१६

डाक्टर भांडारकर व रावबहादूर रानडे यांनीं एक अत्यंत महत्वाचा प्रश्न सर्व राष्ट्रा पुढें मांडला आहे. पदवीवाले लोक लवकर मरतात याला कारणें कोणकोणतीं आहेत. व तीं दूर कशीं केलीं पाहिजेत हा मुख्य वादाचा प्रश्न आहे. या प्रश्नाचा खल जितका होईल तितका फार थोडा. याच्या निकालावर सर्व राष्ट्राचें हिताहित अवलंबून आहे. राष्ट्राचे भावी आधारस्तंभ म्हणजे ही पदवीधर मंडळी होय. त्यांच्या चिरंजीवित्वावर सर्व देशाची मोठी भिस्त आहे. कधीं कधीं असेंही वाटतें कीं हा प्रश्न या पूर्वींच निघाला नाहीं हें फार अत्यंत नुकसानीस कारण झालें. डाक्टर भांडारकर व रावबहादूर रानडे यांच्यामध्यें मतभेद आहे तो मुख्य गोष्टी विषयीं नाहीं. ही गोष्ट निर्विवाद ठरली आहे कीं पदवीवाले लोक लवकर मरतात आणि याला मुख्य तीन कारणें आहेत. विद्यार्थ्यांची गरीबी, अभ्यासक्रमाचा कडकपणा, व सामाजिक अकल्याणाच्या चालीरिती अशीं मुख्य कारणें आहेत. डाक्टर भांडारकर शेवटील कारणावर जोर देऊन पहिल्या दोन गोष्टींचा आपल्या वादांत बहुतेक लोप करितात. शिवाय युनिव्हरसिटीच्या अभ्यासक्रमाविषयीं त्यांचा आग्रह असा आहे कीं कालमानाकडे नजर दिली म्हणजे हा अभ्यासक्रम कमी करितां येत नाहीं व परीक्षाही कमी कडक करवत नाहींत. सर्व पाश्चिमात्य राष्ट्रांशीं इंडियन लोकांस टक्कर मारावयाची आहे. तेव्हां या बिकट जीवनकलहाच्या तडाक्यांत आपल्या लोकांचा निभाव या जबरदस्त विद्येच्या व्यासंगा शिवाय होणें नाहीं. लोक मरोत किंवा तरोत ही बिन तोंडाची गोष्ट आहे. ही विचाराची कोटी राव बहादूर रानडे यांस कबूल नाहीं. त्यांचें म्हणणें कीं लोकांची ज्या बाजूनें आयुर्हानि होणार नाही व त्यांच्या मानसिक शक्ति वाढतील असा विद्याव्यासंग युनिव्हरसिटीनें ठेवावा. विद्यासंपादन करणें हा एक वरील गोष्टी साध्य होण्यास उपाय आहे. तेव्हां जी वस्तु साध्य करून घ्यावयाची आहे तिचा ऱ्हास उपायावर अति आसक्ति ठेऊन करावयाचा नाहीं. औषध प्रकृती नीट करितें म्हणून औषधें अती घेऊन प्रकृती मातीमोल करावयाची नाहीं. विद्यार्जन लोकांच्या ती साठीं आहे त्या अर्थी लोकं मरतील इतके भारी विद्यार्जन नको.

आम्हास लिहिण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं वर राव बहादुर रानडे यांचा अभिप्राय दिला आहे तोच अखेर लोकमतास कबूल व शिरसावंद्य झाला आहे. कलकत्ता युनिव्हरसिटीनें आपल्या कृतीनें त्या अभिप्रायाचें यथायोग्य मंडन केलें आहे. त्या युनिव्हरसिटींत या वेळे पर्यंत वैद्यक शाखे कडील एम. डी पदवी मिळण्यास बी. ए. च्या पदवीची अट होती ती दूर करण्यांत आली आहे. अशा सारखाच प्रश्न मुंबई युनिव्हरसिटी पुढें होता कीं मेडिकल कालेजची प्रवेश परीक्षा म्याट्रिक्युलेशन परीक्षा आहे तिच्या ऐवजीं प्रीव्हियस किंवा इंटरमिजियेट परीक्षा ठेवावी. अखेरीस मोठें तुमुल वाग्युद्ध होऊन हा प्रश्न अद्याप तसाच राहिला आहे. या वादाच्या वेळेस डाक्टर भांडारकरांनीं आपल्या ज्ञानभांडारांतून एक अजब कोटिक्रम लोकासमोर आणिला होता. ते म्हणाले कीं आमचीं घरें बांधतात त्या इंजिनियर पदवीवाल्यास प्राव्हियस परीक्षा आर्ट शाखे कडील लागते आणि जे आपल्या मालमत्तेचें संरक्षण करितात त्यास एल. एल. बी. होण्या पूर्वीं बी. ए. ची पदवी मिळवावी लागते तेव्हां ज्या डाक्टरांच्या हातीं आपण आपला प्राण देणार त्यांना नुसती म्याट्रीक्युलेशन परीक्षा पुरेशी नसून बी. ए. पेक्षां ही पुढील परीक्षा लागू केली पाहिजे. वर वर हा विचार दिसण्यांत चांगला दिसतो पण हा तत्वशः चुकीचा आहे. कलकत्ता युनिव्हरसिटीमध्यें हा वाद निघाला होता परंतु बहुमतानें असें ठरलें कीं धंद्याच्या शिक्षणा मध्यें उच्च प्रतीच्या शिक्षणाचा गोंधळ करूं नये. उच्च प्रतीचें शिक्षण होईल तितकें चांगलें परंतु तेवढ्यासाठीं डाक्टरांच्या धंद्याचे विषयांस उच्च शिक्षणाची जरूरी आहे असें कांहीं नाहीं. उलट वैद्यकी सारख्या धंद्यांतल्या विषयामध्यें पारंगतता होईल तितकी अगोदर पाहिजे. तेव्हां वैद्यक विषयांचा अभ्यासक्रम वाढवावा व परीक्षा कडून घ्याव्या आणि नंतर एम. डी. ची पदवी द्यावी परंतु ही महत्वदर्शक पदवी मिळविण्या साठीं बी. ए. परीक्षा देणें जरूर नसावें. हा विचार डाक्टर म्याकडोनाल्ड सारख्या विद्वानांनीं सांगितला आणि म्हणूनच तो बहुतजणांनीं ग्रहण केला. गेल्या तीस वर्षांत अवघे पांच अगर सहा एम. डी. झाले असतील. ही संख्या फार कमी आहे याचें कारण बी. ए. ची अट वृथा ठेविली होती हें आहे.

अलिकडे पाद्री लोकांच्या टोळ्या आमच्या प्रांतांत फार झाल्या आहेत. गांवोगांव व खेडोंखेडीं हे भट आपल्या ख्रिश्चियन धर्माची तुतारी वाजवीत असतात. फार करून आतां त्यांच्या गोड भाषणाच्या जाळ्यांत क्वचित एखादें सावज सांपडतें. ख्रिश्चियन धर्माचा प्रसार तर होतच नाहीं शिवाय आमच्या धर्माचें महत्व काडीमात्र कमीही होत नाहीं. हिंदुधर्म अनादि काला पासून चालत आला आहे हाच त्याचा मोठपणा नाहीं. त्याच्यांतील धर्ममतें कोणी खोडू शकत नाहींत व हिंदुधर्मांतील वेदान्ता सारखा विचारदर्शक दुसरा भाग कोणत्याच धर्मांत आढळत नाहीं. जातिभेद वगैरे गोष्टी अलिकडच्या आहेत त्यांच्या उणिवांशी मूळ धर्मतत्वांचा कांहीं विशेष संबंध नाहीं.

कलकत्याचे प्रसिद्ध विद्यानंद स्वामी शिकागो येथील धर्मपरिषदेस गेले होते. त्यांना अमेरिकेस धाडण्याचा पुढाकार मद्रासवाल्यांनीं घेतला होता. स्वामी विद्यानंद अमेरिकेंत हिंदुधर्मावर व्याख्यानें देत होते तेव्हां लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या व्याख्यानास जमत होत्या हिंदुधर्माचीं तत्वें लोकांनीं श्रवण केलीं तेव्हां श्रोतृसमाज आनंदानें माना डोलवीत असत. कांहीं पाद्री लोक असें ही बोलले कीं हे स्वामीराज आणखी कांहीं दिवस राहतील तर सर्व देश हिंदुधर्मानुयायी बनेल. हिंदुधर्म सांप्रतच्या स्थितींत असावा तसा संग्राहक नाहीं. हिंदुधर्म हा उपजतांच मनुष्याला इष्टेटी प्रमाणें प्राप्त होतो. ही विशेष प्रकारची समाजघटना झाली. परंतु जर कांहीं संस्कारांनीं परधर्मीयांस हिंदुधर्मीय करितां आलें असतें तर इंडियांतील पाद्री भटांस आरंभींच गाशा गुंडाळावा लागला असता. मिसेस आनि बिझांट या विदूषी बाईस हिंदुधर्माचीं मतें पसंत आहेत आणि त्या आतां याच मतांचें प्रकाशन सर्व जगभर करीत आहेत. स्वामी विद्यानंद यांनीं हिंदुधर्माचा विजय अमेरिकेंत केला आहे तो पाहून आम्हांस मोठा आनंद वाटतो. आपला मार्ग पुढील कोणता असावा हें स्वामी विद्यानंद यांनीं स्वकृतीनें दाखविलें आहे. मूळ धर्मबीजाचा आपण आश्रय करावा, आपल्या चालीरिती सुधाराव्या आणि हिंदुधर्माचा सर्व पृथ्वीभर प्रसार होईल तितका करण्यास विसरूं नये.

लार्ड लान्सडाऊन विलायतेस गेले परंतु त्यांचा प्रतापदर्शक पुतळा इंडियांत चिरकाळ राहणार आहे. लार्ड साहेबांचा पुतळा संगमरवरी, भव्य व रमणीय तयार करण्यासाठीं वर्गण्या जमविल्या त्या ७०।८० हजारां जवळ जमल्या आहेत. याच पुतळ्या संबंधानें राजेरजवाड्यांवर वर्गणीचा जुलूम झाला अशा संशयावर सर बेडरबर्न साहेबांनीं स्टेट सेक्रेटरीस एक प्रश्न विचारला आहे. पुतळा फंड कमिटीच अध्यक्ष असा जबाब देतात कीं या वर्गणींत सरकारी अधिकाऱ्यांचें विशेष अंग नाहीं. आम्हांस तर सर्व प्रकार राक्षसी व मायावी वाटतो. काश्मिरच्या महाराजांस लार्ड लान्सडाऊन यांनीं पदभ्रष्ट केलें आणि त्याच साहेबांच्या स्मारकाला महाराजांनीं मोठी वर्गणी दिली आहे. मनुष्यस्वभाव या गोष्टी संबंधानें इतका कसा भिन्न झाला तें परमेश्वरांस ठाऊक! ग्वाल्हेरचे शिंदे सरकार अद्याप अल्पवयी आहेत. ते गादीवर देखील बसले नाहींत तर त्यांच्या नांवानें ५००० रुपये वर्गणी कोणी व कशी दिली हाही प्रश्न गूढ आहे. सर्वत्र राजा बोले आणि दळ हाले हाच सिद्धान्त खरा ठरतो. आमची पूर्ण खात्री आहे कीं राजेरजवाडे अधिकारी लोकांच्या शहांत अडकविले नसते तर त्यांच्या हातून लार्ड लान्सडाऊनच्या पुतळ्या साठीं सहस्रावधि रुपयांच्या वर्गण्या गोळा झाल्या नसत्या.

गोरे सोल्जरास काळा आदमी कःपदार्थ वाटतो. साहेब रागावला तर त्यानें बेधडक व निर्धास्तपणें नेटीवाचा खून देखील करावा. सर्व बाजूंनीं कायद्याच्या तडाक्यांत सांपडला व गोष्ट अगदीं निकराला पोचली तर या भयंकर मनुष्यवध करणाऱ्यास किरकोळ दंडाची वगैरे शिक्षा होते. परंतु जर कदाचित् त्या सोल्जरानें आपल्या गोऱ्या जातभाईचा खून केला तर त्यास सुळावर जावें लागतें दोन्ही प्रकारचीं उदाहरणें वारंवार लोकांच्या दृष्टीस पडतात. गेल्या पंधरवड्यांत पुण्यास व मुंबईस दोन सोल्जरास देहान्त शिक्षा झाली. त्यांनीं दारूच्या बेफामपणांत व धुंदींत आपापल्या पलटणींतील आफिसरांचे खून केले होते. दुसऱ्या पक्षीं डमडम येथील खून करणारा ओहारा साहेब निर्दोषी ठरला. मद्रासेस असाच प्रकार घडला होता. पंजाबांत मरीहून रावळपिंडीस जाणारा सरकारी टांग्यावरचा कोचमनाचा गेल्या महिन्यांत खून झाला. तो टांगा हांकीत असतांना वाटेंत [illegible] उंटवाले गोरे शिपाई भेटले. टांग्याला अडथळा झाला म्हणून त्यानें एका सोल्जरास वाट खुली करण्यास सांगितलें. साहेबाचें पित्त खवळलें आणि त्यानें लागलीच बंदुक झाडली आणि टांगेवाल्यास स्वर्गाचा रस्ता दाखविला. वायव्य प्रांतांतील बरेली येथें असाच भयंकर खून झाला. शेख मिठू नांवाचा दरवेशी अस्वलें व माकडें यांचे खेळ दाखवून निर्वाह करीत असे. गेल्या मार्चांत तो जेथें उतरला होता तेथें राफे नांवाचा सोल्जर आला आणि त्यानें त्या दरवेशाच्या विनवणीला न जुमानतां अस्वलांस फार त्रास दिला आणि पुढें मुकाट्यानें चालता झाला. दरवेशानें राफे पाशीं अस्वलांस छळल्याबद्दल पैसे बक्षीस म्हणून मागितले. दरवेशी आपला पिच्छा सोडीत नाहीं असें पाहून राफे यानें त्याच्यावर गोळी सोडली आणि त्यास मृत्यूच्या दरबारीं रवाना केलें.

कोण भयंकर खून हा! अत्यंत दुःखाची गोष्ट ही कीं राफ साहेब अलाहाबाद हायकोर्टांत निर्दोषी ठरला. हा ठराव पाहून मनाचा आंत्यका नाहींसा होतो न्यायाला तिळांजली मिळाली हें बघून सर्व जग चकित होईल: आरोपीचा बचावाचा पुरावा असा कीं दरवेशी राफच्या अंगाशी दांडगाई करूं लागला तेव्हां बंदुकीला हात लागून गोळी सुटली व अपघात घडला. पुष्कळ नेटीव साक्षीदार असें सांगत होते कीं अपघात कांहीं घडला नसून राफ यानें जाणून बुजून खून केला. नेटीव साक्षीदार खोटें बोलतात असा जुरीचा बहुमतानें पूर्वीच निकाल झाला होता. कांहीं तरी घडलें आणि खून होऊन देखील राफे साहेब दोषमुक्त ठरला!

'पायोनियर' सारखे नेटीवद्वेष्टे पत्रकर्ते देखील वरील प्रकरणांतला निकाल पाहून खेद दर्शवितात. मानवीं सृष्टींतला हा न्यायाचा मासला पाहिला ह्मणजे मनुष्याची बुद्धि कशी चळेल याचा नेम नाहीं असें वाटतें. वरील अन्यायावर पांघरूण घालण्यासाठीं दिनवाणीनें पायोनियर पत्रकर्ते ह्मणतात कीं इंग्लिश जुरर लोक आपल्या गोऱ्या बांधवा विषयीं बरोबर न्याय देत नाहींत. आणि हा दुर्गुण त्यांच्या हाडा मासांत खिळला आहे त्या अर्थी जुरीची न्यायपद्धति बंद करावी. हें ह्मणणें खोडसाळ पणाचें आहे. जुरीची न्यायपद्धति कांहीं वावगी नाहीं. ती उत्तम आहे. इंग्लिश जुरर असा अन्याय करितात तर इंग्लिश न्यायाधिश न्यायच करितील अशी कोठें खात्री आहे! आणि मग पोलीस लोक अन्याय व छळ करितात ह्मणून पोलीस खातेंच कां बंद करूं नये? पायोनियरचें ह्मणणें एका दृष्टीनें बरोबर आहे. जर पोलिसच्या चौकशीचा द्राविडी प्राणायाम, जुरर लोकांची वकीलांनी सल्लामसलत व न्यायाधिशाचा दांभिक निवाडा इत्यादिकांनीं दोषी मनुष्य निर्दोषी ठरतो तर या अवडम्बराचा वृथा खटाटोप व खर्च तरी गोऱ्या लोकां संबंधानें कशाला पाहिजे!

# The Berar Samachar

MONDAY MAY, 14 1894

## THE EDUCATED NATIVE HIS POSITION AND HIS RESPONSIBILITY

( continued from our last issue )

But many of our educated countrymen are taking undue advantage of the present state of society, beset with chaos and uncertainty, and are running into the excesses of unbridled recklessness, scepticism, ungodliness, and immorality. They entertain little regard for chastity of conscience. In ceasing to worship the gods and the goddesses of the Hindu Pantheon, the idols of their forefathers, they have altogether ceased to be religious-nay they have in many cases given up morality with religion, and think themselves to be above both. Some of them have altogether relinquished good principles. Some have deliberately crushed honesty under their feet. Some are totally lost to sobriety. Some are absolutely wanting in veracity. What a sad and grievous picture this must be! It is painful to observe that most of the educated natives should have no fixed religious and moral principle to stand upon. And in this matter they are worse even than the orthodox Hindoos, amongst whom there are thousands, whose honesty and purity are exemplary. Educated natives may boast of their close acquaintance with Western science and literature, with Tyndall and Tennyson—but can they boast of chastity of character and rigidity of religion? Can we point to the educated native, and, say here is one, who is superior to the rest of the community, not only as a pattern of intellectual excellence but also of moral purity? Were that the case, the moral reformation of the country would have kept pace with the progress of education, and the establishment of Schools and colleges. But purity is not generally learned in academies. It comes from above. It is the Almighty's gift. If educated men have not achieved a high standard of moral excellence, it is because they have forgotten their God, have discarded religious sympathy, and have neglected their spiritual interests.

Is there no hope then? Are we to fold our hands and sit quiet? Are we to assume dogged silence? Are we, as spectators of no concern, to look on the advancement of scepticism, ungodliness immorality, from age to age and generation to generation, under the deceptive garb of education? Should we not rather endeavour constantly to arrest the increasing growth of these evils? Is it not possible in due course of time, to rectify the evils consequent upon godless education, by exercising sound religious influences on the people Let us prior to all reforms, establish a pure and genuine Theistic Brotherhood in India. Faith is the mysterious and wonderful key to all reform and civilization. Some might step forward and say—" Sir, there are Samajas established such as those Bramho and Prarthana." These Samajas are endeavouring to refound the Aryan religion on the bases of its ancient ruins." But who will venture to deny the noble mission of these Samajas! It is accepted on all hands that the efforts of these Samajas are desirable and highly commended. It is perfectly true that the founders of these institutions were sincere and hardworking. Their cooperators also worked heart and soul for the spread of their mission. But it will not be far from truism, if it be said, that there exists a fatal and an immense number of nominal cooperators and nominal sympathisers. And what have they done? They have further subdivided our society which is already divided. They have sown the seeds of animosity and discussion. The tree is grown up; and the poisonous fruits are seen on it. They have furthered widened the gulf between the old and the new, the orthodox and the reformer, the educated and the uneducated, instead of endeavouring to bridge it over.

## वऱ्हाड.

हवामान—या आठवड्यांत उन्हाळ्याचें मान कमी आहे. आणि वारा चांगला सपाट्यानें वाहतो म्हणून विशेष उकाडाही होत नाहीं रोगराई विशेष म्हणण्या सारखी नाहीं.

रा. रा. वासुदेव विठ्ठल चांदेकर क्लार्क आफ कोर्ट, डेपुटी कमिशनर, उमरावती यांच्या जागीं रा. रा. हरिहर काशिनाथ यांची नेमणूक झाल्या मुळें राजश्री चांदेकर यांस सेशन कोर्टाचे क्लार्क आफ कोर्ट नेमिलें.

रा. रा. रामचंद्र भास्कर जयवंत उमराव ती हमाल काज कोडताचे क्लार्क आफ कोर्ट यांस १०० रुपयावर वाशिमास डेपुटी कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट नेमिलें.

नादारी मोकदमा नंबर $\frac{३०}{१८९४}$

नमुना नंबर ( जी )

विद्यमान नादारी कोर्टाचे जयडज्य जिल्हे आकोले.

सर्व लोकांस नोटीस देण्यांत येते कीं, चंद्रभान वा। सूर्यभान देशमुख राहणार मांझोड हा नादारी आहे असा आज तारीख २८ माहे एप्रिल सन १८९४ इ. रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख १६ माहे जून सन १८९४ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा आसामी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते आणि त्या बद्दल ज्या साक्षीस समन्स करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावी. ही नोटीस जमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पाहण्या करितां नादारानें दाखल केलेल्या याद्या उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यांस नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांणीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्या बद्दलचीं प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती याद्री टपाला कडून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिष्टरांत दाखल होतील कळावें.

B. B. Sule
Judge
Bankruptcy Court
AKOLA

नोटीस.

मीर नजरू वल्लद मीर भोलू राहणार सोनाळें तालुके जळगांव जिल्हे आकोला यांस

मीर शिकंदर वल्लद मीरबन्नू अज्ञान पालन करणार आई उमरावबी मर्द मीर बन्नू हल्लीं राहणार बावनबीर तालुका जळगांव याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं आज सुमारें आठ वर्षें होत आलीं मीर बन्नू वारले आणि तेव्हां पासून मी माझ्या बापाच्या घरीं आहे. आणि तेथेंच प्रसूत होऊन मला मुलगा झाला. आपण सर्व स्थावरजंगम इस्टेट सर्वच बळकाऊन बसला आहा. मुलाचे वडील चुलते मीर गव्हर हे पूर्वीं पासून वेगळे होते आणि त्यामुळें त्यांच्या पाशी असलेल्या जिनगीशी कांहीं संबंध नाही परंतु शेताचीं खातीं त्यांच्याच नांवानें अगर त्यांचा मुलगा याच्या नांवानें असल्यास मला ठाऊक नाहीं तुम्ही व मीरबन्नू हे एकत्रपणानें व अविभक्त होता आणि त्यामुळेंच सर्व इस्टेट तुमच्या ताब्यांत आहे. तुम्हीं खुद्द होऊन माझा व माझ्या मुलाचा सांभाळ कराल असें वाटत होतें परंतु तुमचें इमानें व नियत तशी नाहीं. आतां बरींच वर्षें वाट पाहिली. तुम्ही कांहींच उत्पन्न मला देत नाहीं व हिशेबही दाखवीत नाही. तुमच्या जवळ एक मळा आहे तो मीरबन्नू यांनीं निराळा विकत घेतला असून त्याच्यांत तुमचा भाईबंदाचा कांहीं हिस्सा नाहीं. तर तो सर्व मळा व बाकी जमीन जुमला वाटणी करून माझ्या मुलाचा हिस्सा मला पंच मार्फत परत द्यावा. आज पर्यंत आठ वर्षे तुम्ही उत्पन्न घेतलें आणि त्यांतील मला कांहींच हिस्सा दिला नाहीं तर मीर बन्नु मेल्या तारखे पासून सर्व शेताचा व जंगम मालाचा हिशेब द्यावा आणि निम्मी रक्कम माझी मला देऊन माझी पावती घेऊन जावें. तुमच्या जवळ पैसे नसल्यास सर्व इस्टेट आठ वर्षें पर्यंत माझ्या ताब्यांत द्यावी. मी त्याचा उपभोग तुमच्या इतकीं वर्षें घेतल्या नंतर मग वाटणी करून तुमचा हिस्सा तुम्हास परत देईन. बैल, गायी म्हशी, इतर चीजवस्त, रोकड, रक्कम व दागदागिना मीरबन्नू यांच्या मरणाच्या वेळीं तुमच्या ताब्यांत आला असेल त्यांची योग्य व्यवस्था व हिशोब मला दाखवावा. येणें प्रमाणें न केल्यास लाचार होऊन सरकार दरबार करावें लागेल. मुलगा मोठा होत चालला त्याच्या खाण्या पिण्याची व शिकण्याची तजवीज मला करणें आहे आणि मला आतां स्वस्थ बसतां येत नाहीं. तुम्ही मेहरबानीनें मी जी वर मागणी केली आहे त्या प्रमाणें व्यवस्था करावी. तसें न केल्यास मी फिर्याद करीन आणि मग माझें जें योग्य नुकसान होईल तें, या नोटिशीचा खर्च व कोर्ट खर्च या सर्व बाबी तुम्हास द्याव्या लागतील. नोटिशीच्या उत्तरास १५ दिवसांची मुदत दिली आहे तर तितक्या अवकाशांत काय ती तडजोड करावी. कळावें. तारीख ११ माहे मे सन १८९४ इ०

( सही )

मीर शिकंदर वा। मीरबन्नु अज्ञान पालन करणार आई उमरावबी मर्द मीरबन्नु यांचे साठीं दस्तुर करणार शेख हमजा वा। शेख इमाम मुसलमान राहणार बावनबीर दस्तुर खुद्द.

## वर्तमनसार.

आस्त्रिया, जर्मनी व इटाली या तिघांचें जें एकमत झालें आहे तो एकापा दुसऱ्यावर चालून जाण्या करितां नसून आपल्या बचावाकरितां आहे. आणि युरोपांत शांतता ठेवण्याची युरोपियन राजांची जी इच्छा आहे त्यावरून एकादी लढाई सुरू होण्याची भितीही नाहीं. तसेंच फ्रान्सानें इटालीशीं मित्रत्वानें वागूं नये असें करण्यास त्या त्रिकुटास कांहीं कारणही नाहीं असें ता० ३ रोजीं पारीस येथील कौंसलांत, एका फ्रेंच प्रधानानें बोलून दाखविलें.

राष्ट्राच्या इच्छेस लार्ड सभेनें मान दिला च पाहिजे, पण राष्ट्राची इच्छा अजमावून घेणें आवश्य आहे. इंग्लंड व ऐर्लंड या दोघांचा विभक्तपणा करणाऱ्या कायद्याचा मसुदा आजपर्यंत कोणत्याही सरकारानें पार्लमेंन्ट पुढें आणला नसून ख्रिस्ती देवळांचा खर्च कमी करावा असें ही आजपर्यंत कोणी प्रतिपादन केलेलें नाहीं असें, दादाभाई नौरोजी यास काला आदमी म्हणणाऱ्या लार्ड सालिसबरीचें ह्मणणें आहे.

विलायती कापडावर जकात घेण्याचें रहित केलें हें फार वाईट केलें अशाबद्दल मुंबई वगैरे ठिकाणच्या सभाकडून सरकाराकडे जरी हवे तितके अर्ज जात आहेत तरी अर्जदारांच्या ह्मणण्याप्रमाणें होण्याचा संभवच नाहीं असें सांगतात.

काठेवाडांतील दंगेखोरांशी इंग्रजी लोकांचा एक सामना होऊन त्यांत एक बडा इंग्रज कामदार ठार झाला.

ग्रीस देशांत आणखी एक धरणीकंप झाला व मागच्या धरणीकंपानें डळमळीत झालेलीं घरें जमीनदोस्त होऊन लोक फार विपत्तींत पडले.

हिमालय व्यांकेच्या डिरेक्टरांवर व्यांकेच्या सावकारांनीं शाहरणपूरच्या जज्ज कोर्टांत सहा लाख रुपयांचा हुकुमनामा मिळविला.

मरी येथून रावळपिंडीस जाणारा डांकेचा तांगा रात्रीं निघाला. आंत एक साहेब उतारूही होता. तांगा मरी पासून ५१६ मैल गेला. तेथें रस्त्यात लश्करी शिपायाचें सामान नेणाऱ्या वाहनाची गर्दी झाली होती. रस्ता मोकळा करण्याकरतां डाकेच्या तांगेवाल्यानें पुष्कळ उपाय केले. लश्करी लोकांच्या सामानाचे रक्षक शिपायी व तांगेवाला यांच्यांत बोलाचाली झाली व शेवटीं तांगेवाला फार गडबड करूं लागला असें पाहून लष्करी रक्षक शिपायानें गोळी घालून बिचाऱ्या तांगेवाल्यास ठार केलें. आंतला साहेब बचावला हें भाग्य ह्मणावयाचें.

आमच्या पलटणींतून फर्लो रजा घेऊन पंजाबांत जाण्या करितां दोघे पठाण निघून गेले असून त्यांनी हत्यारें व दारूगोळा नेला आहे असा संशय वाढे असें हांगकांग येथील इंग्रजी लश्करी कामदारानें रावळपिंडीच्या पोलिसास कळविलें. त्या पोलिसांनीं दोघां पठाणास पकडलें. एकाजवळ दोन पिस्तुलें व १९० काडतुसें सांपडलीं व दुसऱ्याजवळ एक पिस्तुल व १०० काडतुसें सांपडलीं. तपास चालूं आहे.

ट्रान्सकास्पियन रेल्वे सुरूं झाली कीं, रशियाच्या मध्यएशियांतील प्रांतांत कापसाची लागवड फार होऊं लागून तो व्यापार वाढणार आहे अशी इंग्रजास भिती आहे.

ठा. अ.

मूर्खपणाची पैज-- लोहारचाळींतील एक धुळव गोविंद नांवाचा १८ वर्षांच्या वयाचा शिंपी हा त्रिभुवन कन्हय्या नांवाच्या मनुष्या जवळ एक रुपयाची पैज मारून पाव बाटलीभर केरोसिन तेल प्याला व त्या मुळें बेशुद्ध होऊन त्याला गेल्याचे मागील शुक्रवारीं गोकुळ तेजपाल इस्पितळांत नेल्यावर औषधोपचार होऊन तो आतां बरा आहे.

न्या. सु.

खेळण्याचे पत्ते १३५० साली प्रथम छापले गेले. आज मितीस पत्यांचे १० कोट रुपयांचे जोड दर वर्षी खपतात! जगांत रिकामटेकडेपणा किती वाढत चालला आहे हें यावरून चांगलें उघड होतें.

विलायतेस विजेच्या चटया तयार झाल्या आहेत. त्या दरवाज पुढें पसरून ठेवाव्या. ह्मणजे त्यावरून मनुष्य येऊं लागला कीं घंटा वाजूं लागतात! पहा करीच हा!

अमेरिकेंत कांहीं पक्षी असे आहेत कीं, ते रात्रंदिवस उडत असतात! भक्षपही उडतां उडतां मिळवितात. उत्पत्तीही उडता उडतांच होते. पृथ्वींत काय नसेल!

न्यायसिंधु.

स्त्रियांना मिशा येत चालल्या आहेत— तुर्कस्थानांतील स्त्रिया हल्लीं आपणांस मिशा आणण्याच्या खटपटींत गुंतल्या आहेत. तिकडील स्त्रियापैकीं सुमारें दशांश स्त्रियाचे वरील ओंठ काळे दिसूं लागले आहेत.

मध्यप्रांतापैकीं सागर जिल्ह्यांतील लोकांचा तेथें दुष्काळ पडल्यामुळें उपासमार होऊं लागली आहे. बाहेर जिल्ह्यांतून आगगाडीनें तेथें धान्याचा पुरवठा होत आहे, पण धान्य विकत घेण्यास लोकांपाशीं पैसे नाहींत. मजूर लोकांस काम मिळावें ह्मणून आगगाडीचीं कामें सरकारानें काढलीं आहेत.

सार्डिनिया व बलगेरिया येथें लग्नामध्यें नवऱ्यानें बायकोच्या गालावर पायांतील बूट काढून मारण्याची चाल आहे.

जर्मनीमध्यें असा कायदा झाला आहे कीं पोटांत घेण्याच्या औषधांच्या बाटल्या वाटोळ्या असाव्या व बाह्योपचाराच्या औषधांच्या बाटल्या अष्टपैलू असाव्या. उलट सुलट औषध घेऊन अपघात होतात ते होऊं नयेत ह्मणून ही सावधगिरी असावी!

क० त०

राणीसाहेबांची स्वारी लंडनमध्यें येऊन दाखल झाली.

इंग्लंडचे समुद्रांतील किल्ले व बंदोबस्त फार चांगला आहे असें फ्रेंच लोकांचें ह्मणणें आहे.

अलाहाबाद येथील आग्रा व्यांक बद्दल चवकशी चालली आहे. बराच घोंटाळा बाहेर उघडकीस येत आहे.

हैदराबादेस हिंदु मुसलमानांत चुरस पडण्यास आरंभ झाला आहे.

न्युयार्कमध्यें एक गाडीवान आहे त्याला हात मुळींच नाहींत. तो एका पायांत चाबूक धरून गाडी हांकीत असतो.

सु० प०

"हिंदु" पत्रांत आलेल्या लेखा वरून कळतें कीं, अपर ब्रम्ह देशांत निरनिराळ्या जाग्यांवर २० ब्राम्हण लोक नोकरीस लागले असून ब्राम्हणेतर मद्राशी लोक तर तिकडे पुष्कळच गेलेले आहेत. मद्रासेंतील मुदलियार, नायडू; पिल्ले ह्या प्रसिद्ध घराण्यांतील पुष्कळ मंडळी तिकडे व्यापारांत पैसे घालून बसली आहे. धर्मसंबंधानें हिंदु लोकांला तिकडे कोणती ही हरकत पडत नाहीं. मंडाले येथेंच व रंगुनांत हिंदु देवालयांची सिद्धता आहेच. रंगुनांत एका स्मार्त ब्राम्हणानें हाटेल (खाणावळ) घातलें आहे, तो दरमाहा ४०० रुपये पगार पाडतो. आमच्या प्रजवेट मंडळीला सुद्धां अशी किफायत होत नाहीं" असाच फायदा इतर धंदेवाईकास ही होत आहे. ब्रम्ही लोकांशीं मद्राशी हिंदूचा इतर व्यवहार चालू झाला आहे, त्या प्रमाणेंच बेटी व्यवहार ही थोड थोडा होऊं लागला आहे. दोघां हिंदू अलिकडेसच ब्रम्ही स्त्रियाशीं लग्नें केलीं असें समजतें.

बंगळोर—येथें "चेंबर आफ् कामर्स" नांवाची व्यापारी मंडळी स्थापन होत आहे.

लढाईला १॥ वर्षांचा अवकाश—युरोपात लढाई जुंपण्याला रशिया कारण आहे, पण त्यांची अजुन तयारी नाहीं. रशियन सैन्याला "थीलाईन रायफल" बंदुका देण्यांत येत आहेत; त्या सर्व सैन्याला मिळण्यास आणखी १॥ वर्ष लागेल; तेथपर्यंत युरोपांत लढाई जुंपण्याची भीति नाहीं. फ्रान्स, व जर्मनी यांची तयारी आहे, पण त्याचा तूर्त कांहीं उपयोग नाहीं असें मि० फार्बस यांणीं नार्थ अमेरिकन रिव्यूंत लिहिलें आहे.

पोष्टलुटलें—सिल्हट जवळील कांगकून येथील पोष्ट हपिसाची लूट झाली.

आगबोट बुडाली—रंगूनच्या तारेवरून कळतें कीं गेल्या रविवारीं तिकडे वादळ होऊन त्यांत सेथी नावाची एक सयामी आगबोट बुडाली व ५० चिनी उतारु प्राणास मुकले!

तांग्याचीलूट—कच्छ मांडवी व भूज त्यांजमध्यें एका प्यासेंजरच्या तांग्याची हत्यारबंद चोरट्यांनीं लूट करून २००० रुपयांचा विषय नेला असें समजतें.

आगीनें ९ लाखांचें नुकसान—सक्कर येथील रेल्वे कडील जळाऊ लांकडाच्या वखारीस गेले आठवड्यांत आग लागून ९ लाख रुपयांचें नुकसान झालें.

जंगल खात्याकडील रेंजरच्या जागीं लष्करांतील नेटीव नानकमिशंड आफिसरांस नेमतां येण्यासाठीं नवीन नियम सरकारानें केले आहेत.

मुसलमानी पुनर्विवाहोत्तेजक सभा—मुसलमान लोकांत पुनर्विवाहाचा प्रचार करण्या साठीं बंगाल्यांत एक सभा स्थापन झाली असून तिच्या शाखा सर्व हिंदुस्थानांत करण्याचा विचार चालला आहे.

पायांत साप गेला कसा? कानपूर जिल्ह्यांत बिल्हार येथें एक मुसलमानीण नुकतीच मरण पावली तिच्या पायांस सूज आली होती, त्यांत एक जिवंत सांप सांपडला असें "अख्बर झमान" नांवच्या पत्रांत लिहिलें आहे.

हेडमास्तराचे कान कापले—बंगाल्यांतील बारिसाल जिल्ह्यांतील एका आंग्लोवर्न्याक्युलर शाळेंतील विद्यार्थ्यांनीं रात्रीं मास्तराच्या घरांत शिरून त्याचे कान कापून टाकले!! गुरु प्रेमाची परमावधि झाली!!!

स० शा०

अफगाणिस्थानचा अफूचा व्यापार अमीर मक्त्यानें देणार आहे.

बदलापुरास एक गृहस्थ भात भरडणें तांदुळ सडणें, व दळणें वगैरे कामें करण्याकरितां एक नवीन यंत्र तयार करीत असून त्यास या कामीं बरेंच यश आलें आहे. हा गृहस्थ कल्याणास एक स्वतंत्र कारखाना काढण्याचे विचारांत आहे.

म० मि०


## घड्याळ.

कि. ६ रुपये हमी-३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, निकलचे (ह्मणजे चकाचें खालीं हिरा बसविला आहे) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक विलायती काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदा घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्हॅ. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

NEARLY READY

## CRIMINAL COURT MANUAL.

for the
Hyderabad Assigned Districts
by
Mr. R. Obbard
[assisted by
Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to bo used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

दृढता हीं कमी न होतां उलट वाढत जातील. व या वरून ज्या पासून आपली भाडता होईल अशीं कृत्यें करण्याला मनाचा संकल्प झाला आणि त्याला धैर्यशक्तीचें अनुमोदन मिळालें म्हणजे जय आहे असा सिद्धांत आपण ठोकून देतों. आपली ज्ञानशक्ति व कर्मशक्ति यांचा प्रभाव किती आहे यावरच अटकळ करण्यामध्यें आम्ही कितीही फसलों तरी अनुभवाच्या ज्या ज्या प्रसंगीं काळीं त्याचा वास्तविक उपयोग झाला पाहिजे, त्या काळीं त्यांचा कि चूक उपयोग होईल हें अनिश्चित आहे याबद्दल मात्र आपणास कधींही संशय नाहीं पडत! प्रत्येक दिवशीं आपल्या कोणत्या तरी मित्राच्या परिवाराच्या आकस्मिक पडलेल्या शोकजनक मृत्यूची वार्ता ऐकण्याचा नशिबीं येते. याच प्रमाणें स्मशानभूमिवर हजारों लोक नेले जात असतात व त्या मध्यें दररोज पुष्कळ लोकांच्या आहुति पडतात. मग ते लोक आपल्या पेक्षां वयानें थोर असोत, लहान असोत, कितीतरी दक्षतेनें वागणारे असोत, उधळेपणानें वागणारे असोत; आणि ते निरर्जन रहाणारे असोत, नेमस्तपणानें रहाणारे असोत. ह्या सर्व गोष्टी आम्ही प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहातों. तरी आयुष्य वर्षानुवर्षें, दर वर्षी, दर महिन्यास, दर दिवसास, दर पळास आपल्या खटपटी चालूच असतात. (पुढें चालेल)

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य २ शके १८१६

सन १८९१ सालीं हिंदुस्थानची खानेसुमारी झाली त्यांतील कांहीं टिपणें व माहिती गोळा करून त्यांच्या आधारें 'इंडियाची सुधारणा व स्थिति' या विषयावर एक पुस्तक लिहिण्यांत आलें आहे. हा विषय खानेसुमारी कडील मुख्य अधिकारी मि. बेन्स यांनीं लिहिला असून त्याचें प्रकाशन सरकार मार्फत झालें आहे. या लेखावर सर्व इंग्लिश पत्रांतून स्तुति होत आहे आणि हा विषयच असा लिहिला आहे कीं तो कोणासही आवडेल. इंग्लिश लोक नेहमी प्रौढी मारीत असतात कीं इंडिया देश ब्रिटिश राज्यछत्राखालीं आला म्हणून त्याची बहुमत लागली. नाहीं तर हा केव्हांच रसातळास मिळाला असता! अमेरिकेत महाराणी सरकारचा बहुदा रेवणारे कांहीं इंग्लिशमन असेंही प्रतिपादितात कीं एशिया आणि आफ्रिका या खंडांतील लोकांचा पहिला भाग्यकाळ म्हणजे त्यांच्यावर ब्रिटिश राज्याची स्थापना होण्याचा काळ होय. असा स्तुतिपाठ प्रस्तुत पुस्तकांत मि. बेन्स साहेबांनीं अंतर्गत भरला आहे. स्वाभिमान व स्वदेशप्रीति व आत्मस्तवन या गोष्टी कोणास प्रिय नसतात! इंग्लिश लोकांचें राज्य आम्हांवर आलें नसतें तर आमचें काय झालें असतें हा प्रश्न मि. बेन्स साहेबां प्रमाणें आम्हास बरोबर सोडवितां येत नाहीं; परंतु आतां मात्र एवढी गोष्ट खरी कीं ब्रिटिश राज्यावरच इंडियाचा उत्कर्ष व भरभराट अवलंबून आहे. इंग्लंड व इंडिया या दोन देशांचा इतका निकट संबंध जडला आहे कीं एकाचा र्‍हास म्हणजे तत्समागमें दुसऱ्याचाही र्‍हास झालाच पाहिजे. इंग्रजी राज्याच्या अस्तित्वावर व बळकटीवर या देशाच्या कल्याणाची इमारत उभारली आहे. ब्रिटिश राज्याला ज्या गोष्टी पासून नफा तिकडून इंडियालाही वाटा पोंचणारा आहे. राजकीय गोष्टींत आम्ही नेटिव लोक ब्रिटिश लोकांशीं एकजीव होऊं पहात आहों आणि तसें करण्यांतच आमचा खरा फायदा आहे.

ब्रिटिश राज्य या देशावर आल्या पासून येथील लोकांचे अनंत कोटी फायदे झाले आहेत हें अगदीं निर्विवाद आहे. कोणत्याही हिंदु व मुसलमानी राजाच्या अंमलांत या देशाचें पाऊल इतकें पुढें पडलें नाहीं हें आम्ही प्रांजलपणें कबूल करितों. विचारस्वातंत्र्य, शांतता, स्थिरता, सुधारणा इत्यादि लोकहिताच्या गोष्टी ब्रिटिश अंमलाखालीं चिरकाल व वृद्धिंगत झाल्या आहेत. इंग्लिश राज्यकर्त्यांनीं राज्यविस्तार झपाट्यानें केला व आपल्या देशाचें वैभव वाढवुन स्वार्थसिद्धि पुष्कळ केली. या दोन गोष्टी गेल्या सन १८८१ पासुन १८९१ पर्यंतच्या दहा वर्षांच्या इतिहासांत फार स्पष्ट रितीनें दिसून येतात; परंतु या देशाच्या प्रजासमुदायाचे कल्याणाकडे दुर्लक्ष केलें, शिक्षणप्रसार यथातथाच करण्यांत आला, करानें ओझें जबरदस्त केलें, राज्यकारभारांत नेटिवांना फारसा प्रवेश होऊं दिला नाहीं, दरवर्षीं तीस लक्ष लोकवस्ती वाढत आहे तिच्या वाढीच्या मानानें लोकांच्या खाण्यापिण्या बद्दल सरकारनें कांहींच योजना केल्या नाहींत, शेतकीला फैलाव व्हावा तसा करून पुष्कळशा जमिनी लागवडींत आणिल्या नाहींत, इतर धंद्यास उत्तेजन न दिल्यामुळें जुने धंदे देखील अत्यवस्थ स्थितीनें बुडविले, इत्यादि सहस्रशः गोष्टी राज्यकर्त्यांच्या कर्तव्यपराङ्मुखतेची, सर्वंकष स्वार्थदृष्टीची, व बळवत्तर राज्यतृष्णेची साक्ष देतील.

लॉर्ड रिपन साहेबांनीं आरंभ किती उत्तम घातला होता परंतु लार्ड डफरिन साहेबांचें शहाणपण परराष्ट्रां मध्यें विजयध्वज उभारण्यांत खर्च झालें! आणि लार्ड लान्सडाऊन यांनीं सर्वत्र पैशाची टंचाई व खर्चाची अतिवृष्टि करून सोडली. लार्ड रिपनच्या कारकिर्दींत सरकारी कर कमी झाले, [illegible] झाला, स्थानिक स्वराज्याच्या संस्था स्थापण्यांत आल्या, विद्यादानांत उदारहस्त पुढें केला, दुष्काळीं वृत्तीचे उपाय निघाले, व रेल्वे नवीन पुष्कळ झाल्या. या पैकीं एखादी तरी चांगली गोष्ट नीटशी लार्ड डफरिन व लान्सडौन यांच्या कारकिर्दींत झाली नाहीं. याहून निराळा पुरावा मि. बेन्स यांच्या स्तवनविषयाला घातुक व अप्रासंगिक कोणता होणार आहे!

जिवनकलह उत्तरोत्तर मोठा बिकट होत चालला आहे. खाऊन पिऊन सुखी अशी प्रजा या विस्तृत देशांत फार थोडी आढळेल. बहुतसंख्य जनसमूहाची दशा दीनवाणी आहे. पोटाला जाडें भरडें अन्न, व अंगाला घटकाभर वस्त्र या दोन अत्यंत जरूरीच्या गोष्टींचा देखील पुष्कळजणांस पंचाईत पडते. मि. बेन्स साहेब यांतील कांहीं भाग कबूल करितात, परंतु त्यांच्या म्हणण्यांतील मुख्य भाव असा कीं वरील शोचनीय स्थितीचा द्योतक असा विश्वसनीय, व वास्तविक पुरावा अगदीं मिळत नाहीं. कित्येक लोक दोन वेळच्या जेवणाची हाकाटी गातात परंतु खरोखर पडताळून तर त्यांची हांडी चुलीवर चढलेली दृष्टीस पडते! असल्या कोटीक्रमापुढें आम्ही निरुत्तर झालों असें म्हणून स्वस्थ बसणें नको! मि. बेन्स किंवा त्यांचे कोणी साथीदार आम्हाबरोबर घटकाभर येतील तर आम्ही त्यांची लोकांच्या घोर दारिद्र्या विषयीं पक्की खात्री करूं. सारांश गेल्या दहा वर्षांचा इतिहास अगदीं असमाधानकारक आहे, आणि त्या पासून आमच्या मनांत एका प्रकारची उदासीनता उत्पन्न होते. येत्या दहा वर्षांत याच गोष्टींची रूपान्तरानें निराळी आवृत्ति निघू नये अशी आम्ही उमेद बाळगतों.

---

हल्लीं सोन्याचा भाव फार वाढला आहे आणि पौंडाचा भाव १८ पासून २० रुपये पर्यंत वाढेल कीं काय अशीही भीति पडली आहे. गेल्या जून महिन्यांत नवा नाण्याचा कायदा केला आणि रुपये पाडण्याच्या टांकसाळी खानगी लोकांपुरत्या बंद केल्या. हा कायदा पसार झाला तेव्हांच पुष्कळ अर्थशास्त्रज्ञांनीं भाकीत केलें होतें कीं रुपयाची किंमत कृत्रिम रितीनें वाढविण्याचा सरकारचा उपाय अगदीं फसेलच फसेल. राणीसरकारच्या ठशाच्या रुपेरी नाण्याची किंमत कायद्यानें वाढविली तरी ती किंमत बाजारपेठेंत खरी ठरणार नाहीं हें उघड दिसत होतें.

सरकारी नाण्याच्या कायद्यानें अपाय मात्र पुष्कळ बाजूंनीं दुणावले आहेत. सरकारनें हुंडावळीचा बोजा वाढविला, आणि प्रस्तुत प्रमाणें रुप्याचा भाव उतरत चालला तर लष्करी अवाढव्य खर्च, निरनिराळीं कर्जें, काम्पेन्सेशन अलावन्स इत्यादिकामुळें कोठल्यातरी रुपयांचा फन्ना पडेल. सरकारच्या या कायद्यानें या देशाची प्रजा अतिशय नागविली आणि करांचा बोजा वाढविला! या नाण्याच्या कायद्यांत जी मोठी चूक व कोता विचार झाला त्या बद्दल जबाबदार राज्यकर्ते परंतु पारपत्य प्रजाजनांचें होत आहे.

---

वऱ्हाडच्या वकिलीच्या नवीन नियमा प्रमाणें वकिलीच्या परिक्षेस बसणाऱ्या उमेदवाराची म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरलेली पाहिजे. ही परिक्षा मुंबई युनिव्हर्सिटीचीच असावी असा आज पर्यंत नियम होता परंतु आतां नवी सुधारणा झाली आहे तिच्या अन्वयें कलकत्ता, मुंबई, मद्रास, अल्हाबाद, अगर पंजाब येथील युनिव्हर्सिटी पैकीं कोणत्याही युनिव्हर्सिटीची म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरली असेल तरी सारखीच असें मानण्यांत येईल.

ही एकच सुधारणा वकिलीच्या नियमांत झाली या वरून आणखी दोन सूचना होत्या त्या नापसंत ठरल्या असें दिसतें. १८९२ साला पर्यंत जे म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरल्या शिवाय वकिलीच्या परिक्षेस बसले होते त्यांच्या संबंधानें म्याट्रिक्युलेशनची अट असूं नये अशी पहिली सूचना होती. दुसरी गोष्ट एल. एल. बी. परीक्षा उतरल्या नंतर वकिली करितां येण्या साठी स्थानिक वकिलीच्या परिक्षेची अट नसावी! आणि निदान वऱ्हाडांतील एल एल बी असतील त्यांच्या पासून तरी तीन वर्षें वऱ्हाडांत वकिली केल्या बद्दलचा दाखला मागूं नये. या सर्व सूचना पुन्हा 'वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थि समाजा' मार्फत स्थानिक सरकाराकडे स्वतंत्रपणें जाणार आहेत म्हणून आम्ही त्या संबंधानें येथें विशेष लिहित नाहीं.

---

आन्हिक इंग्रजी पत्रांतून एक खोटा विद्युत्संदेश प्रसिद्ध झाला आणि त्या विलक्षण बातमीच्या हुलीनें सर्वत्र लोकांची चुकभूल झाली. फसवणूक करणारी बातमी अशी कीं व्हाईसराय लार्ड एलजिन यांचा त्यांच्या कौन्सिलदारांशी स्पेशल ट्रेन संबंधानें मोठा वाद पडला. लार्ड एलजिन साहेबांचें म्हणणें कीं आपण व आपले कौन्सिलदार यांस स्पेशल ट्रेनीनें रेल्वेप्रवास करण्याची जरूरी नाहीं. खर्च आटोपते धरले पाहिजेत, आणि त्या अर्थी स्पेशल ट्रेनीचा खर्च करण्याचें प्रयोजन नाहीं. ब्राकनबरी मिलीटरी सेक्रेटरी आदि करून सर्व कौन्सिलदारांनीं या म्हणण्याला मोडा घातला आणि त्यावर लार्ड एलजिन बोलले कीं पहिल्या क्लासांतून उतारूंच्या गाडीनें प्रवास करण्यांत कांहीं हीनपणा नसून राष्ट्राचें हित सहजीं होतें. वादाच्या अखेरीस मतें विचारण्यांत आलीं आणि लार्ड एलजिन एकटेच विरुद्ध पक्षास होते. कौन्सिलदारांच्या बहुमतानें कौन्सिलचे अध्यक्ष बांधले जातात कीं काय, आणि अध्यक्षांस हा बहुमताचा ठराव रद्द करितां येतो किंवा नाहीं असा स्टेट सेक्रेटरीस व्हाइसरायांनीं तारेनें प्रश्न विचारला!

आतां ग्याझेटकर्ते असें म्हणतात कीं ही सर्वच गोष्ट खोटी आहे. असली खोडसाळ तार प्रथम प्रसिद्ध झाली त्या बद्दल सरकारनें योग्य तपास करून अपराध्यास शासन तर अगोदर केलें पाहिजे. हा अशिष्टपणाचा व लबाडीचा प्रघात एकदां सुरू झाला म्हणजे त्या पासून भयंकर चुका घडतील आणि खऱ्या बातम्यांस योग्य मान मिळणार नाहीं. लांडगा आला रे आला म्हणून ओरडणाऱ्या पोरा प्रमाणें बहुतजण तोंडघशी पडतील आणि विनाकारण लांडगेपणाच्या क्रूर वर्तना बद्दल चांगल्या गृहस्थांचा डांगोरा पिटेल!

खरोखर स्पेशल ट्रेनीच्या फासांत हवा खाऊ होण्या सारखी कांहीं विलक्षण गोष्ट नव्हती, किंवा असल्या खर्चाच्या छाटछाटीनें मोठी बचत ही रहात नव्हती परंतु त्या बातमींत ज्या उदार, व्यापक व लोकमान्य तत्वाचा अंगिकार लार्ड एलजिन यांनीं केला असें लोकसमूहास भासलें त्या तत्वाचा असाच सर्वत्र विजय होत जावा म्हणून लोकमतानें आपली मान्यता दर्शविली. लार्ड एलजिन यांनीं आपल्या कारकिर्दींत ज्या गोष्टी केल्या त्या असंतोषकारक होत्या तशा त्यांच्या परावलंबनाच्या, परस्वाधीनपणाच्या

दडता हें कमी न होता उलट वाढत जातील. व या वरून ज्या पासून आपलें वाईट होईल अशीं कृत्यें करण्याला मनाचा संकल्प झाला आणि त्याला धीशक्तीचें अनुमोदन मिळालें ह्मणजे चुक आहे असा सिद्धांत आपण ठोकून देतो. अपली ज्ञानशक्ति व कर्मशक्ति यांचा प्रभाव किती आहे याचें बरोबर अटकळ करण्याचें आह्मी कित्येक फसलों तरी अयुष्याच्या ज्या ज्या प्रसंगी काळीं त्याचा वास्तविक उपयोग झाला पाहिजे, त्या काळीं त्यांचा बिनचूक उपयोग होईलच हें अनिश्चित आहे याबद्दल मात्र प्रमाणाची कांहींहि जरूर नाहीं पडेल! प्रत्येक दिवशीं आपल्या कोण्या तरी मित्राच्या भयंकर वेळांच्या आकस्मिक पडलेल्या रोगानें मृत्युची वार्ता ऐकण्याची नाहीं येते. याच प्रमाणें स्मशानभूमीवर हजारो निर्जीव प्रेतें टाकलेलीं असतात व त्या पेक्षां दुप्पट पुष्कळ लोकांच्या आहुती पडतात. मग ते लोक आपल्या पेक्षां वयानें थोर असोत, लहान असोत, किंवा ते दक्षतेनें वागणारे असोत, उच्छृंखलपणानें वागणारे असोत; आणि ते निरव्यसनी रहाणारे असोत, नेमस्तपणानें रहाणारे असोत. ह्या सर्व गोष्टी आह्मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पहातों. तरी आयुष्य वाढावें, दर वर्षी, दर महिन्याला, दर दिवसाला, दर पळास आमच्या खटपटी चालू असतात. (पुढें चालेल)

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती वैशाख वद्य २ शके १८१६

---

सन १८९१ सालीं हिंदुस्थानची खानेसुमारी झाली त्यांतील कांहीं टिपणें व माहिती गोळा करून त्यांच्या आधारें 'इंडियाची सुधारणा व स्थिति' या विषयावर एक पुस्तक लिहिण्यांत आलें आहे. हा निबंध खानसुमारी कडील मुख्य अधिकारी मि. बेन्स यांनीं लिहिला असून त्याचें प्रकाशन सरकार मार्फत झालें आहे. या लेखावर सर्व इंग्रज पत्रानें स्तुतिपर टीका करीत आहेत आणि हा निबंधच असा लिहिला आहे कीं तो मागाहून कोणा वाचक इंग्लिश लोक नेहमी घेंडा मारीत असतात कीं इंडिया देश ब्रिटिश राज्यछत्राखालीं आला ह्मणून त्याची भरभराट लागली. नाहीं तर हा केव्हांच रसातळास मिळाला असता! आफ्रिकेंत महाराणी सरकारचा बावटा रोवणारे कांहीं इंग्लिशमन असेंहि प्रतिपादन करीत कीं एशिया आणि आफ्रिका या खंडांतील लोकांचा मन्वंतर भाग्यकाल ह्मणजे त्यांच्यावर ब्रिटिश राज्याची स्थापना होण्याचा काल हेंच. असा स्तुतिपाठ वरील पुस्तकांत मि. बेन्स साहेबानीं ओतप्रोत भरला आहे. स्वाभिमान व स्वदेशप्रीति व आत्मस्तुति या गोष्टी कोणास प्रिय नसतात! इंग्लिश लोकांचें राज्य आह्मावर आलें नसतें तर आमचें काय झालें असतें हा प्रश्न मि. बेन्स साहेबां प्रमाणें आह्मास बरोबर सोडवितां येत नाहीं; परंतु आतां मात्र एवढी गोष्ट खरी कीं ब्रिटिश राज्यावरच इंडियाचा उत्कर्ष व भरभराट अवलंबून आहे. इंग्लंड व इंडिया या दोन देशांचा इतका निकट संबंध जडला आहे कीं एकाचा ऱ्हास ह्मणजे तत्सवामयीं दुसऱ्याचाहि ऱ्हास झालाच पाहिजे. इंग्रजी राज्याच्या अस्तित्वावर व बळकटीवर या देशाच्या कल्याणाची इमारत उभारली आहे. ब्रिटिश राज्याच्या ज्या गोष्टी पासून चक्र तिकडून इंडियाकडेही वळत फिरणारा आहे. राजकीय गोष्टींत आह्मी नेटिव लोक ब्रिटिश लोकांशीं एकजीव होऊं पहात आहों आणि तसें करण्यांतच आमचा खरा फायदा आहे.

ब्रिटिश राज्य या देशावर आल्या पासून येथील लोकांचे अनंत कोटी फायदे झाले आहेत हें अगदीं निर्विवाद आहे. कोणत्याही हिंदु व मुसलमानी राजाच्या अंमलांत या देशाचें पाऊल इतकें पुढें पडलेलें नाहीं हें आह्मी प्रांजलपणें कबूल करितों. विचारस्वातंत्र्य, शांतता, स्वास्थ्य, सुधारणा इत्यादि लोकहिताच्या गोष्टी ब्रिटिश अंमलाखालीं चिरकाल व वृद्धिंगत झाल्या आहेत.

इंग्लिश राज्यकर्त्यांनीं राज्यविस्तार प्रयत्नानें केला व आपल्या देशाचें वैभव वाढवून स्वार्थीगिरीहि पुष्कळ केली. या दोन गोष्टी गेल्या सन १८८१ पासून १८९१ पर्यंतच्या दहा वर्षांच्या इतिहासांत फार स्पष्ट रीतीनें दिसून येतात; परंतु या देशाच्या प्रजासमुहाचे कल्याण कडे दुर्लक्ष केलें, शिक्षणप्रसार यथातथाच करण्यांत आला, करांचें ओझें जबरदस्त केलें, राज्यकारभारात नेटिवांना फारसा प्रवेश होऊं दिला नाहीं, दरवर्षी तीस लक्ष लोकवस्ती वाढत आहे तिच्या वाढीच्या मानानें लोकांच्या खाण्या पिण्या बद्दल सरकारनें कांहींच योजना केल्या नाहींत, शेतकीचा फैलाव व्हावा तसा करून पुष्कळशा जमिनी लागवडीत आणिल्या नाहींत, इतर धंद्यास उत्तेजन न दिल्या मुळें जुनें धंदे देखील अत्यक्षतेनें बुडविले, इत्यादि सहस्रशः गोष्टी राज्यकर्त्यांच्या कर्तव्यपराङ्मुखतेची, सर्वंकष स्वार्थदृष्टीची, व बळवत्तर राज्यतृष्णेची साक्ष देतील.

लार्ड रिपन साहेबांनीं आंखीव कित्ता उत्तम घातला होता परंतु लार्ड डफरिन साहेबांचें शहाणपण परराष्ट्रांमध्यें विजयध्वज उभारण्यांत खर्च झालें! आणि लार्ड लान्सडाऊन यांनीं सर्वत्र पैशाची टंचाई व खर्चाची अतिवृष्टि करून सोडली. लार्ड रिपनच्या कारकिर्दीत सरकारी कर कमी झाले, अदालतीय आदरशीर झाली, स्थानिक स्वराज्याच्या संस्था स्थापण्यांत आल्या, विद्यादानांत उदारहस्त पुढें केला, दुष्काळीं वृत्तीचे उपाय निश्चित केले, व रेल्वे नवीन पुष्कळ झाल्या. या पैकीं एखादी तरी चांगली गोष्ट नीटशी लार्ड डफरिन व लान्सडौन यांच्या कारकिर्दीत झाली नाहीं. याहून निराळा पुरावा मि. बेन्स यांच्या स्तवनविषयाला घातुक व अप्रासंगिक कोणता होणार आहे!

जिवनकलह उत्तरोत्तर मोठा बिकट होत चालला आहे. खाऊं पिऊन सुखी अशी प्रजा या विस्तृत देशांत फार थोडी आढळेल. बहुत मोठ्या जनसमुहाची दशा दीनवाणी आहे. पोटाला जाडें भरडें अन्न, व अंगाला घटकाभर वस्त्र या दोन अत्यंत जरूरीच्या गोष्टींचा देखील पुष्कळजणास पंचाईत पडते. मि. बेन्स साहेब यांतील कांहीं भाग कबूल करितात, परंतु त्यांच्या ह्मणण्यांतील मुख्य भाव असा कीं वरील शोचनीय स्थितीचा द्योतक असा विश्वसनीय, व वास्तविक पुरावा अगदीं मिळत नाहीं. कित्येक लोक दोन वेळच्या जेवणाची हाकाटी गातात परंतु खरोखर पहातां तर त्यांची हांडी चुलीवर चढलेली दृष्टीस पडते! असल्या कोटीक्रमापुढें आह्मी निरुत्तर झालों असें ह्मणून स्वस्थ बसणें नको! मि. बेन्स किंवा त्यांचे कोणी साथीदार आह्मांबरोबर घटकाभर येतील तर आह्मी त्यांची लोकांच्या घोर दारिद्र्या विषयीं पक्की खात्री करूं. सारांश गेल्या दहा वर्षांचा इतिहास अगदीं असमाधानकारक आहे, आणि त्या पासून आमच्या मनांत एक प्रकारची उदासीनता उत्पन्न होते. येत्या दहा वर्षांत याच गोष्टींची रूपान्तरानें निराळी आवृत्ती निघू नये अशी आह्मी उमेद बाळगतों.

---

हल्लीं सोन्याचा भाव फार वाढला आहे आणि पौंडाचा भाव १८ पासून २० रुपये पर्यंत वाढेल कीं काय अशीही भीती पडली आहे. गेल्या जून महिन्यांत नवा नाण्याचा कायदा केला आणि रुपये पाडण्याच्या टांकसाळी खानगी लोकांपुरत्या बंद केल्या. हा कायदा पसार झाला तेव्हांच पुष्कळ अर्थशास्त्रज्ञानीं भाकीत केलें होतें कीं रुपयाची किंमत कृत्रिम रीतीनें वाढविण्याचा सरकारचा उपाय अगदीं फसेलच फसेल. राणीसरकारच्या ठशाच्या रुपेरी नाण्याची किंमत कायद्यानें वाढविली तरी ती किंमत बाजारपेठेंत खरी ठरणार नाहीं हें उघड दिसत होतें.

सरकारी नाण्याच्या कायद्यानें अपाय मात्र पुष्कळ व जुनी दुणावले आहेत. सरकारनें हुंडावळीचा बोजा वाढविला, आणि प्रस्तुत प्रमाणें रुपयाचा भाव उतरत चालला तर लष्करी अवाढव्य खर्च, निरनिराळीं कर्जें, काम्पेन्सेशन अलावन्स इत्यादिकामुळें कोट्यावधि रुपयांचा फन्ना पडेल. सरकारच्या या कायद्यानें या देशाची प्रजा अतिशय नागविली आणि करांचा बोजा वाढविला! या नाण्याच्या कायद्यांत जी मोठी चूक व कोता विचार झाला त्या बद्दल जबाबदार राज्यकर्ते परंतु पारपत्य प्रजाजनांचें होत आहे.

---

वऱ्हाडच्या वकिलीच्या नवीन नियमाप्रमाणें वकिलीच्या परिक्षेस बसणाऱ्या उमेदवाराची म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरलेली पाहिजे. ही परिक्षा मुंबई युनिव्हर्सिटीचीच असावी असा आज पर्यंत नियम होता परंतु आतां नवी सुधारणा झाली आहे तिच्या अन्वयें कलकत्ता, मुंबई, मद्रास, अलहाबाद, अगर पंजाब येथील युनिव्हर्सिटी पैकीं कोणत्याही युनिव्हर्सिटीची म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरली असेल तरी सारखीच असें मानण्यांत येईल.

ही एकच सुधारणा वकिलीच्या नियमांत झाली या वरून आणखी दोन सूचना होत्या त्या नापसंत ठरल्या असें दिसतें. १८९२ सालापर्यंत जे म्याट्रिक्युलेशन परीक्षा उतरल्या शिवाय वकिलीच्या परिक्षेस बसले होते त्यांच्या संबंधानें म्याट्रिक्युलेशनची अट असूं नये अशी पहिली सूचना होती. दुसरी गोष्ट एल. एल. बी. परीक्षा उतरल्या नंतर वकिली करितां येण्या साठीं स्थानिक वकिलीच्या परिक्षेची अट नसावी! आणि निदान वऱ्हाडांतील एल एल बी असतील त्यांच्या पासून तरी तीन वर्षें दरम्यानांत वकिली केल्या बद्दलचा दाखला मागूं नये. या सर्व सूचना पुन्हा 'वऱ्हाड हायस्कूल माजीविद्यार्थी समाजा' मार्फत स्थानिक सरकाराकडे स्वतंत्रपणें जाणार आहेत ह्मणून आह्मी त्या संबंधानें येथें विशेष लिहित नाहीं.

---

आन्हिक इंग्रजी पत्रांतून एक खोटा विद्युत्संदेश प्रसिद्ध झाला आणि त्या विलक्षण बातमीच्या हुलीनें सर्वत्र लोकांची चुकभूल झाली. फसवणूक करणारी बातमी अशी कीं व्हाईसराय लार्ड एल्जिन यांचा त्यांच्या कौंसिलदारांशीं स्पेशल ट्रेन संबंधानें मोठा वाद पडला. लार्ड एल्जिन साहेबांचें ह्मणणें कीं आपण व आपले कौंसिलदार यांस स्पेशल ट्रेनानें रेल्वेप्रवास करण्याची जरूरी नाहीं. खर्च आटोपते धरले पाहिजेत, आणि त्या अर्थी स्पेशल ट्रेनीचा खर्च करण्याचें प्रयोजन नाहीं. ब्राकनबरी मिलीटरी सेक्रेटरी आदि करून सर्व कौंसिलदारांनीं या ह्मणण्याला मोडा घातला आणि त्यावर लार्ड एल्जिन बोलले कीं पहिल्या क्लासांतून उतरूंच्या गाडीनें प्रवास करण्यांत कांहीं हीनपणा नसून राष्ट्राचें हित सहजीं होतें. वादाच्या अखेरीस मतें विचारण्यांत आलीं आणि लार्ड एल्जिन एकटेच विरुद्ध पक्षास होते. कौंसिलदारांच्या बहुमतानें कौन्सिलचे अध्यक्ष बांधले जातात कीं काय, आणि अध्यक्षांस हा बहुमताचा ठराव रद्द करितां येतो किंवा नाहीं असा स्टेट सेक्रेटरीस व्हाइसरायांनीं तारेनें प्रश्न विचारला!

आतां ग्याझेटकर्ते असें ह्मणतात कीं ही सर्वच गोष्ट खोटी आहे. असली खोडसाळ तार प्रथम प्रसिद्ध झाली त्या बद्दल सरकारनें योग्य तपास करून अपराध्यास शासन तर अगोदर केलें पाहिजे. हा अशिष्टपणाचा व लबाडीचा प्रघात एकदां सुरू झाला ह्मणजे त्या पासून भयंकर चुका घडतील आणि खऱ्या बातम्यांस योग्य मान मिळणार नाहीं. लांडगा आला रे आला ह्मणून ओरडणाऱ्या पोरा प्रमाणें बहुतजण तोंडघशी पडतील आणि विनाकारण लांडगेपणाच्या कुर वर्तना बद्दल चांगल्या गृहस्थांचा डांगोरा पिटेल!

खरोखर स्पेशल ट्रेनीच्या फासांत इष्टवायु होण्या सारखी कांहीं विलक्षण गोष्ट नव्हती, किंवा असल्या खर्चाच्या काटछाटीनें मोठी बचत ही रहात नव्हती परंतु त्या बातमींत ज्या उदार, व्यापक व लोकमान्य तत्वाचा अंगिकार लार्ड एल्जिन यांनीं केला असें लोकसमूहास भासलें त्या तत्वाचा असाच सर्वत्र विजय होत जावा म्हणून लोकमतानें आपली मान्यता दर्शविली. लार्ड एल्जिन यांनीं आपल्या कारकिर्दीत ज्या गोष्टी केल्या त्या असंतोषकारक होत्या तशा त्यांच्या परावलंबनाच्या, परस्वाधीनपणाच्या

दर्शक होण्या तर्‍हां या खात्या बरतर्णानें निराळा कारकिर्दीस आरंभ झाला, व निराळ्या नीतितत्त्वाचा उदय झाला असें वाटलें परंतु अखेर सर्व मनोराज्यवत ठरलें! निदान या देशास निःपक्षपाती, स्वार्थत्यागी नसले तरी लोककल्याणकारी आणि निरभिलाष व निरपेक्ष बुद्धीचे असे राज्यकर्ते पाहिजेत आणि राष्ट्राच्या न्हामकाजी आदा व्यय याचा मेळ अवश्य राखला पाहिजे इत्यादि गोष्टी लोकमतानें स्पष्टपणें कळविल्या आणि या लोकमताचा अनादर न करितां लार्ड एल्गिन आपली कारकीर्द यशस्वी व लोकमान्य करितील असें आम्ही इच्छितो.

# The Berar Samachar

MONDAY MAY, 21 1894

Education is one of the blessings that the English Rule has conferred on India. The effects of education on the characters of the recipients need no comment. The Educated natives, almost in all the parts of India, kept their position and dignity in political sphere. But in the social at least on our side, they were not so successful. The reason is obvious. In political matters there was no serious difference and they were able to secure the sympathies of the people. In social matters too they took the lead and are even now in the forefront. But if we are right in our opinions we think in this respect the masses are not with them. Whatever might be the reason which gave rise to such a split up—but no one can deny that there exists such a difference. Then again we are sorry that no attempts are made to narrow the gulf. The main reason is that with us education does not mould our character as it ought. In many cases it creates the doubting spirit; in others the athiestic tendencies without at the same time, impressing its true limitations. We do not mean to say that these modern doctrines are worthless. But with us they lead to dangerous results. If taken with their limitations they would work excellently. Scepticism or even Atheism never preaches that one is to do as he likes, without regard to any other thing in the world. But if we were to look to the conduct of its preachers on this side no other conclusion would be drawn. Then, with reason will show that ceremonial is useless, religious etiquette worthless and social customs burdensome. But if one were to turn round and ask these men, on the some principle to abstain from things which are positively injurious or which men of their position ought not to indulge in they are required to take refuge in idle sophistries. This is in the main the conduct of our so—called leaders in social matters. Many times it even goes beyond this but putting these extreme cases as exceptional on the whole our leaders wish to have their own way. This very dogmatism called into being opposition and this is why even the very needful reforms are not making their way. By educated, all along we do not mean men who have secured only university distinctions but men who by private study or otherwise are competent to discuss the questions in the forefront, to grasp them and to form opinions on them for themselves—men who are qualified to lead the people and do good unto their fellow brothers. Before concluding let us remind our leaders that unless our so-called leaders hold before them one definite plan and pursue it with determined courage and perseverance—unless they with manly courage show to the world that they are fitted to achieve what they profess all the tall talk about reform must end in smoke. Educated men are the guiding-posts to others and it is but natural that men should expect an excellent character from them. And therefore, if they were to fulfil the expectation people at large will once more come round and Education too will have its due.

---

The heavy mortality among the University—men is the stirring topic of the day. It is powerfully agitating the public mind. Dr. Bhandarkar first startled the public with his frank, outspoken and deep-rooted convictions at his Convocation address in February last. His speech was the impetus that brought intellects together to deliberate on the serious and vital question as to why graduates die so soon and so many. Dr Bhandarkar's speech was the first stepping stone in the inquiry and it was the Hon'ble Mr. Justice Mahadeo Govind Ranade that gave battle to Dr. Bhandarkar on his own arguments from a different point of view. Dr. Bhandarkar came forth with his rejoinder and Mr. Ranade had to clear the way so far as to bring the real question at issue in a narrowing sphere. Dr. Bhandarkar showed bad taste, ever ambitious and carping nature and impatient intolerance of his critic's ways of doing. Rao Bahadur Ranade was on the other hand calm, patient and persuasive. He was very earnest in his arguments and never dishonored other's hobbies because they ran counter to his own. Dr. Bhandarkar made too much of honesty of purpose and his strength of convictions. He was in fact casting a slur on his opponents when he delighted to take his stand on the same level with the immortal pessimists Carlyle and Ruskin. We would not be invidious but would warn our readers to learn a lesson here as to the polite ways of carrying on a controversy.

Both Dr Bhandarkar and Rao Bahadur Ranade admit that the death rate among the graduates is heavier than in the ranks of the ordinary people. There is no denying of this fact though there are differences of details which however are important and instructive. In these minor items which are marshalled in a formidable array we have no mind to enter. The longevity of the University men is a national question and we are glad that it is solved so far as a correct diagnosis of the case can go. The causes put in a summary form run as follow: Poverty of the students, the hard strain of studies and examinations, and the want of reforms in the social atmosphere are the causes that ruin a student's physical and mental energies. The difference arises as to the relative importance of the causes. A student's poverty is a real obstacle but is besides the province of practical remedies in so far as the Government is not going to cheapen higher education. The other potent factor is the hard mental strain which it is within the power of the University to lighten. Dr. Bhandarkar argues that the struggle is hard and the strain must be put with if we want to vie with other nations in mental activity. Rao Bahadur Ranade interprets the point otherwise. He says Indian Universities ought to remove the people's weakness and to strengthen their strength as a mother and not as a mother-in-law in India. We are thoroughly at one with him. We must take the matters as they stand and ought to make the most of what they are. It is no use to soar high. The health and the weal of the students is the status to improve which we must bring in thoroughness and discipline. For the sake of the latter it is a bad policy to sacrifice the health and the weal of the student. It is a good inheritage that our young generation still bristles with the transmitted ambition for university learning and distinctions. Let us preserve that in tact. The mould should be such as will never distort and impair it.

The same rampant causes have made worse many a youth even in his High-school career. The danger—signal is given and let us see how we shun the threatening calamity. Rao Bahadur Ranade suggests that there should be a test of physical strength in each examination, that bachelorship should be a condition of a student's life and that students should be allowed to appear in those subjects in which they failed at their last examination. Lord Harris expressed the other day his strong concensus on these points but felt a difficulty as to how he should institute a test of the physical aptitude of a student.

---

A serious hoax has been practised upon the public by some telegraphic communications to the dailies of India. Lord Elgin was said to stand aloof from his Executive Councillors and to have telegraphed to the Secretary of State for India whether he could not in the present state of finances overrule the vote of his councillors to continue to travel as before by special trains and not by the First—Class compartments of Passenger trains. The whole country upheld the determined resolve of Lord Elgin and welcomed his lordship with the earnest advice that he should push forth the same economical principle to all its due limits and should leave no branch of administration safe from the right claims of this paramount necessity. Wet hoped he would give a new turn to his career and stick to his avowed doctrine:—"Be just and fear not." We were almost prone to remined him of the well—known couplet of Wordsworth and even now we don't see why we should not. The real greatness of all human actions lies in the advancement of the common good to the glory of God and therefore one should be honest and bid 'Farwell, Farwell the heart that lives alone, Housed in a dream, at distance from the kind!'

---

The Amrita Bazar Patrika has well illustrated the evil effects of the present policy of starving provincial Government to satisfy the imperial requirements of the nation. No state will prosper whose finances are in a hopeless state. Feed well the different limbs and then the body can present a strong constitution. No undue straining of the nerves will strengthen the system but will cripple it in the long run: The daily paper of Calcutta observes:—

"Says the landlord to the middleman: "You must give an increased rent, or you incur my displeasure." Says the middle-man in reply, "But how can I afford it, I have only a little profit left to me." The landlord says, "Well, you give me the increase, and you can take it from your tenantry." "But what if the tenants refuse?" asks the middle-man. "In that case I will help you," says the landlord. In short it was in this manner that increase of rent was oftentimes secured by landlords in Bengal. The Government of India takes some money from the Provincial treasury. The local Governor weeps. Says he, "how am I to meet my expenses?" "Well," says the Government of India, "you can recoup yourself from funds belonging to the people and I will support you." It was thus that the funds of the District Boards were permitted by the Government of Lord Lansdowne to be made use of by the Government of Bengal. The strong feed upon the poor, that is the law of nature."

## वऱ्हाड.

हवामान—-उष्णतेचें मान कमी आहे. वारा सोसाट्याचा सुटतो. हवेच्या लक्षणावरून पर्जन्यकाल सुरू होईल असेंही वाटतें. रोगराई ह्मणण्या सारखी विशेष नसावी परंतु उमरावतीकडे कांहीं ठिकाणीं हवेचा उपद्रव असल्याचें कळतें.

अकोल्यास नळाचें पाणी महिन्या दोन महिन्यात येईल असें लोक बोलतात व चालू खटाटोपीचा थाटही तसाच दिसतो. या आठवड्यांत दंवडी फिरली कीं ज्यांना घरीं नळ घ्यावयाचे असतील त्यांनीं लेखी अर्जानीं कळवावें. परंतु खुलासेवार माहिती व खर्चाचा बोजा हीं कळल्या शिवाय लोकांस कांहींच ह्मणता येणार नाहीं.

कापशी तलावांत सध्या सुमारें ९॥० फूट आहे आणि त्या विहिरींत आणून सोडलेले पाट खणीत असतांना नवीन मोठमोठे झरे लागले आहेत. ईश्वर करो आणि पाण्याचें दुर्भिक्ष दूर होवो!

सट्ट्याचे व्यापारांत फार घल बिचल झाली आहे. उमरावती, खामगांव व अकोला येथील सट्टे बसत चालले आणि कांहीं वर्षांत हा जुगारा प्रमाणें चाललेला व्यापार ठार बुडेल असा अंदाज आहे. आमच्या मतें सट्ट्याचा व्यापार जितका लवकर बंद होईल तितकें चांगलें.

कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या बी. ए. परिक्षेंत वऱ्हाडांतील खालील गृहस्थ पसार झाले:—

नारायण वामन दाते, निळकंठ सदाशिव देशमुख व उमाकांत सदाशिव देशमुख.

---

नोटीस

मा॰ छोगमल लुणकारणमल मु॥ उद्रामसर जिल्हा बिकानेर यांस नोटीस देणेवाला कालुराम कुंनणमल मल दुकान तेल्हारा. नोटीस देवने ओंके तुमारा कानी हमार रुपीया २०० दोनसे संवत १९४६ मिती पोस वदी १ न तमारे माहे चारूं मीवराम के नावसे जमा करागा सो रुपीया व्याज सुद्धा भई योयमलोंने दे दिंआ रसिद लिखा दिजो; नही तो नोटीस पाहुंचे पिछे आठ दिन तक बिकानेर दिवाणी कोर्टमे अर्जी दे देंसा. ते को खर्चो नोटीस सुद्धो आपने लागसी सो जाणजो. संमत १९५१ मिती वसाख सुदी १४ रोज सुकरवार तारीख १८।५।९४

(सही मारवाडीत)

कालुराम कुंनणमल दस्तुर
कुंनणमल मल.

---

## वर्तमानसार.

वृद्ध लोकांचीं देवळें भ्रष्ट केल्याबद्दल गवगवा झाला आहे असें समजतें. फकंदरीनें चिन्हें कांहीं बरोबर दिसत नाहींत.

पेशाच्या अडचणीमुळें व्हाइसराय साहेब, त्यांचे कौन्सलर, कमांडर इन चीफ वगैरेनीं स्पेशल ट्रेनमधून न जातां पाहिज्या वर्गांतून कां जाऊं नये असें विचारलें. परंतु बहुमतानें पूर्वींची वहिवाट कायम ठेवावी असें ठरलें. लार्ड एल्जिन फक्त विरुद्ध आहेत. सु. प.

रांडांना धरून आणून त्यांना सन्मार्गास लावण्याची खटपट मुक्तिफौजवाल्यांनीं मुंबईस चालविली असून, या साठीं परळास एक स्वतंत्र जागा घेतली आहे. या खटपटींत अंतस्थ काय आहे तें कांहीं कळत नाहीं. अनीति बंद करण्याचा हेतु नुसतें तर बाहेर दाखविण्यांत येत आहे. स० वि०

१८५७ सालांत ज्या प्रमाणें सर्व देशभर भाकरी वाटल्या गेल्या त्याच प्रमाणें हल्लीं भाकऱ्या वाटल्या जात आहेत असें सरकारी आफिसरांचें ह्मणणें आहे. या रोट्यांस आरंभ बिहार प्रांतात झाला असून एका आंब्याच्या झाडास ह्या रोट्या आलल्या आहेत असें सांगतात. "याने पाऊल आपलें म्हणें मागें कोण आलें." ह्या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें सरकारच्या हिंदुस्थानांतील कामदारांस वाटत असल्यामुळें ते लोक असल्या कंड्या पिकवीत आहेत व आंब्यांच्या झाडास रोट्या जोडून त्या रोट्यांचा संबंध १८५७ सालांशीं आणून लावीत आहेत असें दिसतें. अशा रीतीनें बाभळीची साल बोरीस लावून हिंदु लोकांच्या संबंधानें विलायतच्या इंग्रज लोकांचीं ह्मणजे आमच्या खऱ्या मालकांचीं मनें कलुषित व्हावीं एवढाच यांत हेतु दिसतो. पु. वै.

झांजीबार हें ठिकाण मुसलमानी राजाच्या ताब्यांतलें आहे व तेथील गुलामाचा व्यापार बंद करूं लागल्यास राजकीय कटकट होण्याचा संभव आहे असें विलायतच्या एका प्रधानाचें ह्मणणें आहे.

सातारा रोडजवळ एका गांवी पाटलानें सुरुंगाची दारु आणली. रात्रीं दिवा घेऊन एका मडक्यांत भरीत असतां दारूचा भडका होऊन त्यांत ९ माणसें ठार झालीं.

आग्रा येथील १७ व्या पलटणींतील शिपायांनीं जी हुकमाची अमान्यता केली त्याचे कारण असें झालें कीं त्या पलटणींत नवीन भरती करण्यास आणलेल्या रंगुर जातीच्या एका माणसास एका मुसलमान हवलदारानें कांहीं मारहाण केली व त्या वरून पलटणींतील सर्व रंगूर लोक बिथरले व आपणास चाकऱ्या सोडण्यास परवानगी द्या असें ह्मणूं लागले तें त्यांचें ह्मणणें नाकबूल केल्यावरून त्याणीं हुकूम मानण्याचें नाकारलें. आतां कोर्टमार्शल होणार आहे.

राजापुरास गोरक्षणी सभा स्थापन झाली असून त्या कामाच्या वर्गणीस तेथील कांहीं मुसलमान गृहस्थांनीहीं वर्गणी दिली आहे असें तिकडच्या पत्रावरून समजतें. अरुणोदय.

भिंगाच्या राजाचे प्रलाप वर्णन करितांना देशसेवक कर्ते प्रलापांचा मथितार्थ असा सांगतात कीं पुराणांत वर्णिलेल्या सत्ययुगाची किंवा आद्य कवीनें वर्णिलेल्या रामराज्याची प्रतीति त्यांस इंग्रजांच्या अमलांत येते. अहो पहा सध्यांचा अक्रिय पूर्व युगांतील बाहुक प्रेरित ऋतुपर्णाच्या रथाशीं स्पर्धा करिते, सध्याची संदेशवाहिका विद्युद्देवी 'तेजतम कदईतील मोहरी न फुटतां तथापि यहर' असें ह्मणणाऱ्या वायुपुत्र हनुमंताला वेगांत मागें टाकिते, सध्यांच्या येथील व विलायतेंतील गिरण्या दुःशासनानें द्रौपदीचें निरि ओढली असतां तिला अनंतहस्तानें जी शेले, शालू, साड्या, क्षीरोदक, लाब रुंद वाढत पुरविणाऱ्या भगवंताशीं त्यजस स्पर्धा करितात, सध्याची विद्युत्साह्यानें पारखियत्त करणारीं यंत्रें 'मीमकर्म वकोदर' सारख्या शेंकडों जणांस किंवा अध्यपशीं हजार शिपायांसमवेत राक्षसी आहार करणाऱ्या शोघकांपी दुर्वासमुनीला देखील वर्दीत तृप्त करितील. तेव्हा इंग्रजी राज्यरूपी कल्पवृक्ष खालीं बसलों असूनही जर आपण विपरीत पडलों आहों ह्मणून ओरडतों व तन्निवारणार्थ राष्ट्रीयसभा, गोरक्षणसभा या सारख्या राजद्रोही संस्था उभारतों तेव्हा आमची धन्य आहे किंवा नाहीं? वांझ विचार (विकार?) आमच्या 'सुपीक मेंदू' तून निघालेले नसून ते खरोखरच एका वेलबुट्टीदार लक्ष्मीपुत्राचे आहेत. दे. स.

इ० स० १८१२ च्या जुलै महिन्यांत मेजोर्का बेटाच्या जवळ स्वालो (पाकोळी) नांवाच्या एका लढाऊ गलबताची व फ्रेंच्यांच्या एका गलबताची चकमक उडाली. त्या तावीवर एक केलन नांवाचा खलाशी होता त्यास गोळी लागून तो वारला व त्याची बायको जखमी झालेल्या लोकांची वास्तपुस्त करीत असतांना, तिलाही एक तोफेचा गोळा लागून तोंड उडून जाऊन ती मेली. त्यांचें एक तान्हें मूल होतें. आतां या मुलाची जोपासना कशी व्हावी? मुक्त सोरें तीन वारांचें. त्या तावीवरच एका अधिकाऱ्याजवळ मास्टाबेटांतली एक बकरी होती. या बकरीच्या स्तनाला तोंड लावलें असतां तें पोर ओढतें काय, व त्यानें ओढलें तरी ही बकरी दूध देते काय; हे पहावें असें मनांत येऊन बकरीच्या मालकानें तसें करून पाहिलें. तो आश्चर्य काय पहा! त्या बकरीनें लवकर पान्हवून त्या पोरावर आपलें प्रेम फार आहे असें दाखविलें. त्या बकरीनें तिच्या अकलेप्रमाणें त्या मुलाच्या आईचेंच काम केलें! हें एकोणिसाव्या शतकांत जर खरोखर झालें, तर रोमन लोकांच्या पुराणकथांतील ध्यग्रीनें पाजलेलें मुलगे व आपली शकुंतालें (पक्षी) पाळलेली शकुंतला यांच्या गोष्टी अन्यथा कशा ह्मणाव्या? करमणूक

कलकत्ता येथील बाणेदार 'स्टेट्समन' पत्रकर्त्यांनीं गेले आठवड्यांत २१४ मार्मिक लेख लिहिले आहेत, ते फार वाचनीय आहेत. काश्मीर संस्थानांतून इंग्रज सरकारानें २१ लाख रुपये उसनवार घेतले आहेत. त्या संस्थानांतून दरसाल झेलमव्हालींतील गाडी रस्त्याकडे व जमू रेलवेकडे देवविण्यांत येतात; व्हाईसरायांनीं काश्मीरच्या महाराजांकडून लेडी हरीन फंडाकडे ५०००० रु० घेतले; लाहोरच्या अचीसन कालेजाकरितां ह्मणून २५ हजार रुपये घेतले; कोठें काश्मीर आणि कोठें लाहोरचें अचीसन कालेज!!! जमू येथें नवीन रेसिडेन्सी बंगला बांधण्या करितां ११ लाख रुपये महाराजांकडून काढले. अशा रीतीनें प्रथम त्याला कर्जबाजारी करून मोडलें व आतां त्यांवर पोलिटिकल कामदार उधळेपणाचा आरोप लादीत आहेत!!

ऊन पाण्याचा पाऊस— कामती येथें गेल्या २६ व्या तारखेस बाहेर खरे ऊन पडलेलें असतां पावसाची एक सर पडली. तें पाणी ऊन असून आंगावर त्याचे चटके बसे; असें एक टा० इं. स लिहितो आहे! उन्हाच्या प्रखर तापानें हें पाणी खालीं अल्या मुळेंच तें तापलें असावें, ही कल्पनाच विशेष संभवते. प० शो०

धन्य आहे या इंग्रज लोकांच्या परोपकारास! आह्मी हिंदुस्थानची जमीन आह्मी आंधळ्यांत बुडून गेलों होतों ह्मणून आह्मास ज्ञानदीप लावण्याकरितां हिंदुस्थान काबीज केलें; अमेरिकेंतील जंगलें तोडून तांबड्या इंडियन लोकांस हवाशीर जागा करून देण्याकरितां अमेरिका ताब्यांत घेतली; आस्ट्रेलियांतील मातींत पडून राहिलेलें सोनें जगास देण्याकरितां आस्ट्रेलिया खंड व्यापलें; व थिबा राजास ब्रह्मदेशाची हवा मानवेना, या करितां त्यास रत्नागिरीस आणून ठेविलें. अशा परोपकाराचीं शतशः कृत्यें दृष्टोत्पत्तीस येत असतां काँग्रेसवाले हिंदुस्थान सरकारास नांवें ठेवितात, तेव्हां त्यांस काय ह्मणावें!

विद्युद्दीपानें कोठा तपासण्याची युक्ति— रोग्याच्या पोटांत लहानसा विजेचा दिवा रबरी नळीच्या द्वारें घालून त्याच्या कोठ्यांतील एकंदर स्थितीची छाया मॅजिक ल्यांटर्नप्रमाणें आवार कोठडीतील पडद्यावर पाडण्याची कल्पना अमेरिकेंतील डाक्टरांनीं अलिकडे काढली आहे. ह्या कृतीचा प्रयोग बाल्टिमोर येथें २०० मंडळी समक्ष करून दाखविण्यांत आला. क. त.

शिकलेले नेटिव्ह लोक भित्रे आहेत इतकेंच नव्हे तर ते गिरण्यांतील मजुरांस चिथावून देऊन त्यास दंगा करण्यास प्रवृत्त करतात असाही क्यांबेल साहेबांनीं त्यांजवर भयंकर आरोप केला आहे. नामदार फेरोजशा मेथा यांणीं प्रथमतः क्यांबेल साहेबांनीं सुशिक्षित लोकांवर केलेला वरील आक्षेप वाचून दाखवून पुढें असें सांगितलें कीं "क्यांबेल साहेबांच्या या आक्षेपास उघड आणि स्पष्ट रीतीनें जबाब देणें मला भाग पडत आहे. सरकार हिंदु मुसलमानांमध्यें वैमनस्य पाडूं इच्छितें असें कित्येकांचें ह्मणणें आहे व त्याचा निषेधही कित्येकांकडून झाला आहे. सरकार आपण होऊन हे तंटे लावतात असें मी ह्मणत नाहीं, परंतु क्यांबेल साहेब आज दहा वर्षें जो दरुद्योग करीत आहेत तसा उद्योग करणाऱ्या कित्येक गृहस्थांच्या कृत्यानें हीं वैमनस्यें बऱ्याच अंशीं उपस्थित होतात असें ह्मणण्यास मला कांहींच हरकत वाटत नाहीं. क्यांबेल साहेबाबद्दल लोकमत विचारलें तर ते असें आहे कीं हे साहेबबहादूर पार्शी हिंदु आणि मुसलमान या सगळ्यांना मनांतून सारखाच द्वेष करतात. पण हिंदूपेक्षां मुसलमानावर आणि पारशापेक्षां हिंदूवर आपला द्वेष कमी दाखवितात यांचें कारण इतकेंच कीं पारशांचा आपण परमावधीचा द्वेष करतों असें दाखवितां यावें क्यांबेल साहेबांच्या या दुष्ट कृत्याबद्दल सरकार जबाबदार नाहीं हें मला कबूल आहे, परंतु मी असें स्पष्ट सांगतों कीं क्यांबेल साहेबांप्रमाणें ज्यांच्या हातांत अधिकार आहे व त्यांच्या खारखेन जे वर्तन ठेवतात त्यांच्या मुळेंच कृत्यतेचें वरून जातां जातां मग घोर वैमनस्य उत्पन्न होऊन अंखेरीस मुंबईच्या दंग्यासारखे दंगे उपस्थित होतात. केसरी.


## घड्याळ.

कि. ६ रुपये हमी–३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रोलेड ग्युरेटरचें, उघडून तोंडाचें, जिल्हेवें (ह्मणजे ६ वर्षांकानें खालीं वर हिरा बसविला आहे) याची देण्यास मागरा. कांटे रासकोपमाणें, आंकडे ठळक विलायती कांचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वरअमचें नांव आहे. हें खिश्यांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त दाम, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक



NEARLY READY

## CRIMINAL COURT MANUAL

*for the*

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum,

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Criminal matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminal Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.


☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ... ,, ... ,, ...
सालअखेर ,, ० ,, १८
किरकोळ अंकास ....................४

Single copy ............................ 4as

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरें खेपेस ......०।१

Advertisement
Below 10 lines...2 Rs
per line over 10... 4 as
Repetition per line 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL XXVIII AKOLA MONDAY 28 MAY 1894 NO 22

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख २८ माहे मे सन १८९४ इ० अंक २२

### सर्व नजरबंदीच्या माकडचेष्टांस हाणून पाडतां येतें.

मी रस्त्यांत केव्हां कांहीं काळ चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिजून गेलेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुम्हांसही खास त्याच्यासारखेंच वाटलें असतें. परंतु ते सर्व चुकत होते. मी रस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुष्यक्रमाचें पूर्व मार्गावर धांवत गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतों. परंतु चार पांच वर्षांपूर्वीं मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं थोडी तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच एकदम उमळून येई व जसें कांहीं बेहावा करून माझ्या हेतूस हाणून पाडी. हें मला अरिष्ट नवीनच व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा अनमान करी तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें जिना चढून जातांना आपल्यास जशी धाप लागून थकवा येतो त्याप्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोपेचा क्रम अगदीं बदलला. झोप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटे त्यामुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातों तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याची हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोंचल्यासारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवतीं कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्यामुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्वाशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना निघून जाई ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं ह्यावेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी हलकें वाटावें. आणि गरगर फिरल्यासारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर एकदम पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तितकें टाळून येई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळींनीं व वैद्यांनीं जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं घेतलीं त्यापासून गुण न येतां मी अगदीं सुतासारखा झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा असें मला वाटूं लागलें. ह्याप्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मांस थोडक्यांत निवेदन करतों. कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्याबरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा रोगहारक सिरप [ह्मणजे माती सिजेलचा रोगहारक पाक] तुह्मांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधापासून इतका जलद गुण आला कीं मला खातांना बरें वाटलें व झोप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्यामुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों हें. औषध दैविकासारखें वाटलें. मला खचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हा ताजातवाना झालों व त्यामुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं, जें सर्वांस होत असतें, त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलीच मला त्यापासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होते परंतु खरोखर मदर सिजेलचा क्युरेटिव सिरप ह्मणजे माती टाकण्यासारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधापासून हटकून गुण यावयाचाच

मी तुमचा उपकार मानणारा
(सही) जे. सी. सिमसन
२१ ह्यामीवरचा रस्ता, न्युकासल अंडर लाईन, स्टाफर्ड शिपर इंग्लंड.

B. T.

### विजयादशमीचें सोनें
(मागील अंकावरून पुढें चालू)

Make me thy lyre, ev'n as the forest is:
What if my leaves are falling like its own!
The tumult of thy mighty harmonies
Will take from both a deep autumnal tone,
Sweet though in sadness. Be thou, Spirit fierce
My spirit! be thou me, impetuous one!
Drive my dead thoughts over the universe
Like the wither'd leaves to quicken a new birth;
And, by the incantation of this verse,
Scatter, as from an unextinguish'd hearth
Ashes and sparks, my words among mankind!
Be through my lips to unawaken'd earth
The trumpet of a prophecy! O Wind,
If Winter comes, can Spring be far behind?

P. B. Shelley

करी मज तुझी गडे! सुरस वाद्य या वृक्षसें
गळोत मम पर्णही गळति पादपांचें जसें।
हृद्य मरुतुळें; प्रबळ सुस्वराचा निधी
शरद् घन गंभीरता रव तुझा वरी हा सुधी ॥ १९ ॥
दे तव उल्हास मला स्वत् शक्ति भिरवा! मला देरे।
एक स्वरूप होऊं हिंडु त्रिभुवन निर्गळा! सारे ॥ २० ॥
नूतन बीजोत्पत्ती साठीं नेसी चहोंकडे वाता
तरु शुष्क पर्णहि जसें विगलित गे मद्विचार हे आतां ॥ २१ ॥
प्रज्वलितानलुं हातुनि रक्षावन्हिकण जसें नेसी
हे मत् प्रबंधशब्दहि पसरी लोकीं जिथें विभो ! नासी ॥ २२ ॥
निद्रितभूला सन्मुख भविष्यत दुंदुभी करी पवना !
हेमंत जरी आतां वसंत न्हई लांब काय रे पवना ! ॥ २३ ॥

### "जागे व्हा."
(मागील अंकावरून समाप्त)

एखाद्याचे एक भरभराटीचे दिवस असतात आणि असल्या थाटामध्येंच त्याच्या बिछान्यावर आकाशांतील कुऱ्हाड येऊन पडते. अशी कैकांची स्थिति होतांना आपण पहातोंच आहों व त्यामुळें स्मशानवैराग्य जें कांहीं आहे त्याचीही छाप आपणावर बसते. व हें सर्व जग व्यर्थ आहे, हा संसार क्षणभंगुर आहे, जो देह बरोबर घेऊन आलों तो सुद्धां सरतेशेवटीं येथेंच टाकून जाण्याची पाळी येते इत्यादि विचार हजारों वेळां मनांत येतात. मनुष्य मी अमुक करीन तमुक करीन म्हणून पुष्कळ म्हणत असतो पण त्याचा भरंवसा कोणाला देतां येत नाहीं. खंडोगणती आमचे बेत बाद होतात. परंतु त्यांची "उत्पद्यन्ते विलीयन्ते" अशीच स्थिति होते. आम्ही जयस्तंभ उभारूं अशी महत्वाकांक्षा बाळगणारे कितीक गडप झाले! सुकुमार, रतीप्रमाणें सुंदर अशा युवतींची यौवनावस्थेंतच काळाशीं गांठ पडली! पहा, मनुष्य मनांत बेत करतो एक आणि मध्यस्थामध्येंच त्याची उचलबांगडी होते! या बद्दल प्रसिद्ध डाक्टर जान्सन यांनीं "युरेलस" नामक आपल्या मित्राची गोष्ट लिहिलेली आहे ती फारच हृदय-द्रावक आहे! तेव्हां तिचा सारांश वाचकांस सादर केल्या वांचून राहवत नाहीं! "युरेलस" हा गृहस्थ व्यापारी होता. व्यापारामध्यें त्याला बरीच किफायत होत असे. एकदां त्याच्या डोक्यांत काय वेड शिरलें कोण जाणे! तें कांहीं केल्या जाईना! त्याला ह्या रहाट गाडग्याप्रमाणें चालणाऱ्या संसाराचा कंटाळा आला! ही दररोजची पैसा मिळविण्याची हमाली कांहीं उपयोगाची नाहीं असें त्याला वाटूं लागलें! व यापासून आपली लवकर सुटका करून घेतली पाहिजे असें त्याच्या मनानें घेतलें! व हा धंदा चालवून तो आपल्याला नफाही नको असें त्याला वाटूं लागलें! आतां कांहीं वर्षें प्रवासांत घालवून त्यापासून पूर्ण सुखोपभोग घ्यावा असा त्यानें बेत केला. आपल्या पुष्कळ मित्रांनाही त्यानें हा आपला केलेला बेत कळविला. पण हें उगाच आहे असें त्यांना वाटलें. म्हणून त्यांनीं त्याच्या बोलण्याकडे फारसें लक्ष दिलें नाहीं! परंतु त्याचा जो निश्चय झाला होता तो मुळींच ढळला नाहीं. त्यानें आपल्या व्यापाराचा आढावा काढला. सर्व हिशेब चुकते केले. आपला सर्व जंगम माल विकून टाकला. व कांहीं दिवस आपल्या मित्रांना [illegible]मध्यें व त्यांचा निरोप घेण्यामध्यें घालविले व मोठा धीर धरून व उत्साह व [illegible] कादंबरींतल्या एखाद्या नायकाप्रमाणें तो सुख मिळविण्यासाठीं समुद्र ओलांडून गेला. प्राचीन व आधुनिक इतिहासांत प्रसिद्ध अशीं जेवढीं म्हणून स्थळें होतीं किंवा सृष्टिसौंदर्यानें युक्त अशीं जेवढीं ठिकाणें होतीं, अथवा कला-कौशल्य-शास्त्र इत्यादिकांनीं नावाजलेलीं जेवढीं शहरें होतीं तीं पहाण्याचा त्यानें निश्चय केला. अशा तऱ्हेचा बेत व अशा तऱ्हेची उत्कट आशा हीं दोन्हीं मनांत येऊन तो खंडामध्यें येऊन ठेपला. आतां आपल्याला नवीन देखाव्यांचीं वर्णनें वाचावयास मिळतील म्हणून त्याचे मित्र व त्याचे आप्त त्याच्या पत्राची घरीं वाट पहात बसले! पण बिचारे फसले हो फसले! तो बिचारा "युरेलस" या इहलोकच्या प्रवासांत कांहीं हांशील नाहीं असें समजून जणूं काय परलोकींचा प्रवास करण्यास या जगाचा निरोप घेऊन गेला! हरहर!! मग त्या दीन मित्रांचें व आप्तांचें वर्णन वाचण्याचें कोड कसें बरें पुरलें असतील. त्यांच्यावर केवढा घोर प्रसंग हा गुदरला असेल! याचा विचार वाचकांनींच करावा.

शिव! शिव! अशा तऱ्हेनें त्यांचा शेवट व्हावा! कारण गेला एक आणि [illegible] दुसरेंच! ज्या ठिकाणीं तो गेला त्या ठिकाणाहून तो परत येईल काय? त्याच्या प्रवासांतलें शेवटचें ठिकाण तें व तेथेंच सर्वांना जावयाचें आहे! युरेलसच्या मरणापासून त्यांच्या दाईजांना व सोबत्यांना फार दुःख

झालेंच असेल यांत संशय नाहीं पण त्यांना एक उत्तम फायदाही झाला! तो कोणता? तर एखादी इच्छा बळवत्तर असो म्हणजे तिच्या मुळें मनुष्य कसा आंधळा होतो व इहलोकांचें सुख म्हणजे शुद्ध मृगजळाच्या सांवली प्रमाणें आहे या दोन गोष्टी "युरेकाच्या" मरणामुळें त्यांच्या मनांत चांगल्या बिंबल्या असतील. वाचक हो तुह्मांला ही असल्या एखाद्या तरी "युरेकस" चा अनुभव असेलच! तुमच्याही कित्येक मित्रांवर अतां सुखाचा घांस घेणार तोंच मृत्यूच्या दाढेंत पडण्याचा प्रसंग गुदरलाच असेल.

आयुष्याची जशी शाश्वती नाहीं तशीच या जगामध्यें इतर ज्या ज्या ह्मणून गोष्टी आहेत त्यांचीही कांहीं शाश्वती नाहीं. त्या आज आहेत उद्यां नाहींत! अशी त्यांची स्थिति आहे. त्या प्रमाणेंच मनुष्यप्राण्याच्या हातून ज्या गोष्टी होण्याचा संभव आहे त्यांचाही कांही भरंवसा नाहीं. थोडीशी झीज सोसून व सखोलशाला लाथ मारून आज जें सत्कृत्य एखाद्याला करितां येईल तें करण्याचें दिवसानुदिवस लांबणीवर टाकण्याची जी उत्कंठेच्छा त्याच्या मनांत उत्पन्न होते तिचा बीमोड कधींही होणें नाहीं. किंवा तिच्यावर विचाराचा पगडाही बसणें बहुतेक कठीणच आहे! अमुक एक काम आपल्या हातून अमक्या वेळीं झालेंच पाहिजे असें प्रत्येकाला प्रत्यहीं वाटत नसेल काय! पण बिचारा करतो काय! तें काम करण्याला जो मुहूर्त लागतो त्याचा योग योगच मुळीं कधीं घडून येत नाहीं. बरें, तो मुहूर्त एकदांचा आला, पण त्या कामाला आरंभ करण्याचा योग कोठें येतो? त्याच्या कपाळाला अठ्ठ्या तीन पडावयाच्या! पण ह्या अनिच्छेचें बंड समूळ मोडून टाकण्याचें कर्तव्य प्रत्येकाचें नाहीं काय? चाङ्गेपुणे आहेत त्यांना सर केल्यावर मग त्या अनिच्छेची मात्रा तो कितीशी चालणार! चांगली अथवा वाईट गोष्ट करणें हें जशी संवय ठेवाल त्यावर अवलंबून आहे जी सवय एकदा लागली ती घालविण्यास फार प्रयास पडतात. ह्मणून संवय लावून घेण्यांत तरी शहाणपणा व सारासार विचार लागतो. सृष्टिक्रम व विचारक्रम या दोहोंचे कधीं जुळावयाचें नाहीं. येवढेंच, विचाराचें एकदां प्राबल्य वाढलें ह्मणजे सृष्टिक्रमाची पत्रास काहीं चालत नाहीं. मग तो हवा तसा मऊ येतो!

उनाडलेला जो दिवस त्या संबंधीं बेफिकीर रहाणें ह्मणजे केवळ लज्जास्पद आहे इतकेंच नव्हे. तसें करणें ह्मणजे मोठा गुन्हा आहे. ही ढोबळ चूक कित्येकाच्या लक्ष्यांतच येत नाहीं व ज्याच्या येते ते मुळी त्या संबंधीं काळजीच करीत नाहींत. मंदमती जे आहेत ते आयुष्यक्षणभंगुरते संबंधानें यथार्थ विचार करितात! पण थोर महत्वाचे जे आहेत ते या विषयीं बरोबर विचार करीत नाहींत. विचार आणि अनुभव ह्या वरून आपली खरी स्थिति काय आहे हें ताबडतोब कळून येतें पण आह्मी त्यांच्या उपदेशाकडे अजीबात काना डोळा करतो कारण त्यांच्या उपदेशा प्रमाणें वागण्याचे परकराचें कोणी, ज्या जनरीत्यर्थानें अमुक मार्गानें जा ह्मणून आह्मास सांगितलें तिकडे डोळे झांक करून आमच्या स्वैरतेला वाटेल त्या मार्गाचें आह्मी अवलंबन करूं व सर्व प्रकारानें आपलें नुकसान करून घेण्यास प्रवृत्त झालों या पेक्षां जास्त कळिमा आणणारी गोष्ट ती कोणती!

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती वैशाख वद्य ९ शके १८१६

---

हिंदु मुसलमाना मधील दंग्याचीं कारणें सरकार शोधून अपला विचार ठाम करीत आहे अशा वेळीं बिहार प्रांतांतील आम्रवृक्षावर सरकाराच्या काहीं आफिसरास नवीन चिन्हें दिसूं लागलीं ही मोठी दुःखाची गोष्ट होय हीं चिन्हें अशीं कीं जमालपुरच्या पश्चिम भागाला रेलवेच्या रस्त्याला प्रत्यक आम्रवृक्षावर एक एक चिखलाचा गोळा व त्या गोळ्याच्या मध्यभागीं कांहीं केस चिकटविलेले होते हे केस गाईचे व डुकराचे होते असा ही कित्येकांचा तर्क चालला. स्वभावाचा जसा बरा वाईट भावार्थ बसविण्याची चाल आहे तशा धर्तीवर आंग्लो इंडियन लोक कांहीं कल्पनातरंग रचूं लागले. १८५७ सालच्या बंडाच्या वेळीं चपात्या वाटण्यात आल्या त्यांतूनच जसे गूढ संदेश लोकांस बंड करण्या विषयीं कळविले होते त्या प्रमाणेंच आम्रवृक्षा वरील एका रांगेनें दिसत असलेले मृत्तिका व त्याला चिकटविलेले कुंतल यांनीं इंग्रज सरकारावर बंड करण्याचा इशारा दिला आहे असें कित्येक म्हणूं लागले. अशा कल्पना विद्युत्प्रवाहानें सर्व पृथ्वीभर पसरल्या आणि मग आंग्लो इंडियन पत्रकर्त्यांचें अकांड तांडव अद्भुत पूर्व असें झालें. कित्येक इसाखयाचे अधिपती ह्मणाले कीं हा मृत्तिकागोलकाचा प्रकार ह्मणजे भोळ्या भाविक प्रजेनें देवतांच्या प्रत्यर्थी केलेल्या वेड्या वाकड्या गोष्टी आहेत. त्यात विचित्रपणा कांहींमात्र नाहीं आणि बंड व राजद्रोह यांचें यत्किंचित दिग्दर्शन नाहीं.

खरोखर प्रकार काय आहे तो अद्याप बाहेर आला नाहीं परंतु जवळजवळ अशी गोष्ट असावी या बद्दल बिहार हेरल्ड पत्रकर्ते लिहितात कीं यंदा पाटणा व मोंघीर या दोन जिल्ह्यांच्या आंबराईंत मोहरावर एक विलक्षण प्रकारचा चिकटा पडला. काहीं बुळबुळीत व चिकट पदार्थांनीं युक्त असा मोहर झाला आणि चिकटा सर्व मोहर झडून जाई पर्यंत कायम रहात असे. काहीं बारीक क्षुद्र कीटक या मोहरावर बसून ते तो खाऊन टाकितात असा ही भास झाला. आम्रमंजरी भक्षण करणाऱ्या कीटकाची वाड फार त्यांनी पसरली आणि ती पसरूं नये ह्मणून कित्येक आंबराईवाल्यांनीं आपापल्या आंब्याच्या झाडावर चिखल मातीचा सडा फेकला. एकाचें पाहून दुसऱ्यानें, दुसऱ्याचें तिसऱ्यानें अशी परंपरा वाढली आणि लागलाच दुसरे दिवशीं बंडाच्या धामधमींची पूर्व चिन्हें आंग्लो इंडियनच्या उलट्या बाहुल्यास दिसून आलीं.

आम्रवृक्षा वरील मृद्गोलकांनीं राज्यकर्त्यांपैकीं कित्येकांचा संशयखोर स्वभाव, अविश्वास, व मत्सरबुद्धी हीं चांगलीं प्रगट केलीं नेटिवावर काडी इतका भरंवसा नाहीं. थोड्या निमिषांत नेटीव बंडखोर व राजद्रोही निघतात कीं काय अशी दहशत पडली! खरोखर १८५७ सालीं नेटीव लोक उठले नसते तर आह्मास वाटत नाहीं कीं इंग्रजी राज्य कायम राहिलें असतें. सर्व संस्थानिक सरकारचे साह्यकर्ते होते. प्रजासमूह इंग्रजाच्या तर्फेनें लढत होता. आणि दुसऱ्या बाजूनें विचार केला तर अगदीं प्रश्न निघतो कीं शिपायांनीं बंड केलें यांत अपराध तो कोणता? काडतुसें गाईच्या अगर डुकराच्या चरबीनें माखलेलीं होतीं असा शिपायाचा ग्रह झाला होता तो कोणी दूर केला होता असें आह्मास ठाऊक नाहीं. एखाद्या कामांत धर्म बिघडतो असा मनानें आग्रह घेतला ह्मणजे कोणता मनुष्य धर्मनिष्ठेच्या आवेशांत लौकिकी फायदे विसरत नाहीं! बंडाचा इतिहास विश्वसनीय असा उपलब्ध नाहीं. चांगली माहिती मिळाली तर असें हा आढळेल कीं राज्यकर्त्यांच्याही नेटीवा संबंधानें पुष्कळ चुका घडलेल्या आहेत. तलवारीच्या बळावर इंग्रजानीं राज्य बळकावलें आहे तथापि तें तलवारीच्या जोरावरच चालेल हें खोटें आहे. भक्ती, प्रेम, आदरबुद्धी इत्यादि गुण राज्यकर्ते व प्रजाजन यांच्या मध्यें जागृत पाहिजेत. हिंदु मुसलमानामध्यें तंटे चालूं ठेवून कोणाचें कल्याण होण्या सारखें नाहीं!

---

आपल्या कायदे कौंसिलदारांना स्पेशल ट्रेनीनें जाण्याची जरूरी नाहीं ह्मणून स्पेशल ट्रेनीची वहिवाट बंद करण्या संबंधानें आपला अधिकार कितपत चालतो हें कळण्या साठीं स्टेट सेक्रेटरीस लार्ड एल्जिन यांनीं तारेनें विचारलें आहे अशी प्रथम वदंता उठली. पुढें ती खोटी व निराधार आहे असें ग्याझेटकर्ते ह्मणाले. आणि आतां आल्हाबादचे 'मॉर्निंग पोस्ट' पत्रकार लिहितात कीं वरील बातमी खोटी ह्मणणारे लोक खोटे आहेत. साधारणपणें लोकवार्ता अगदींच निराधार असत असें नाहीं. आणि बहुतकरून जें पिकतें तेंच विकतें. स्पेशल ट्रेनी बंद केल्यानें वीस लक्ष रुपयांचा खर्च वाचेल. आह्मी ह्मणतों कीं लार्ड एल्जिन यानीं हा प्रश्न काढला नसल्यास अवश्य काढावा. क्षुल्लक गोष्टींतही बहुव्यापक तत्व असतें. बनलानेंने देखील एकदां उत्तम तत्वाचा स्वीकार झाला तरी त्यांतील चांगुलपणा मनांत आदरबुद्धि प्रेरित करितो. काटकसरीची कातरी यथान्याय चालविली तर कापेन सेशन अलावन्साचा अगोदर फन्ना उडेल. अमीराला सालिना लक्षावधि रुपयांचा नजराणा दिला जातो तो तत्काळ बंद होईल. अशा सहस्त्रावधि लोकहिताच्या घडून येतील. तीस कोट हिंदुस्थानची प्रजा लार्ड एल्जिनची फार ऋणी होईल आणि परमेश्वर कृपेनें इंग्रजी राज्य चिरकाल व सुखी राहील. पण अशा सद्बुद्धि होऊन सोन्याचा दिवस उगवेल तो खरा!

---

गोवधा पासून जे दंगे झाले त्यांच्या मधील कार्यकारणमालिका सरकारनें गोविली आहे ती निष्पक्षपाताची व सरळबुद्धीची नाहीं असें ह्मणावें लागतें. नेटिव संस्थानांतून गोवधा निमित्त इतके दंगे होत नाहींत असें सरकार ही ह्मणतें परंतु त्यांचें कारण हें दाखवितात कीं राजा हिंदु असला तर मुसलमान प्रजा नमून असते व राजा मुसलमान असला तर हिंदु प्रजा नमून असते. याला उदाहरणें म्हैसूर व हैदराबाद हीं दोन संस्थानें आहेत. परंतु खरोखर कारण निराळेंच आहे. राजा व प्रजा या उभयतांची अंतःकरणें मिळालेलीं असतात. परस्परांच्या गरजा व आवडी जाणून एकमेक वागत असतात. आमच्या इंग्रजी राज्यांत सर्व प्रकार उलटा दिसतो. साहेब मुख्य अधिकारी असतात. ते आपल्या अरेरावपणाच्या व अधिकार वैभवाच्या तोऱ्यानें वागतात. त्यांना अल्ला ह्मणणारे किंवा विष्णु मानणारे पुजारी मात्र मिळतील तितके चांगले. बाकी सर्वजणांस कल्पना प्रमाणें ते मानतात. तेव्हां अशा अधिकाऱ्या पुढें न्याय व अन्याय तो कसला! बहुतकरून मुसलमान लोकांचा पक्ष हे अधिकारी उचलतात कारण त्यांच्या तंत्रीतो प्रमाणें ते वागण्यास व मनधरणी करण्यास तयार असतात. सरकारचें दुसरें ह्मणणें असें कीं तारायंत्रें, रेलवे, व वर्तमानपत्रें इत्यादि दळणवळणाच्या साधनानीं दंगे तत्काळ फैलावतात. पण सरकार हें विसरतात कीं हींच साधनें दंगे मोडण्यास व पुन्हा होऊं न देण्यास पुष्कळ प्रकारें कारणीभूत होतात. सरकारचे अधिकारी कार्यदक्ष, व्यवहारनिपुण, व खऱ्या कळकळीचे असते तर दंग्याच्या थराला गोष्ट कधींच आली नसती. परंतु कित्येकांच्या डोक्यांत वेड असें असतें कीं हिंदुमुसलमान भांडतील तरच आपलें राज्य ठीक चालेल! हिंदु मुसलमानामध्यें तट व फाटाफूट असण्यास सरकारनें लाविलेलें कारण खरें आहे. तें असें कीं मुसलमान लोक विद्येनें व बळानें कमजोर असून राजकीय गोष्टींत अगदीं मागसलेले आहेत. तेव्हां मुसलमान लोक सांपतच्या जीवनकलहांत अगदीं कमताकद व असंतुष्ट आहेत. हें कारण मूळाशीं आहे. आणि शिवाय उभय जातीं मधील सण एका दिवशीं आले म्हणजे या फाटाफुटीस भरती येते. हें कारण खरें असलें तरी मुसलमानाचा पक्ष राज्यकर्ते उचलतात व हिंदु लोकांवर तुटून पडतात हें कोणाही सुज्ञास समजेल.

---

## बुद्धिवान् आणि युक्तिवान् यांत श्रेष्ठ कोण ?

( लिहून आलेला मजकूर )

व्यवहारांतील केव्हां केव्हां कांहीं विलक्षण कृत्यें पाहिलीं ह्मणजे बुद्धिवान मोठा कीं युक्तिवान मोठा असा प्रश्न उत्पन्न होतो व त्याचें उत्तर मनास समाधान कारक असें मिळत नाहीं. तथापि आपण त्यातील बारका-

ईनें भेद अवलोकन करित गेलें तर बरीच संशयनिवृत्ति होते. बुद्धीचे ठायीं मान्यता सत्यता, गांभीर्य, इत्यादि गुण वास करितात युक्तीमध्यें हें सर्व कांहीं असून आणखी कांहीं विशेष आहे. युक्ति हें जरी एक निराळें इंद्रिय नाहीं तरी तीस नेत्र, कर्ण, घ्राण, जिव्हा, स्पर्श इत्यादिकांचा घटकाभर आत्मा म्हटलें तरी शोभेल. ती पाहिजे तें कूट सोडविते. तीस संकट ह्मणजे कः पदार्थ होय व विघ्नें तर तीस भिऊन पळतात. तिचा सर्व सर्व प्रसंगीं व सर्व ठिकाणीं सारखा उपयोग होतो. मनुष्य जर एकांत स्थळीं जाऊन बसला तर जगांत आपण स्वतांस कसें मिरवावें हें ती त्यास दाखवित असते. कांहीं मित्रमंडळींत अगर समुदायांत जाऊन बसला तर जगांत कसें वागावें हें शिकविते. बुद्धि ही मनुष्यास एक शक्ति आहे. युक्ति ही कुशलता आहे एखादी गोष्ट कशी करावी हें बुद्धीस समजतें व युक्ति तेंच कृत्य करून दाखविते. बुद्धीच्या योगें मनुष्य मान्य होतो व युक्ति मनुष्यास मान्यता आणते. बुद्धि हें द्रव्य आहे व युक्ति हा रोख पैसा आहे. व्यवहारांत देखील शेंकडा नव्वद या प्रमाणानें बुद्धिवानांपेक्षां युक्तिवानास पैसा अधिक मिळतो हा अनुभव आहे नाटकांत तर देखावा मोठाच चमत्कार दृष्टीस पडतो. एखादे नाटकांतील मंडळी नाटकासंबंधानें मोठी बुद्धिवान असेत व एखादी नुसती युक्तिवान असते परंतु दोहोंची सांगड फारशी जमत नसल्यानें जे खेळ आपणास तुच्छ असे वाटतात ते उत्तम वठताना आपण पाहतो व जे उत्कृष्ट नावाजलेले खेळ आपण ऐकतो ते अगदीं नादान ठरलेले पाहतो. कोर्टांत देखील उभयतांच्या लीला मोठ्या विस्मयकारक दृष्टिगोचर होतात. एखादा बिकट खटला चालला असतां त्यांतील मख्खी शोधण्याचा मार्ग बुद्धीस स्पष्टपणें दिसत असतो. पण युक्ति ती मख्खी लागलीच लोकांपुढें फेंकते. बुद्धिवान वकिलास न्यायधीश, व इतर वकील हे नेहमी माना डोलवितांना आपण पाहातों पण युक्तिवान यजवर आटर्नी पक्षकार यांजकडून एकसारखा पैशाचा वर्षाव होत असतो. एखादे गोष्टींत बुद्धीचा लौकर प्रवेश होत नाहीं असें आपण पाहिलें ह्मणजे तिचें मोठें महत्व वाटतें परंतु तीच गोष्ट युक्तीनें चटकन साध्य झाली ह्मणजे आश्चर्य वाटतें. वास्तविक पाहता युक्ति ही कांहीं महत्वाची गोष्ट नसतां तिचा नियम चुकत नाहीं, खरी मख्खी तीस लपून राहत नाहीं व एखाद्या गोष्टीची संधी साधण्या करिता तीस तिळमात्र आळसही असत नाहीं. बुद्धि जिंकते व युक्ति खात्री करून देते. बुद्धिच्या योगें एखादा व्यापारधंदा मान्यतेस चढतो व युक्तीनें त्यास मान्यता येते. बुद्धिवाना पेक्षां युक्तिवानाची गोष्ट अधिक पसंत पडते. सभेंत बुद्धिवानाचें भाषण चाललें ह्मणजे सभासद कान देऊन ऐकतात, परंतु युक्तिवान सभासदांचीं अंतःकरणें आपलेकडे आकर्षून पाहिजे तितकीं आपल्या तर्फेचीं मतें मिळवितो. धंद्यास तर बुद्धिपेक्षां युक्तिचीच जास्त जरुरी असते. बुद्धिवान व्यापारी गिऱ्हाइकास जे निरुप लागतें तें बाजारांत आणित असतो व युक्तिवान नेहमी लोकांचें कशा वाचून नडतें तें उत्पन्न करित असतो. युक्तिवान मनुष्य कांहीं एक न शिकतां आपणास सर्व कांहीं येतें असें दाखवूं शकतो बुद्धिवान मनुष्य तर्कशास्त्राच्या आधारानें व आपल्या गहन विचारानें एखादी गोष्ट अगदीं प्रकाशा प्रमाणें उघड उघड करून दाखवितो परंतु युक्तिवान त्यांत अशी एखादी गोष्ट काढितो कीं तो बुद्धिवानाचे स्वप्नीं ही असत नाहीं. त्यामुळें बुद्धिवान निरुत्तर होतो, गोंधळून जातो, व त्याचें त्यासच भान नाहीं असें होतें लोकप्रियता संपादन करण्यास तर युक्तिचा हात खेडाच. या सर्व गोष्टीवरून पाहतां बुद्धि ही बरोबर विचार करण्या सारखी, मनुष्यानें तिच्या संबंधानें अभिमान बाळगावा अशी व मोठ्या वैभवाची अशी वस्तु आहे तथापि युक्ति ही उपयुक्त, बाळगण्यास सुलभ, वाहिजे तेथें जुळणारी, ते नेहमी तत्पर असून व द्रेन पैसे प्राप्तीं करून देणारी अशी वस्तु असून ती बुद्धीची बुद्धि, अप्राप्त वस्तु प्राप्त करून देणारी, शक्तीचा उपयोग कोठें व कसा करावा हे शिकवणारी, परीक्षक, व नैसर्गिक बुद्धीचा उजवा हातच अशी आहे करितां ती प्राप्त होण्या विषयीं सर्वांनीं होईल तेवढा प्रयत्न करावा हें बरें!

---

# The Berar Samachar

MONDAY MAY, 28 1894

We have, more than once, called the attention, through the vernacular columns, of our readers and the Railway authorities to the various complaints of the public with respect to the Railway Administration. *Prima facie* the Railways are for the comfort and convenience of the public and it is but natural that the Company should look in its management to the convenience of the passengers. But even apart from this there is another reason why the Company should consult and look to the comfort of the passengers. The reason is that the passengers form the chief source of their revenue. In India the bulk of the passengers consists of those travelling by the third class. But looking to the arrangements of the Company the attention paid to the convenience of these seems to be in an inverse ratio. Some seem to think the Authorities seem to have made up their mind not to look to the complaints. And this inference would seem to be proper if we look to the result of the complaints that are lodged from time to time. Any one travelling by the Railway is aware of the manifold inconveniences it entails. As individual efforts fail or are not sufficient to secure needful reforms we would advise the public once for all to make a common cause and place before the authorities their grievances. We are sure that if the public were to take this legitimate way instead of individual efforts far and between, a kind and sympathetic response will be the result. Unless the public takes such a decided step there is no chance of getting rid of the trouble that every one travelling is sure to find. In some other issue we wish to say what we have to say on the most needful reforms.

By the bye we wish to invite the attention of the Railway authorities to the injustice shown to the servants. Over-work, high-handedness, want of respite and some such things are seen every where. By way of an illustration the duty of the night Station-Master on small stations may be noted. They are required to work for 12 hours complete from 6 P. m. to 6 A. m. This goes on for years together. Such a hard work is nowhere to be seen. In our opinion the Company should look to this. There are other grievances but we do not dwell upon them hoping that they would soon be removed. In this connection we may ask the servants of the company to act in concert and place in a constitutional way their just demands.

---

The Honorable Mr. Dadabhai Naoroji lectured the other day on some of the prevailing fallacies about Hindus and Mahomedans. The important points he noticed are most instructive in the present emergencies and we cull them from the last issue of 'India' the only magazine dealing with Indian politics:—

"Mr. Naoroji said that one very common fallacy about India was that its people was made up of two nations, one— the Muhammadans— very warlike, and the other— the Hindus, very peaceable. The fact was that the present Muhammadans were Hindus converted to Muhammadanism. They were not a distinct race, for in Bengal, where a quarter of the population were Muhammadans, it would be very difficult to tell the followers of that faith from the Hindus. The Hindu races were really very warlike. The Rajputs, the Mahrattas, and the Sikhs would stand up, man for man, against any people on earth. This first fallacy was the parent of the second, and that was that the English people had only to divide and rule in India, and that their rule was quite secure because of the hatreds and antipathies of the native races. On the contrary, whenever the people of India had a common cause to fight for, they were just as homogeneous as any other nation. This was the reason why the great demonstrations which were made during his last visit to India were of a national character. Another event last year was the decision of Parliament that the examinations for the Civil Service were to be held simultaneously in India and in England. It was said that India was poor because it was thickly populated. Yet the increase in Britain during the past ten years had been 11·6 per cent., against 9·7 per cent. in India. It had been said that the English rule in India had prevented famines. Between 1802 and 1854 there were thirteen famines, in which 5,000,000 perished. Between 1860 and 1879, when railways and irrigation works were supposed to do away with the danger of famines, there were sixteen famines, in which 12,000,000 perished. There could be no real prosperity in India until its people were admitted into a share of its Government."

---

## वऱ्हाड.

हवामान—हल्ली मनस्वी उकडतें. हवा चांगलीशी नाहीं. उमरावती, खामगांव, वगैरे ठिकाणीं हवेचा उपद्रव चालूं आहे.

---

कर्नल मॅकेंझी साहेब यांची स्वारी तबेत नदुरुस्त असल्यामुळें चिखलदऱ्याहून उमरावतीस गेल्या गुरुवारीं संध्याकाळीं आली. डाक्टराच्या ह्मणण्यावरून ते कांहीं दिवसांच्या फिरलोक रजेवर मुंबईस परवा रवाना झाले.

---

मि० हैदर अली खान अब्बासी यांची उमरावतीहून आकोल्यास बदली झाली आहे आणि उमरावती ट्रेझरी आफिसचें काम रा. रा. गोविंदराज अप्पा यास दिलें.

---

मि० हशमत अली अब्बासी यांचा बदली उमरावतीहून यवतमाळास झाली.

---

मि० मारिस असि. कमिशनर उमरावती यांस वाशिमास बदललें.

---

रा. रा. रामचंद्र भास्कर जयवंत हे आपल्या नवीन वाशिमचे क्लार्क आफ कोर्टचे जागीं रुजूं होण्या करितां काल रवाना झाले.

---

रा० रा० यशवंत महादेव तहशिलदार पुसद यांनीं १९ महिन्यांची फर्लो घेतली. ते सध्यां मित्रमंडळीच्या भेटी साठीं येथें आले आहेत. त्यांच्या जागीं वाशिमचे तहशिलदार मि० सफदर अली यांस धाडून वाशिमास नायब तहशीलदार रा. रा गणेश राजाराम यांस आक्टिंग तहशिलदार नेमिलें,

---

चक्रवर्तिनी महाराणी सरकार- यांच्या जन्मदिवसाच्या उत्सवानिमित्त वऱ्हाडांतील कोर्टें गेल्या २६ वे तारखेस बंद होतीं.

---

कुमार श्री हरबानजी आफि० डेपुटी कमिशनर बुलढाणा यांस फाशीच्या शिक्षे शिवाय इतर शिक्षेखालीं येणाऱ्या अपराधा संबधानें माजिस्ट्रेटी अधिकार देण्यांत आले.

---

रा० रा० गणेश बापूजी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर, यवतमाळ यांस असिस्टंट कमिशनर वर्ग १ चे, स्माल्काज कोर्टाचे ५०० रुपये पर्यंत दावे चालविण्याचे, व सिव्हिल जज्जाचे पूर्ण अधिकार दिले आहेत.

---

मि० सैफुद्दीनखान क्लार्क आफ कोर्ट यांची बदली यवतमाळास झाल्या प्रमाणें ते काल रोजी तिकडे रवाना झाले. यांचा जम येथ चांगला बसला होता, आणि काल मित्रमंडळानीं त्यांस प्रेमादरानें निरोप दिला.

---

## जाहिरात.

विद्यमान डेपुटी कमिशनर साहेब बाहादूर जि० अकोलें

नोटीस सर्व लोकांस कळविण्या करितां दिली जात आहे कीं कलालीचा मक्ता सन १८९४। ९ साला करितां अकोला तालुक्या पैकी येलवण १३२९, दोनद खुर्द १९००, कानशिवणी १३७९ येकूण ४६०० रुपया करितां दलपत वा॥ कृष्णाजी देशमुख यांचे नांवें हराश झाला सदरील मक्तेदार हल्लीं मेत झाला आहे करितां सदहु मक्त्याचा फेर लीलाव ता. १२ माहे जुन सन १८९४ इसवी रोजीं डिपुटी कमिशनर जिल्हे अकोलें यांचे कचेरीत दिवसा बारा वाजतां केला जाणार आहे करितां ज्याचो घेण्याची मर्जी असेल त्यानीं सदहु तारखेस हजर होण्याची तजवीज करावी. हरासाच्या शर्ती सदहू दिवशीं कळविल्या जातील अगर पुर्वी डिपुटी कमिशनरच्या कचेरीत विचारल्यास कळविल्या जातील कळावें २९ माहे मे सन १८९४ इ.

B. B. Sule.
E. A. C.
For
डिपुटी कमिशनर.

---

## वर्तमानसार.

माशाच्या शरीरात उरःप्रदेशाच्या वरच्या भागांत पुढच्या तंगड्यांच्या जरा वर जो मोठा मज्जातंत्र आहे तेथें त्याचें मर्मस्थान आहे. जों पर्यंत त्याच्या एका जागेला नाहीं तों पर्यंत बाकी कोठलेही भाग छिन्न झाले तरी या प्राण्यास तत्काळ मरण येणार नाहीं. त्याच्या अंगात चलनवलनाची शक्ति राहणारच. हा केंद्र जर कापला किंवा याचा संबंध तोडला तर माशास तत्काळ मरण येतें.

जावा बेटांत बटेविआ व सामरांग या दोन शहरांच्या दरम्यान बांउन नांवाचें एक संस्थान आहे. हें संस्थान वस्तुतः हॉलंडच्या मांडलिकां पैकीं आहे परंतु तें स्वतंत्रच आहे राजकीयदृष्ट्या त्याचें महत्वही तितकें नाहीं. अशी स्थिति आहे तरी हें संस्थान चांगलें सुखी, संपन्न अनादिकालापासून स्त्रियांनीं चालविलें आहे. राजा काय तो पुरुषत्र तेवढा असतो. बाकी सर्व अधिकार स्त्रियांच्या स्वाधीन असतात. राजाला स्वतंत्र अधिकार मुळींच नसतो. त्याचें मंत्रिमंडळ—किंवा कौन्सिल तीन स्त्रियांचें आहे त्यांच्या सल्ल्याप्रमाणेंच राजानें वागलें पाहिजे. सगळे मोठे अधिकारी, न्यायाधिकारी, फौजेचे अधिकारी, व शिपाईही झाडून स्त्रीवर्गांतील आहेत; याला एकही अपवाद नाहीं. पुरुषांचें काम शेती पोतीं व्यापार एवढेंच. राजरक्षक मंडळी स्त्रिया असून त्या पुरुषांप्रमाणेच घोड्यावर बसून जातात. एका राजाच्या पश्चात् त्याचा वडील मुलगा राजा बनतो. परंतु एखादा राजा मुलावांचून गेला तर सगळ्या मोठमोठ्या अधिकारिणी आपल्या पैकीं कोणाच्या तरी मुलाला निवडून बहुमतानें राज्यासनावर बसवितात.

एक गृहस्थ विचारते, आपण आपल्या बायकांस आपल्या सगळ्या काहीं बाहेरच्या गोष्टी सांगाव्या कीं काय! आमचें त्यास उत्तर एवढेंच कीं कोणी एवढा प्रश्न विचारित बसण्याच्या भानगडींत पडण्याचें कारणच नाहीं. बायकांना आपण सांगावयाच्या आधींच सगळें ठाऊक असतें हें एक आणि त्या आपल्यापाशीं गुळगुळ गोष्टी सांगून केव्हांच आपल्या मनातलें आपल्या नकळत काढून घेतात हें दुसरें!

श्रीमंतीनें खरोखरी सुख जरी मिळालें नाहीं, तरी सुखी माणसाचें झोंक तरी सारे दिसतें! आणखी श्रीमंती ही आपण कां इच्छितो? ती दुसऱ्याला दिसावी म्हणून; आपण श्रीमंत नसतां लोकांनीं श्रीमंत म्हणावें यांत जसें जसें सुख वाटतें, तसें सुखी नसतां सुखी म्हणून घेण्यांतही वाटतें!

करमणूक.

छत्र्या.

सन १८९१।९२– ४१ ½ लक्ष रुपये
" १८९२।९३– ४४ लक्ष रुपये.
" १८९३ — — — ४८ लक्ष रुपये! !

आगपेट्या.

सन १८९१।९२ त — १३ लक्ष रुपये.
" १८९२।९३ — ३५॥। लक्ष रु०
" १८९३ सालांत–३७॥ लक्ष रु०

वरील आंकड्यांवरून या दोन जिनसांचा खप किती जास्त होत चालला आहे, हें स्पष्ट दिसतें. या २ जिनसां मिळूनच दरसाल आमच्या देशांतून ८५।८६ लक्ष रुपये विलायतेस जातात!!!

रजपुतान्यांतील वाल्टरकृत हितकारिणी सभेनें केलेल्या नोंदीतील ४ हजारां पेक्षां जास्त लग्ना पैकीं १४०० लग्नांतील वधु १६ वर्षांहून जास्त वयाच्या होत्या लग्नाच्या मुलींचें वय २०।२५ वर्षांचें असल्या बद्दलही त्यात काहीं उदाहरण आहेत!! रजपूत लोकांत "हुंडा घेण्याचें" बंड बरेंच होतें; परंतु तेंही या सुधारणेपासून कमी होत चाललें असून "कन्याविक्रय" ही कमी होत चालला आहे. रजपुतान्यांतील लोकांनीं सदरहू हित कारिणी सभेच्या करार पत्रांवर सह्या करून दिलेल्या आहेत, त्या प्रमाणें वागण्यास त्यांची किती तयारी आहे ती पहा–४१६ हजार लग्नां पैकीं खर्च कमी करण्याचे संबंधाचें नियमांचें उल्लंघन झाल्याचीं उदाहरणें फक्त १६ च घडून आलीं, व वयाच्या संबंधानें नियमांचें उल्लंघन फक्त १६६ उदाहरणांत झालें. बाकीचीं सर्व लग्नें सभेच्या नियमा प्रमाणें झालीं. अन्त्यविधीच्या वेळीं होणारे खर्चाचे नियमही २ हजार उदाहरणां पैकीं फक्त २८ त सभेचे नियमांचें उल्लंघन झालें. बाकीच्यांत सभेचे नियम पूर्णपणें मानले गेले सं० शो०

✓दंगे अलीकडे जास्त कां होऊं लागले यांचें कारण हिंदुस्थान सरकारचे मतें दळणवळणाच्या सोयी व वर्तमान पत्रांचा प्रसार हें मुख्यत्वेंकरून आहे. एका ठिकाणीं दंगा झाला कीं त्याची बातमी लागलीच चोहोंकडे पसरते व हिंदु मुसलमान पत्रकार आपापल्या बाजूस तिखट मीठ लावून लिहितात, त्यामुळें योगानें लोकांचीं मनें बिघडून चोहोंकडे दंगे होऊं लागतात. दुसरें कारण, हिंदु लोकांचा विद्येत पुढारपणा होय. हिंदु लोक विद्येच्या कामांत पुढें आल्यानें त्यांस सरकारी व खासगी हुद्यांचीं कामें मिळतात व मुसलमान लोक मागें पडतात. मुसलमानांचे हातांत पूर्वी सर्व अधिकार असून हल्लीं ते मागें पडत चालले आहेत यामुळें त्यांस फार वाईट वाटून त्यांचीं मनें हिंदु विषयीं फार बिघडलीं आहेत. तिसरें कारण हिंदू लोकांनीं अलीकडे गोवधनिषेधनें अलीकडील जास्त चळवळ होय त्या संबंधानें सरकारानें आपले खलित्यांत मद्रास व काशी, प्रयाग, इकडील गोरक्षण मंडळ्या संबंधाची फारच लांबलचक हकीकत दिली आहे.

मि. नार्टन यांस राष्ट्रीय सभेंत पूर्वी प्रमाणें पुढाकार घेऊं देऊं नये, असा बरेच क्रिश्चन लोक खटपट करीत आहेत. क. त.

मुंबई इलाखा सतंद्र व एकटे ग्वाल्हेर संस्थान यांत कागद कायते उत्पन्न होतात. तसेंच वायव्य प्रांत व बंगाल हे दोन प्रांत या संबंधांत फारच पुढें आहेत तथापि हिंदुस्थानांत जो कागदाचा खप होत आहे त्या मानानें पाहिलें म्हणजे हिंदुस्थानांत होणारे कागद अगदींच थोडे आहेत. हिंदुस्थान सरकारास लागणारे सर्व कागद देशीच असतात व त्याबद्दल शोध करण्याकरितां जें कमिशन नेमिलें होतें त्याच्या रिपोर्टांत "इतर देशांपेक्षां हिंदुस्थानांतील कागद विश्वास ठेवण्यास पात्र, चांगले व स्वस्त असतात" असें त्यांचा या विषयीं अभिप्राय पडला.

अंबाला येथें लवकरच एक मोठा कांचेचा कारखाना निघणार आहे, तेथें विलायती बहुतेक कांचकाम होऊं शकेल असें म्हणतात. या कारखान्याकरितां जी कंपनी निघणार आहे तिचें भांडवल १ लाख रुपयांचें असून त्याचा १००।१०० रुपयांचा एक एक शेअर आहे. असले धंदे आमच्या देशांत निघाले पाहिजेत म्हणजे परदेशांत जाणारा कांहीं तरी पैसा वांचेल.

श्री. स.

कै० रा० ब यशवंत वासुदेव आठल्ये यांच्या तान्ह्या मुलाची उम्मर वीस वर्षांची होईपर्यंत दुर्त दरमहा ७५ रुपये त्यास पेन्शन देण्याबद्दल श्री महाराज सरकार यांजकडून हुकूम आला आहे असें सयाजीविजयावरून समजतें. रा० ब० आठल्ये यांणीं संस्थानची स्वतंत्रपणानें आणि एकनिष्ठपणें जी सेवा केली आहे ती महाराजांकडे रुजू आहे असें यावरून दिसून येतें. के०

हिंदुस्थान सरकारचा ठराव—एखादें घर भाड्यानें दिलें असतां त्यावर इनकमट्याक्सची आकारणी करायाची ती त्या घराबद्दल जे म्युनिसिपल कर द्यावयाचे असतील ते वजा करून मग करावी असें हिंदुस्थानसरकारानें ठरविलें आहे. शु. स.

---

# सर्व इंडियन लॉ रिपोर्ट १८९३

यांतील

# फौजदारी ठरावांचे मराठी भाषांतर-

कलकत्ता, मद्रास, अलाहाबाद आणि मुंबई या चारही हायकोर्टांपर्यंत जे फौजदारी खटले गेले त्यांपैकीं सुमारें ८० खटले चारी हायकोर्टाचे १८९३ चे इंडियन लॉ रिपोर्टस मध्यें इंग्रजींत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांचें मराठी भाषांतर आजपर्यंत झालेलें नाहीं. ते खटले भाषांतर होऊन आपल्यास वाचण्यास मिळाल्यास आपला फार फायदा होईल असें कित्येक केवळ मराठी जाणणार माजिस्त्रेट, वकील, मुकत्यार, फौजदारीकडे काम करणारे कारकून व पोलिस खात्यांतील लोक यांनीं खाली सही करणारास कळविल्या वरून त्यांनीं हें काम हातीं घेतलें आहे व येत्या जून अखेर हें भाषांतर संपेल व जुलई महिन्यात तें छापण्यास आरंभ केला जाईल व जुलई अखेर पुस्तकें तयार होतील. रायल साईजच्या कडुपत्री साच्याचें तें छापावयाचें आहे व त्याचीं सुमारें ४०० पासून ५०० पृष्ठें होतील. ज्यास हें पुस्तक पाहिजे असेल त्यानें ता० ३० जून १८९४ चे आंत खालीं सही करणारास लिहावें म्हणजे नांवें नोंदून पुस्तकें तयार होतांच पाठविलीं जातील. ज्या कडून ता० ३० जून १८९४ च्या आंत कळविलें जाणार नाहीं त्यास खात्रीनें पुस्तक मिळेल असें नाहीं. कारण ३० जून च्या आंत नांवें कळविलीं जातील त्या मानानेंच पुस्तकें काढण्याचा विचार आहे.

या पुस्तकाची काय किंमत पडेल हें खाली पुढें दर्शविलें आहे:—

(१) ता० १ जुन आगाऊ किंमत भरणारांस टपाल हशीलसह ३८ पडतील.

(२) फक्त सही देऊन व्हाल्यूपेबल मागविणारास ४८ पडतील.

(३) पुस्तक तयार झाल्यावर घेणारास ५८ पडतील व पुस्तक असल्यास मिळेल.

जे लोक हल्लीं दरबारी पत्राचे वर्गणीदार आहेत त्यांनीं ता० ३१ मे १८९४ चे आंत आगाऊ कळविल्यास ३८ रुपयांस हे पुस्तक मिळेल व त्यांकडे हें पुस्तक व्हाल्यूपेबल करून पाठवून हे रुपये वसूल केले जातील. ता० ११ एप्रिल १८९४ इ०

वामन गोविंद रानडे,
वकील व दरबारी
बारामती जिल्हा पुणें.

---


## घड्याळ.

कि. ६ रुपये हमी–३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटर, उघडण्यास तोडांचें, जिंवरूचें (म्हणजे ६ च कांचें खालीं वर हिरा बसविला आहे) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनारी कांचेचें मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुरुस्त करण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. सचित्र क्याटलाग मागवा. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक


---


NEARLY READY

## CRIMINAL COURT MANUAL

*for the*

Hyderabad Assigned Districts

by

Mr. R. Obbard

assisted by

Syed Meer Alum.

Containing the uncancelled Notifications of the Government of India extending Laws and promulgating Local Laws (with reprints of Forest Law, Abkari Rules, Municipal Act, Courts Law, Rules, regulating Legal Practitioners and other Local and Special Laws), the Notifications and rules published under the authority of the extended Laws, the uncancelled Circulars and Orders of the Government of India, Resident, Commissioner, and Judicial Commissioner relating to Crimial matters, and full information in regard to the prescribed registers, returns and forms, to be used in and by Criminial Courts, with notes by Mr. R. Obbard, and a copious Index.

PRICE RUPEES 5

Subscriptions registered by Syed Meer Alum at the office of the Civil and Sessions Judge, Amraoti Camp Berar.


---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.